
६ जानेवारी ६८

चा ळी स  पै से



# माणूस

**शाब्बास मोहिते !**

तुम्ही कोयनेच्या पिछाडीवरून ' झोळी ' झुगारून द्या
आम्ही अन्नाच्या आघाडीवरून तिची ' होळी ' करीतच आहोत.

**महाराष्ट्र राज्याचे घरबांधणी, रस्तेवाहतूक मंत्री श्री. यशवंतराव मोहिते म्हणतात—**

' कोयनेच्या परिसरावर आलेली आपत्ती अत्यंत भीषण स्वरूपाची असली तरी तिला तोंड देणे अशक्य-प्राय नाही. . . .

नेहमीच्या परंपरागत, भूतदयावादी दृष्टिकोनातून या प्रश्नाकडे न पाहता एक नवोदित स्वाभिमानी राष्ट्र आपल्यावरील आपत्तीला स्वावलंबनाने कसे तोंड देऊ शकेल, याचा आदर्श घालून देण्याची संधी आपल्या-समोर आली आहे. आपत्ती ही इष्टापत्ती मानून आपण ही संधी साधली पाहिजे. . . .

भूकंपपीडितांचे पुनर्वसन ही महाराष्ट्र व केंद्र सर-कारची संयुक्त जबाबदारी आहे, असे यापुढे मानले गेले पाहिजे. . . .

यासाठी आपण शिक्षणकर जसा वसूल करतो, तसा पुनर्वसनकर वसूल करून पुनर्वसनाची तरतूद केली पाहिजे. बागायतदार शेतकरी, बडे घरमालक, चांगले उत्पन्न कमावणारे व्यावसायिक यांच्यावर दोन वर्षां-पुरता हा कर बसविला, तरी आवश्यक तो पैसा वसूल होईल, असा माझा अंदाज आहे. ऊस पिकवणाऱ्या शेत-कऱ्यांना टनामागे एक रुपया एवढा पुनर्वसनकर बसविणे म्हणजे त्यांच्यावर फार मोठा बोजा टाकणे आहे, असे मला वाटत नाही.

या करामुळे पैसा जमा होईल हा एक फायदा आहेच. पण त्यामुळे एक चांगला पायंडाही पडेल. प्रत्येक वेळेला काही आपत्ती आली की हातात भिकेची झोळी घेऊन आपण दारोदार हिंडावे, कोणी या झोळीत काही टाकील का, याकडे आशाळभूतपणे पाहावे, आणि मिळणाऱ्या मदतीवर विसंबून राहून होईल तसे, जमेल

[ कव्हर पान ३ वर ]

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : बत्तिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

स. न. डिसें. २५

श्री. शांताराम बाबुराव गोंदकर, अ. मास्टर, पब्लिक स्कूल, कोयनानगर यांचेसह मी व माझी दोन मुले पब्लिक स्कूलच्या वसतिगृहात राहत होतो. तेथे घडलेला सत्यवृत्तांत प्रसिद्धीसाठी सोबत पाठविला आहे. तरी त्याला आपल्या साप्ताहिकात लवकरात लवकर प्रसिद्धी द्यावी अशी विनंती आहे.

आम्ही कोणत्याही मदतकेंद्रावर मदत घेतली नाही. मात्र या लेखाबद्दल योग्य मानधन अपेक्षित आहे. मदत नव्हे. **सौ. सुषमा शांताराम गोंदकर**

[ लवकरात लवकर म्हणजे याच अंकात प्रसिद्धी दिली आहे. अगदी 'श्रीकैलास ते सिंधुसागर' या आम्हा मंडळींच्या संकल्पित अन्नस्वतंत्रता संचालनासंबंधीचा मजकूर मागे ठेवून. तत्संबंधी आता अधिक पुढील अंकी.

मानधनही तसेच लवकरात लवकर पाठवू. ती मदत नव्हे, आपल्या हक्काची स्वकष्टार्जित कमाई आहे अशीच आपल्याप्रमाणे आमचीही भावना आहे.

आपले सर्वांचेच स्वत्त्व व तेजस्वी झुंज कौतुकास्पद आहे. अभिनंदन. **संपादक ]**

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

# झुंज

अकरा डिसेंबरच्या पहाटे निसर्गाने काही मिनिटेच रौद्र रूप धारण करून मानवाचा दिमाख उतरविला. मानवाने तशा परिस्थितीतही आपल्या चिमुकल्या सामर्थ्यानिशी आपली शान राखण्याची पराकाष्ठा केली. सोमवार दि. ११-१२-६७ च्या पहाटे ४-१५ ते दि. १७-१२-६७ संध्याकाळी ६-१५ वाजेपर्यंत प्राचार्य महाबळेश्वरवाला यांच्या मार्गदर्शनाखाली पब्लिक स्कूलच्या मूठभर कर्मचाऱ्यांनी आपल्या जिवाची तमा न बाळगता निसर्गाशी दमदार झुंज दिली तिला तोड नाही. या एका आठवड्यात कसोटी पाहणारे अनेक प्रसंग ओढवले. त्या सर्व प्रसंगांवर मात करून शाळेची लाख दीड लाख किमतीची मालमत्ता, १२० विद्यार्थ्यांची ढिगाऱ्याखाली दडलेली प्रत्येक चीजवस्तु व कर्मचाऱ्यांचे हजारो रुपये किमतीचे संसार-साहित्य यांतील जितके काही वाचवता येईल ते वाचवून १८ ट्रक्स भरून ते साहित्य सातारा सैनिक स्कूलकडे रवाना केले. हे करीत असताना निसर्गाशी द्यावा लागलेला लढा शब्दातीत आहे.

सौ. सुषमा गोंदकर



सर्व पाटण तालुक्यात व जवळपासच्या इतर तालुक्यांत प्रचंड धरणीकंपाने उडवून दिलेला हाहाःकार वृत्तपत्रांनी जगाच्या कानाकोपऱ्यांत नेऊन पोचविला आहेच. तथापि त्यातील भीषणता कल्पनातीत आहे. प्रत्यक्ष त्यात होरपळलेले लोकच त्यातील भयानक भीपणता जाणू शकतील. धरणाला लागूनच असलेल्या पब्लिक स्कूलच्या वास्तूला त्या धक्क्याने अक्षरशः भुईसपाट केले. प्रत्येक कुलाच्या वसतिगृहाच्या चारी भिंती मुळासकट उखडल्या गेल्या. तीच अवस्था शाळेच्या इमारतीची झाली. याला अपवाद एक : शिवाजी कुलाचे वसतिगृह. हे वसतिगृहही पडले आहे, पण भुईसपाट झालेले नाही.

पहाटे ४–२३ चा सुमार. काळोखाचे साम्राज्य उतरणीला लागले होते. इतक्यात धरणीकंपाचा न भूतो न भविष्यती असा महाप्रचंड धक्का बसला. पूर्वेकडून पश्चिमेकडे धक्क्याची सागरी

लाट झरकन गेली. एका मिनिटात दोनदा हत्तीच्या पाठीवरील अंबारीप्रमाणे घरे हेलकावली व जमीनदोस्त झाली. त्यातच वीजही गेली. ही इष्टापत्तीच ठरली. नाहीतर विजेच्या धक्क्याने आणखी किती बळी घेतले असते देव जाणे! कोसळत्या इमारतींतून, ढासळणाऱ्या भिंतींवरून भराभर विद्यार्थ्यांनी–शिक्षकांनी पब्लिक स्कूलच्या वास्तूतून बाहेर उड्या मारल्या. ११८ पैकी सुमारे ८० ते ९० विद्यार्थी स्वतः बाहेर आले.

त्या भयंकर धक्क्याने घाबरून न जाता, गोंधळून न जाता, बुद्धी ताब्यात ठेवून शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी संयमपूर्ण प्रयत्नांची पराकाष्ठा सुरू केली. प्रथम बाहेर पडलेल्या मुलांची मोजदाद केली. उरलेल्या विद्यार्थ्यांची सुटका करण्यासाठी आवाजाच्या रोखाने शिक्षक वर्ग धावला. त्यांच्या मदतीला थोड्या वेळातच शाळेचे इतर कर्मचारी येऊन मिळाले. हे कर्मचारी पत्र्याच्या चाळीत राहत असल्याने त्या चाळी हादरण्याखेरीज विशेष काही घडले नव्हते. ते सर्वजण धडधाकट होते. त्यांची मदत मिळाल्यावर ढिगारान ढिगारा उपसून काढून प्रत्येक मुलाला बाहेर काढण्यात आले.

चारही कुलांपैकी सर्वांत जास्त मुले टागोर कुलातील ढिगाऱ्याखाली अडकली होती. ३० पैकी १७ मुले आत अडकलेली होती. त्या कुलाचे प्रत्यक्ष कुलप्रमुख श्री. कुलकर्णीच आत अडकले होते. त्यांना डोळ्याला गंभीर दुखापत झाली होती. येथे सर्वजण शक्ती एकवटून आता काम करू लागले. श्री. गोंदकर, श्री. गाजरे, श्री. पाटील (जिल्हा शिक्षणाधिकारी), श्री. एस. आर. कुलकर्णी दगडाखालून, कपाटाखालून, कॉटखालून अडकलेली मुले सुरक्षित बाहेर काढण्याची शर्थ करू लागले. या सर्वांना जखमा झालेल्या होत्या, पण त्या जखमांची त्यांना मुळीच

जाणीव नव्हती. रक्ताळलेल्या हाताने, ठेचाळलेल्या पायाने, दुखावलेल्या शरीराने ते अविश्रांत काम करू लागले. सुखरूप बाहेर पडलेल्या खोलीतील मुलांच्या साहाय्याने आत अडकलेल्या मुलाची जागा निश्चित केली जाई व त्याची प्रयत्नपूर्वक सुटका केली जाई.

प्राचार्य श्री. महाबळेश्वरवाला स्वत: जातीने ढिगाऱ्यावर उभे राहून मार्गदर्शन करत होते. स्वत: काम करत होते. ज़खमी, अत्यवस्थ मुलांना औषधोपचाराकरिता मिळेल त्या वाहनाने हॉस्पिटलमध्ये कराडला पाठवीत होते. सकाळी ६-३० वाजेपर्यंत अखंड प्रयत्न चालू होते. शेवटचा मुलगा वर निघेपर्यन्त कोणाला विश्रांती माहीत नव्हती. सर्व मुलांचा पूर्ण हिशेब लागल्यावर ढिगारे उपसण्याचे कार्य बंद झाले. दुर्दैवी चार मुलांखेरीज इतर सर्व विद्यार्थ्यांचे प्राण वाचले. संघर्षातील पहिले प्रकरण येथे संपले.

**स**र्व जखमी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना प्रथमोपचार केला. सर्वांना चहा– दूध पावाचा नाष्टा दिला व २-३० वाजता खास एस्. टी. ने सर्व विद्यार्थी, काही शिक्षक व सर्व शिक्षकांची कुटुंबे सातारा सैनिक स्कूलकडे रवाना झाली. प्रा. श्री. महाबळेश्वरवाला व त्यांचे उजवे व डावे हातच जणू–रेक्टर श्री. गाजरे व असिस्टंट मास्टर श्री. शां. बा. गोंदकर जिद्दीने तेथेच ठाणमांडून बसले. **शाळेची सापडेल ती टाचणीदेखील वाचवायचीच असा मनाशी दृढ निश्चय त्यांनी केलेला होता.**

सोमवारी रात्रभर व मंगळवारी दिवस-रात्र निसर्ग त्यांना भिववीत होता. तासा-तासाला धरणीकंपाचे धक्के बसत होते. क्षणाक्षणाला निसर्ग धाक दाखवत होता. पडलेल्या इमारती पुन्हा कोसळत होत्या. नजरेच्या टप्प्यातील डोंगरकडे मध्येच

कोसळलेले दिसत होते. कोसळण्याचा आवाज जरब बसवू पाहत होता. अनेक बातम्या पसरत होत्या. मृतांचा आकडा फुगत होता, ओळखीच्या व्यक्तींच्या मृत्यूची बातमी त्यांच्या मनाला धक्का देत होती.

सोमवारी रात्री १२ ते १ च्या दरम्यान प्रचंड धक्का बसेल अशी रेडिओ-न्यूज आहे अशी सर्वत्र बातमी पसरली. ती अखंड रात्र बहुतेकांनी जागून काढली. १२ ते १ च्या दरम्यान मध्यम स्वरूपाचे धक्के बसले. पण सव्वा वाजता जरब बसविणारा धक्का बसला. नदीपलीकडील डोंगराची दरड त्या धक्क्याने पडली. घराच्या पडझडीने त्यांची मने सैरभैर होत होती. धरण तर फुटणार नाहीना, असाही धाक सर्वांच्या मनाला होताच पण निसर्गाच्या त्या प्रचंड हादऱ्याला दाद न देता ती मानवी कृती स्थिर होती. अभंग होती व सर्वांना मानवी सामर्थ्याचा दिलासा देत होती.

प्राचार्यांनी आपल्या दोन सहकाऱ्यांच्या मदतीने संपूर्ण कामाचा आराखडा तयार केला. हाती असलेल्या १०–१२ गड्यांच्या मदतीने सर्व काम पूर्ण करण्याचे वेळापत्रक तयार केले. तिघांमध्ये कामाची विभागणी केली. या खेरीज प्राचार्यांच्या दिमतीला श्री. शेडगे हे लेखनिक होतेच. श्री. शेडगे यांनी सर्व पत्रव्यवहार सांभाळला होता. अनेक पालकांची मुलांच्या सुरक्षिततेची विचारणा करणारी पत्रे येत होती. त्या सर्वांना उत्तरे पाठविली जात होती. श्री. शेडगे यांनी शाळेच्या वाचविता आलेल्या सर्व साहित्याची नोंदही ठेवली.

नियोजन पूर्ण झाले. सर्वजण कामाला लागले. त्यातच जवानांची एक तुकडी मदतीला आली. ढिगाऱ्याखाली गाडली गेलेली हरएक चीजवस्तू उपसून काढली जाऊ लागली. काढ-

लेल्या सामानाची वर्गवारी करून ढीग रचले जाऊ लागले कॉटस्, लोखंडी कपाटे, गाद्या, उशा, अभ्रे, मच्छरदाण्या, ट्रंका, पुस्तके, कापड.....सर्व साहित्य शक्य तितक्या पद्धतशीरपणे रचून ठेवले जात होते.

सुभेदार नाईक संकपाळ मोठे उमदे अधिकारी होते. ते स्वतः जातीने जवानांच्या बरोबर सदैव उभे होते. अत्यंत कठीण जागेतील साहित्य स्वतः काढण्यास मदत करत होते. पडायला झालेल्या कलत्या भितीजवळीलही साहित्य मोठ्या शिताफीने बाहेर काढले जात होते. आवश्यक तर अडथळा प्रथम दूर करून झपाट्याने साहित्य बाहेर काढले जात होते. पण हे सर्व करत असताना Safety First हा त्यांचा मुख्य मंत्र


**डोंगरे अप्सरा हेअर ऑईल** तर्फे होणाऱ्या

**" नववधू प्रियदर्शिनी केशभूषा "**

स्पर्धेत भाग घेऊन आकर्षक बक्षिसे मिळवा

**स्पर्धेची ता. २३ फेब्रुवारी १९६८**

षण्मुखानंद हॉल, मुंबई नं. २२

*आकर्षक बक्षिसे*

१. बजाज कुकिंग रेंज ओव्हनसहित
२. एवरेस्ट वॉशिंग मशीन
३. मर्फी ट्रान्झिस्टर रेडिओ
४. रिको डोमेस्टिक मिक्सर
५. इलेक्ट्रिकल हेअर ड्रायर
६. बजाज मोठा प्रेशर कुकर
७. इलेक्ट्रिकल कॉफी परकोलेटर
८. बजाज लहान प्रेशर कुकर
९. बजाज डीलक्स ॲटोमॅटिक इस्त्री इलेक्ट्रिकल
१०. बजाज डीलक्स टोस्टर

प्रवेशपत्रिका भरून पाठविण्याची शेवटची तारीख १ फेब्रु. १९६८

*प्रवेश-पत्रिका अप्सराच्या बाटलीबरोबर मिळेल.*

**बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्याकरिता फक्त**

**के. टी. डोंगरे आणि कं. प्रा. लि.**

८२, नगीनदास मास्तर रोड, मुंबई नं. १

होता. त्या जवानांना काही आठवडे अविश्रांत श्रम करून हजारो ढिगारे उपसावयाचे होते. सुभेदार नाईक संकपाळ यांच्या खांद्यावर 'इंजिनीयर' अशी मुद्रा झळकत होती. ते ज्या कौशल्याने बिकट जागेतीलही सर्व वस्तू काढत होते, त्यावरून ती मुद्रा धारण करण्यास ते पात्र आहेत याची साक्ष पटत होती. थोडयाच काळात साहित्याचे ढीगच्या ढीग रचून त्यांनी त्यांच्या कार्यकौशल्याची व गतिशीलतेची प्रचीती आणून दिली. जय जवान ! ! येथे रोमांचकारी संघर्षातील दुसरे पर्व संपले.

आता ते सगळे मालट्रकची वाट पाहू लागले. मंगळवार गेला, बुधवार गेला. ट्रक्स काही आले नाहीत. गुरुवारी दोन मिलिटरी ट्रक्स आले. ट्रक्समध्ये कोणत्या क्रमाने साहित्य भरावयाचे त्याचा क्रम ठरला होता. प्रथम सर्व विद्यार्थ्यांचे साहित्य, नंतर स्कूल फर्निचर, शाळेचे इतर साहित्य, शिक्षकांचे साहित्य (अनुपस्थितीत असलेल्या शिक्षकांचे प्रथम) व सर्वांत शेवटी प्राध्यापकांचे साहित्य.

आता कामाचे स्वरूप चतुर्विध होते. साहित्य काढवून घेणे; त्याची वर्गवारी करून रचून ठेवणे; त्याचे संरक्षण करणे व ठरलेल्या क्रमानें साहित्य ट्रकमध्ये चढविणे. या कामाला लागणारे मनुष्यबळ तुटपुंजे होते, फक्त १०–१२ राबणाऱ्या हातांनी हा डोंगर उचलावयाचा होता. गुरुवारी दोन ट्रक्स व एक डंफर भरून साहित्य सातारला रवाना झाले.

काल ट्रक्सबरोबर एक-दोघांना पाठवावे लागले. आधीच कमी असलेले मनुष्यबळ आणखी थोडे कमी झाले. तरीही राहिलेल्यांच्या जिवावर गती वाढविणे क्रमप्राप्त होते. गती वाढविली व शुक्रवारी कामाचा उच्चांक गाठला. एका दिवसात

[पृष्ठ ६३ वर]

# फुटून निघण्याचा अधिकार

कम्युनिस्टांचे देशद्रोही धोरण समजावून घ्यायला फारसे खोलात जाण्याची जरूरी नसते. देशाच्या हिताचे त्यांना सोयरसुतक नसते हा अनुभव १९४२ पासून आपण अनेकवार घेतलेला आहे. तरी देखील त्याबाबत वारंवार लिहावे लागते याचे साधे कारण असे आहे की, गेल्या वर्षाच्या प्रारंभापासून आपल्या देशात संयुक्त आघाड्यांचे जे चमत्कारिक राजकारण सुरू झालेले आहे यात सर्व राष्ट्रवादी पक्षांनीही आपल्या तात्कालिक लाभासाठी कम्युनिस्टांची भागीदारी स्वीकारलेली आहे. संयुक्त समाजवादी पक्ष तर आता कम्युनिस्टांच्या बाजूला इतका झुकला आहे की, प्रत्येक प्रश्न रस्त्यावर सोडविण्याच्या तंत्रात तो कम्युनिस्टांची सहीसही नक्कल करू लागला आहे. प्रजासमाजवादी पक्षासारख्या वैचारिक दृष्ट्या बऱ्याच जवळ असलेल्या पक्षाबरोबर हातमिळवणी करावी किंवा नाही यासंबंधी संयुक्त समाजवादी पक्षाचे नेते एकेका शब्दांचा कीस काढत बसतात आणि त्यांच्या ध्येयधोरणाशी ज्यांचे एकाही बाबतीत पटण्यासारखे नाही त्या कम्युनिस्टांची साथसंगत करण्यात संयुक्त समाजवादी नेत्यांची चढाओढ सुरू असल्याचें दृश्य दिसत आहे.

हे सारे आज सुचण्याचे कारण असे आहे की, राज्यसभेत बेकायदेशीर कारवायांवर बंदी घालण्यासंबंधीच्या विधेयकावर चर्चा सुरू होत असताना पी. के. कुमारन् या (उजव्या) कम्युनिस्टाने जे तारे तोडले आहेत त्याची गंभीरपणाने दखल घेतली गेलेली नाही. हे कुमारन्‌महाशय म्हणाले की, भारताचे राष्ट्रीय ऐक्य दृढ करावयाचे असेल तर कोणत्याही राज्याला भारतातून फुटून निघण्याचा अधिकार देण्यात आला पाहिजे. या कम्युनिस्टाला राष्ट्रीय ऐक्याप्रमाणे लोकशाहीचीही तहान लागलेली दिसते. कारण या देशातील लोकशाही जिवंत ठेवायची असेल तर फुटून निघण्याचा अधिकार मिळालाच पाहिजे, असे त्याचे प्रतिपादन आहे.

कोणत्याही राज्याला भारतातून फुटून निघण्याचा अधिकार दिला की, राष्ट्रीय ऐक्य कसे साधले जाईल हे मात्र कुमारनमहाशयांनी जाहीर केलेले नाही. भारत हे राष्ट्र म्हणून एकदिलाने उभे राहायचे असेल तर या राष्ट्राच्या सर्व घटकांनी आपल्या प्रादेशिक महत्त्वाकांक्षेला मुरड घालून भारताच्या हितातच आपले हित सामावलेले आहे असे मानावयास शिकले पाहिजे. महाराष्ट्राचे, मद्रासचे किंवा केरळचे हित आणि भारताचे हित यांत द्वैध असता कामा नये आणि समजा, एका प्रसंगाने महाराष्ट्राचे प्रादेशिक हित भारताच्या हिताशी विसंगत असेल तर आपल्या त्या

# कशासाठी हवा ?

मर्यादित हितावर पाणी सोडून महाराष्ट्राने काय किंवा अन्य कोणत्याही राज्याने काय, भारतीय हिताला अग्रस्थान दिले पाहिजे. राष्ट्रीय एकात्मतेची ही झाली साधी आणि सरळ व्याख्या. ही व्याख्या ज्यांना मान्य असेल ते सारेच पक्ष भारतातून फुटून निघण्याचा कोणालाही अधिकार असता कामा नये असेच मानतील; पण कम्युनिस्टांना मात्र राष्ट्रीय ऐक्य दृढ करण्यासाठी फुटून निघण्याचा अधिकार हाच एकमेव मार्ग दिसतो.

विविधतेतून एकत्व ही कल्पना समजू शकते. परंतु फुटीरतेतून एकत्व ही कल्पना मात्र समजण्यास कठीण आहे. आणि जर का फुटीरतेतच एकता असेल तर मग एखाद-दुसऱ्या राज्याने कशाला, सतरा राज्यांनी आपले स्वतंत्रच संसार मांडावेत. त्यायोगे भारताचे राष्ट्रीय ऐक्यच सतरा पटींनी मजबूत होईल.

हा सारा अतिशयोक्तीचा व गमतीचा भाग सोडला तरी मुख्य मुद्दा आहे तो हा की, कम्युनिस्टांना भारतीय ऐक्याची किंचितही आस्था नाही. भारतातील राज्ये एकमेकांपासून फुटून निघाली तर त्यांना ते हवे आहे. नव्हे; त्याचीच ते वाट पाहत आहेत. तरी राष्ट्र या संज्ञेवर ज्यांचा विश्वास नाही त्यांनी या दृष्टीने प्रयत्न करावेत हे समजण्यासारखे आहे. परंतु आमचे म्हणजे एवढेच आहे की त्यांनी उगाच भारतीय ऐक्याच्या थापा मारू नयेत. या देशाच्या परंपरेबद्दल किंवा इतिहासाबद्दल या मंडळींना किंचितही आस्था नाही. कामगार दिनाच्या दिवशी जसा या मंडळींचा उत्साह उफाळून येतो तसे शिवजयंतीला वा गांधीजयंतीला घडत नाही. बरे, या विचारांशी तरी प्रामाणिक राहावयाचे. तेही नाही ! संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी शिवाजीची गरज लागताच प्रथम त्याला लोकक्रांतिकारक ठरविण्यात येऊन त्याची आरती गायिली गेली. भारतीय राष्ट्रधर्माची प्राणप्रतिष्ठा करणाऱ्या स्वामी विवेकानंदांचे एक भव्य स्मारक कन्याकुमारीला उभारण्याचा प्रयत्न सध्या चालू आहे. कोणताही राष्ट्रवादी माणूस— मग तो कोणत्याही राजकीय पक्षाचा असो— या स्मारकाकडे आत्मीयतेने पाहील. परंतु कम्युनिस्टांना या स्मारकामध्ये प्रतिगामिता दिसते. लेनिनच्या शवाचे दर्शन व्हावे म्हणून तासन् तास रांगेत तिष्ठत बसणे हे पुरोगिमात्वाचे लक्षण आणि आमच्या तेजस्वी राष्ट्रधर्माची आम्हांला ओळख करून देणाऱ्या स्वामी विवेकानंदांचे स्मारक उभारणे म्हणजे प्रतिगामी प्रवृत्ती. कम्युनिस्टांच्या तर्कशास्त्राची ही झलक पाहिल्यानंतर त्यांचे राष्ट्रप्रेम किती दिखाऊ

सदाशिव पेठकर

आहे याची कल्पना यावयास हरकत नाही.

जसे यांचे राष्ट्रप्रेम दिखाऊ तशीच यांची लोकशाहीनिष्ठाही नकली. तेलंगणापासून नक्षलबारीपर्यंत प्रवास करणाऱ्या या पक्षाने उगाच लोकशाहीच्या गप्पा तरी मारू नयेत. परंतु राष्ट्रीय ऐक्य आणि लोकशाही यांबद्दल विसंवादी बोलले तर जनता आपल्या थाऱ्यास उभी राहणार नाही याची कम्युनिस्टांना जाणीव असल्यामुळे ते राष्ट्रप्रेमाचा आणि लोकशाहीचा कळवळा दाखवीत आहेत. त्यांना हवे आहे अराजक आणि त्या अराजकासाठी फुटीर वृत्तीची जोपासना. आणि म्हणूनच फुटीरतेचा अधिकार देण्याने या देशाचे ऐक्य आणि लोकशाही दृढ होईल असा अर्थशून्य युक्तिवाद ते करीत आहेत.

काँग्रेसच्या लोकशाही राजवटीची ते भले कितीही चेष्टा करोत. परंतु एवढी तरी लोकशाही या देशात आहे, म्हणून फुटीरतेचा अधिकार द्या, अशी हे कम्युनिस्ट संभावितपणे मागणी करू शकतात. परंतु कम्युनिस्टांच्या लोकशाही राजवटीत लोकांना विरोधाचा ब्र उच्चारायची परवानगी नसते हे गेल्या पन्नास वर्षांमध्ये अनेक वेळा सिद्ध झालेले आहे. एकेकाळचा राष्ट्राध्यक्ष लिऊ शाओची आज भांडवलदारांचा हस्तक ठरला आहे. काल देवाप्रमाणे भजलेल्या स्टॅलिनचे आज नाव उच्चारणेदेखील रशियात शक्य नाही. आणि कुमारन् आम्हांला सांगतात की रशिया आणि युगोस्लाव्हिया या देशांच्या राज्यांना संघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकार आहे. राज्यांची गोष्ट तर बाजूलाच ठेवा, पण युद्धकाळामध्ये लष्करी बळावर रशियाने पूर्व युरोपातील जे देश गिळंकृत केले त्यांना स्वातंत्र्य देण्याची रशियाची तयारी आहे काय हे एकदा या कुमारनस्वामींनी समजावून सांगावे. तसे असते तर इम्रेनाज प्रकरण उद्भवलेच नसते. आपले रणगाडे दुसऱ्या देशात घुसवून तेथील रशियाविरोधी राष्ट्रीय उठावाचा निःपात करणाऱ्या देशाला लोकशाहीची चाड आहे, असे कुमारन यांना म्हणायचे आहे काय?

कम्युनिस्ट पक्ष सत्तेवर कसा येतो, आणि हाती आलेली सत्ता टिकविण्यासाठी कोणते मार्ग वापरतो याचे अनेक दाखले पूर्व जर्मनीपासून चीनपर्यंत जागोजाग पाहायला सापडतात. त्याकडे आपण लक्ष देऊ नये अशी जरी कुमारन यांची अपेक्षा असली तरी ज्यांना भारताचे ऐक्य आणि लोकशाही या दोन गोष्टींबद्दल आस्था आहे त्यांनी मात्र या कावेबाज प्रचारापासून सावध राहिले पाहिजे. फुटीरतेचा अधिकार मागणारा राष्ट्रशत्रूच आहे याची मनाशी खूणगाठ बांधूनच राष्ट्रवादी आणि लोकशाहीनिष्ठ पक्षांनी यापुढचे संयुक्त आघाड्यांचे राजकारण खेळताना सावधगिरी बाळगावयास हवी. कुमारन् यांच्या भाषणापासून जर काही बोध घ्यायचा असेल तर तो हाच.

○

# रजतवाणी

हे आपले जग कसे निर्माण झाले ?

कुणास ठाऊक !

पण त्याच्या एकेक कल्पना करणे फार गंमतीचे आहे एवढे खरे.

प्रथम काहीच नव्हते. अगदी काहीमुद्धा.

मग देव म्हणाला, प्रकाश !

आणि पहिले झूट प्रकाश आला.

मग देव म्हणाला, आता दिवस आणि रात्र आलटून पालटून होऊ देत.

आणि दिवस–रात्री अस्तित्वात आल्या.

मग पाणीच पाणी आले. मग त्यात जमीन आली. मग त्या जमिनीवर वनस्पती आल्या. त्यानंतर प्राणीमात्र आले. आणि शेवटी आला माणूस. म्हणजे पुरुष. त्याच्याच अर्ध्या भागापासून स्त्री तयार झाली.


वाचताना एखाद्या परीकथेसारखे हे सारे वाटते की नाही ? हेच पडद्यावर सुंदर तऱ्हेने दाखविले तर आणखीच मजेदार वाटेल. 'बायबल' नामक एका भव्य, रंगीन चित्रपटाचा आरंभच या अद्‌भुतरम्य अशा विश्वनिर्मितीने केला आहे.

**जॉन ह्युस्टन यांचा**

## बा य ब ल

रंगांच्या किमयेत हे सारे इतके गूढ आणि देखणे दिसते की काही विचारू नये. 'कशावरून ?' हा आपला सध्याच्या काळातला अश्रद्ध प्रश्न हे पाहताना सुचत-देखील नाही. पहिल्या माणसाने पहिल्यांदाच जागे होऊन ही सृष्टी प्रथमच पाहिली. तो क्षण केवढा थरारून टाकणारा असेल, नाही ? तसेच त्याच्याच शरीरापासून, आत्म्यापासून जन्म पावलेली पहिली स्त्री त्याला समोर अनावृत दिसली तेव्हाचे त्याच्या दृष्टीतले नवल केवढाले असेल ! या 'बायबल' चित्रपटात या पहिल्या-वहिल्या अपूर्वाईच्या प्रत्ययांची झलक पाहायला मिळते.

पहिला पुरुष किती निष्पाप, किती बांधेसूद, किती निःसंकोच आणि मुक्त ! पहिली स्त्री केवढी देखणी आणि नैसर्गिक ! विवस्त्र असून दोघेही अश्लील नव्हेत.



**उत्कट अभिनय**

निःसंकोच पण निर्लज्ज नव्हेत. वस्त्रांवरोबर पुढे अंगी चिकटत गेलेल्या संकोच, ढोंग, वासना, असत्य, असल्या उपाधींपासून पूर्णपणे मुक्त अशी माणसांची ही पहिली-वहिली निर्भर जात आजच्या आपल्या अवस्थेत तर घरी चोरून नेऊन लपवून ठेवावी इतकी लोभस वाटते, बघा.

पहिलीवहिली सृष्टी निर्माण झाली. पशू आले, पक्षी आले, माणूसदेखील आला आणि त्याचा वंश वाढू लागला. पण तेवढ्यात आली भली मोठी जगबूड. हीही देवानेच पाठवलेली. जणू आदिसृष्टीला सचैल आंघोळ घालून तिला नवे रूप देण्याचे. देवाजींच्या मनात होते. आता जगबूड तर आली पाहिजे, सृष्टी तर वाचली पाहिजे.

— — — — — — — —

**वि ज य  तें डु ल क र**

— — — — — — — —

व्हा देवाने नोह म्हणून एक दाढीमिशावाला भला जीव निवडला. त्याला नोटीस दिली की तुमचे येथे अशी अशी जगबूड श्रीकृपेकरून करण्याचे योजिले आहे तरी ते समयी एक मोठाली नाव तयार करून तयारीत राहणे. नोहने रात्रंदिवस खपून एक मोठी नाव तयार केली. आणि जोराचा पाऊस पडू लागला. सर्वत्र महापूर आले. जगबूड सुरू झाली.

पण देवाची नोटीस नोहकरवी मिळालेले एकेक प्राणी आधीच नोहच्या नावेत येऊन बसले होते. नोहचे पावावादन ऐकून प्रत्येक जातीचे थोडे थोडे प्राणी आले. हत्ती आले, सिंह आले, वाघ आले, हरिणे आली, उंट आले, जिराफ आले, झेब्रा आले, बदके आली, कोंबडे आले, कावळे आले, पारवळे आली, पाणघोडा आला, करकोचे आले, म्हैस आणि रेडेसुद्धा आले. सगळे आले. नावेच्या द्वाराशी प्रेमळ दाढीवाला नोह सर्वांचे स्वागत करीत उभा होता. त्याचे मदतनीस सर्वांना त्यांच्या त्यांच्या जागी नेऊन सोडीत होते. घनदाट ढग जमले, गडगडाट कडकडाट सुरू झाले. पावसाचे पहिले मोठेमोठे थेंब टपकू लागले. नावेचे दार बंद करण्याची वेळ आली. कोणी राहिले नाही ना म्हणून नोह पाहू लागला तर दोन कासवे जिवाच्या आकांताने नावेकडे सरक–सरक पुढे सरकत होती. तरी अंतर तुटत नव्हते. जगबूड येऊन पोचली होती पण बिचाऱ्या कासवांना नावेपासून दहा पावलांवरचे अंतर भारी झाले होते. नोह एकदम पुढे झाला नि त्या दोन कासवांना त्याने उचलून घेतले नि नावेत आणले. धडाड्धुम्म्...नावेचे द्वार बंद झाले. बाहेर आभाळ दुभंगावे तशी वृष्टी सुरू झाली. कासवे वाचली.

पण गंमत आहे का ठाऊक? जगबुडीत सापडण्याच्या भीतीत भयंकर वेगाने सरपटण्याने दोघेही बेटी मनस्वी घाबरली होती. नोहने उचलताच दोघातल्या एका कासवाने सुर्रकन दिली नि काय आभाळाला लागलेल्या धारेत आपलीही एक धार सोडून ! नर्व्हसनेस म्हटला म्हणजे तो काय फक्त माणसांनाच असतो नि कासवांना नसतो काय हो ?

हे आपल्याला आवडले. ' बायबल ' चित्रपटात हे पाहताना आपण तर एकदम खूष झालो. नोहची भूमिका उत्तम करून वर कासवांची सायकॉलॉजी इतकी ओळखणाऱ्या जॉन ह्युस्टन या दिग्दर्शकसाहेबांना आपण सलाम केला.

सृष्टी पुन्हा सलामत होईपर्यंत ही सर्व मंडळी आपल्या त्या नावेत गुडुप् करून राहिली होती. सर्व एकत्र ! वाघ, हरणे, सिंह, ससे, कावळे, हत्ती, सगळे एकाच नावेत, पिंजऱ्याच्या सर्कशीशिवाय. अगदी गुण्या गोविंदाने. नोहगुरुजी सर्वांची काळजी वाहत होते. वाघाला दूध, सिंहाला झाडपाला, सशाला गाजरे भरवीत होते. मांसाहार एकदम वर्ज्य– स्ट्रिक्टली व्हेजिटेरियन भोजनव्यवस्था, मंडळी ! नव्या सृष्टीत राहायला जायचे आहे ना ?

आणि वृष्टी थांबली. नाव स्थिरावली. नोहने खिडकीचे जाम बसलेले फळकूट

एकदाचे उडवून बाहेर पाहिले नि त्याच वेळी नावेतला कोंबडा मोठ्यांदा आरवला ! नव्या सृष्टीतली नवी निरभ्र सकाळ उजाडली होती ना !

मग नावेचे द्वार खोलण्यात आले नि नावेतले एकेक चतुष्पाद, द्विपाद रहिवासी दुडकत धावत उड्या मारीत सरपटत नव्या सृष्टीत राहायला गेले. गुरुजी नोह प्रेमळ मुद्रेने हात हलवून एकेकाला सद्‌गदित निरोप देत होते.

वाहाव्वा ! अशी आपली सृष्टी वाचली की नाही, जगबूड आली की नाही ते देवालाच माहीत. पण 'बायबल' चित्रपटातला हा भाग पाहताना वाटले की जग बूड यायची तर अशी यावी, नि एका नावेत बसून असेच वाचावे नि त्यासाठी ह असा एक सर्व प्राणीमात्रात समभाव राखून सर्वांसाठी सारखा झटणारा परोपकारी, प्रेममूर्ती नोह भेटावा !

उरलेला चित्रपटदेखील काही तसा वाईट नव्हता. बायबलमधल्या आणखी काही कहाण्या त्यात अशाच चित्रीत केल्या होत्या—भव्य प्रमाणात, त्या काळचे वातावरण कसोशीने उभे करून, उत्कट अभिनयानिशी, पण त्यांचा रस घेण्यासाठी श्रद्धा आवश्यक होती. आज तीच तर कमी आहे. बायबलच कशाला, आपल्या धर्मग्रंथांकडे तरी आपण किती खऱ्याखुऱ्या श्रद्धेने आज पाहतो ?. मग सगळे चमत्कार भाकडकथाच भासणार. त्याग वेडे आणि अमानुष वाटणार. या चित्रपटातली अखेरची एब्राहामच्या भक्तीच्या कसोटीचीच कहाणी घ्या. आपल्या पुराणात बाळ चिलयाला कांडून ऋषींपुढे त्याचे मांस शिजवून वाढल्याची कहाणी आहे ना, तशी या एब्राहामवर आपले पोटचे एकुलते एक पोर स्वतःच्या हाताने बांधून चितेवर ठेवून भोसकून बळी देण्याची वेळ आली होती. मग अगदी शेवटच्या क्षणाला देव म्हणाला, तुझी भक्ती मला पटली. मुलाला मारू नकोस. भक्त एब्राहाम आनंदित झाला. पण अश्रद्ध मला देवाचा राग आला. केवढे त्याचे क्रौर्य ! पित्याच्या हातून एकुलत्या एका पोराचा बळी मागण्याची कसली ही अघोरी सत्वपरीक्षा ? आणि एब्राहाम तरी कसा याला तयार झाला ?

ही कहाणीदेखील ह्युस्टन साहेबांनी मोठ्या ताकदीने 'बायबल' चित्रपटाच्या अखेरीस चित्रीत केली होती. पाहून मन कसे सुन्न होऊन गेले होते. पण आपल्याला पसंद नोहचाचा आणि त्यांची नाव.

आवा गार्डनर या एरवी मदनमस्त उन्मादक भूमिका करणाऱ्या बाई या 'बायबल'मध्ये आईच्या भूमिकेत पाहायला मिळाल्या. 'बेकेट,' 'लॉरेन्स ऑफ अरेबिया' चा हिरो 'पीटर ओ'तूल तीत देवदूत झाला होता. म्हणजे हे तिघे एकत्रच असत आणि बोलणाराचाच चेहरा उजळलेला राही; बाकी दोघे टोकरी म्हातारीसारखे डोक्यावरच्या पदरात चेहरे लपवून राहत. तीन तऱ्हेचे तीन चेहरे ठेवून ओ' तूलने ही तिहेरी भूमिका केली. पण ही आपली नुसतीच गंमत. या चित्रपटाचा 'हिरो' खराखुरा होता देवबाप्पा आणि तो अदृश्यच राहून आपली भूमिका बजावीत होता

तांत्रिक प्रगतीचा फायदा घेऊन हे साहेब लोक त्यांच्या चित्रपटांचा केवढा प्रभाव पाडीत आहेत, आणि आमचे निर्माते निव्वळ क्षणभंगूर स्वप्नरंजनांचे कारखानदार होण्यात मश्गुल आहेत.

आमच्या ईस्टमॅन कलर 'संपूर्ण रामायण' चित्रपटातसुद्धा राम नसतो, बाकी सर्व काही असते. □





## रंजक शैलीतील इतिहास ललितकलादर्श....

नांदी सुरू झाली आणि पडदा पडला, असे एखाद्या कार्यक्रमाविषयी लिहिण्याची वेळ येऊ नये — त्यातून महाराष्ट्राचे लाडके पु. ल. देशपांडे यांच्या एखाद्या कार्यक्रमासंबंधात तर ती मुळीच येऊ नये — पण ती आली आहे. त्यांनीच ती आणली. गेल्या २२ डिसेंबरला रात्री मुंबई मराठी साहित्य संघात सुरू झालेला त्यांचा नवा कोरा कार्यक्रम चक्क अर्ध्या नांदीत संपला. लोक समाधानाने घरोघर गेले.

हा कार्यक्रम होता ललितकलादर्श नाटक मंडळीच्या हीरकमहोत्सवाच्या प्रारंभानिमित्त, 'ललितकलादर्श नाटक-मंडळी' असेच त्याचे नाव होते. आजच्या या ज्येष्ठ नाटक-मंडळीचा इतिहास. पु. ल. देशपांडे यांनी काही कथनाने, काही प्रात्यक्षिकांनी असा

□

ज्ञानेश पेंढारकर : नारद
नानासाहेब फाटक : वृंदावन

प्रेक्षकांपुढे ठेवला. नृत्य–गायन–वादन–स्लाइड्स आणि नाटयप्रवेश इतक्या गोष्टींचा समावेश या प्रात्यक्षिकात होता. या जोडीला विनोदाची पखरण असलेले कथन होते.

कथानकाविषयी काही लिहिण्याची गरजच नाही. बटाटयाची चाळ असो, गांधीजींचे सत्याचे प्रयोग असोत, की नाटक मंडळीचा इतिहास असो, पु. ल. देशपांडे या साऱ्यालाच आपल्या शैलीदार कथनपद्धतीने एक ललित स्वरूप देतात. या कार्यक्रमाच्याच वेळी माझ्या शेजारी बसलेले एक प्रेक्षक म्हणाले की, या गृहस्थाने रामरक्षा म्हटली तरी लोक तिच्यावर खूष होतील. या विशिष्ट कथनात नाही म्हटले तरी सनावल्या, नामावल्या आणि ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाच्या पण रुक्ष घटनांची रुजुवात पु. ल. देशपांडे यांना बंधनकारक ठरली. तरीही या बंधनात या हाडाच्या बहुरूपी माणसाने शक्य तेवढी रंजकता आणली. संयुक्त ' मानापमान 'चा इतिहास वर्णन करताना गंधर्व आणि ललितकलादर्श या दोन मंडळयांत भूमिकांची कशी वाटणी झाली ते त्यांनी असे सांगितले : ' इतर भूमिकांच्या वाटणीचा प्रश्न आला तेव्हा एकजण म्हणाले की शिपाई ललितकलादर्शचे राहतील, चोर मात्र गंधर्व मंडळीचेच असू द्यात. (प्रेक्षागारात मोठा हशा. जवळच्या ग्लासातले घोटभर पाणी पिऊन चष्म्याच्या भिंगावरून प्रेक्षकांकडे मिष्किलपणे पाहत, हलकेच पण सर्वांस ऐकू जाईल असे) म्हणजे त्या काळात चोर सत्तेवर नव्हते. (प्रचंड आणि दीर्घ हशा. पु. ल. देशपांडे आपण हे बोललोच नाही अशा शालीन मुद्रेने पण बारीक किलकिल्या टारगट डोळयांनी हसून लोळणारे प्रेक्षागार न्याहाळीत उभे.) अशा विनोदी ' जागा ' बरोबर, एखाद्या जागी काही भावपूर्ण क्षणही त्यांनी प्रेक्षकांना दिले. केशवराव भोसले, बापूसाहेब पेंढारकर यांची अकाली घडलेली देहावसाने त्यांनी साजेशा जड, हळुवार आणि हळव्या शब्दांत – स्वरांत वर्णन करून प्रेक्षागाराला विषादाने चुकचुकायला लावले. पण याहीपेक्षा 'ललितकले'चे विद्यमान मालक भालचंद्र पेंढारकर यांच्या स्वभावाचे वर्णन करतांना दौऱ्यावर असता रागावून परतीच्या गाडीत बसलेल्या एका नटाकडे जेवणाचे ताट घेऊन स्वतः पेंढारकर कसे गेले आणि ' रागावलात तर रागवा पण राग अन्नावर नका काढू, एवढे जेवून मग हवे तितके रागवा, ' असे सांगून त्यांनी त्या नटाला जेवायला कसे लावले अशा प्रकारचे हृद्य तपशील निवडून ते साजेशा सहृदयतेने पेश करण्यात पु. ल. देशपांडे यांची मार्मिकता आणि कथनातले चातुर्य, दोन्ही चांगली जाणवली. या जोडीने त्यांनी योजलेली प्रात्यक्षिकेदेखील निवडीतला रंजकतेचा दर्दी हिशेब दाखविणारी होती. ' ललितकलादर्श 'चे एके काळचे नट दामूअण्णा मालवणकर यांना त्यांनी ' प्रेमसंन्यास 'मधला ' दरखास्त कैफीयत फैसला 'ची वीरश्री संचारलेला गोकुळ विसरभोळे रंगमंचावर उभा करायला लावला. ' ललितकले 'चे दुसरे भूतपूर्व नट नानासाहेब फाटक यांचा हातखंडा ' वृंदावन ' त्यांनी एका ठिकाणी

प्रेक्षकांपुढे ठेवला. ज्येष्ठ संगीत नट भार्गवराम आचरेकर यांना कृष्ण बनवून 'सौभद्रा'तला 'प्रिये पहा रात्रीचा' चा शृंगाररस आळवायला लावले. परशराम सामंतांना 'सत्तेचे गुलाम' मधला भंपक पुढारी 'मार्तंडराव' बनवून या भूमिकेतील मैदानी 'वक्तृत्वा'चा एक चुरचुरीत नमुना प्रेक्षकांना ऐकवला. भालचंद्र पेंढारकरांची मुलगी गिरजा हिला 'शारदा' करून रंगमंचावर आणले आणि 'मूर्तिमंत भीति उभी' विलक्षण प्रभावीपण रंगमंचावर उभी केली. 'नूतन पेंढारकर' याच उपनावाने एकदा सर्वपरिचित असलेल्या मास्टर दामल्यांना 'बा रे पांडुरंगा' हा 'संन्याशाचा संसार' मधला कारुण्याने ओथंबलेला अभंग गायला लावला. या जोडीला हिराबाई बडोदेकरांचे जुने, गाजलेले 'राधेकृष्ण बोल' हे भजन पुन्हा साग्रसंगीत त्यांनी हिराबाईंच्याच मुखातून ऐकवले. राम मराठे आणि रामदास कामत हे आजचे दोन लोकप्रिय गायक-नट दोन जुन्या पदांच्या गायनानिमित्ताने त्यांच्याच भूमिकेत रंगमंचावर आणले. नट वा गायक नसलेल्या तपस्वी नेपथ्यकार पु. श्री. काळे यांना रंगमंचावर आणून, प्रेक्षागृहात कडाडून पडलेल्या टाळीवर अर्थपूर्ण हसत पु. ल. दे. काळे यांना म्हणाले, 'काळे साहेब, ही टाळी पडायला नव्हे बरे का, ही तुम्हांलाच!' एरवी प्रेक्षकांना पाठ दाखवून 'ललितकले'ची नाटके वाजविणाऱ्या गोविंद पटवर्धनांना प्रेक्षकांना सामोरे बसवून पेटीवर 'चंद्रिका ही जणू' चा मजा करायला त्यांनीच लावला. केशवराव भोसल्यांची एकुलती एक खूप जुनी रेकॉर्ड एका जागी प्रेक्षकांना ऐकायला मिळाली. अशा प्रात्यक्षिकातून सहजगत्या मराठी रंगभूमीची आणि 'ललितकले'ची परंपरा प्रेक्षकांपर्यंत पोचली. संगीत, विनोद आणि तत्त्वबोध या तीन पारंपारिक प्रमुख वैशिष्ट्यांची ओळख नव्याने वा जुनीच नव्याने आजच्या नाटकप्रेमी प्रेक्षकांना झाली.

ही प्रात्यक्षिके दाखविणारे कोणी वयोवृद्ध होते तर कुणाला पुरती समजही आलेली नव्हती. कधी एखादे प्रात्यक्षिक लांबू लागले तर एखादे रेंगाळले. नियंत्रकाच्या सफाईने आणि कलावंताच्या सहृदयतेने अशा वेळी पु. ल. देशपांडे यांनी तेवढे आवरून-सावरून कार्यक्रम पुढे सरकवून दिला, त्याची गती खिळू दिली नाही. परिणामी दोन तीन घटका प्रेक्षकांचे कम-जास्त पण रंजन झाले, 'ललितकलादर्शन'चे कर्तृत्व आणि महत्त्व त्यांच्या मनावर ठसले, जुन्या मराठी रंगभूमीवरील उत्तम संगीत, उत्तम अभिनय, उत्तम विनोद यांचा दिपवून टाकणारा साक्षात्कार न घडला तरी चुणूक मिळाली. नानासाहेब फाटकांचा रुबाबदार मर्दानी 'वृंदावन', गिरिजा पेंढारकर हिची अम्लान, कोवळी 'शारदा', गोविंद पटवर्धनांनी जादूच्या बोटांनी पेटीवर वाजवलेली 'चंद्रिका', या संस्मरणीय जागा.

अशा या कार्यक्रमाची अखेर नांदीने करताना पु. ल. देशपांडे म्हणाले, या कहाणीला शेवट नाही. मराठी रंगभूमीच्या आणि 'ललितकले'च्या या नाटकाला भरतवाक्य नाही, ते अजून पुढे असेच किती तरी काळ चालूच राहणार आहे. आजचा

या कार्यक्रमाचा हा शेवट हाच भविष्यकालीन ' ललितकले 'चा आरंभ आहे, म्हणून नांदीने तो व्हावा हे क्रमप्राप्तच आहे.

कार्यक्रम अर्घ्या नांदीत संपला तो असा–उज्ज्वल भविष्याचा शुभारंभ सुचवीत; आणि सादरकर्त्यांच्या कसबाची पुन्हा एकवार साक्ष पटवीत.

प्रेक्षकांचे समाधान झालेले दिसले—माझे असमाधान मात्र तेव्हापासून वाढले आहे. ज्याने उत्तमोत्तम नाटकेच लिहायची त्याने इतिहास किंवा सत्याचे प्रयोग कितीही रंजकतेने सादर केले तरी समाधान कसे व्हावे आणि का व्हावे ?

पद्मश्री पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे, नाटक हवे, नाटक. O

## □ " स्टेनलेस " पान

भारतात येणाऱ्या ' सामान्य ' परदेशी माणसांच्या भारत-विषयक मतातही काही वेळा मोठा आशय सापडू शकतो. उदाहरणार्थ, काही दिवसांपूर्वी शर्ले मॅक्लीन ही जगप्रसिद्ध अमेरिकन चित्र–तारका दिल्ली पाहून गेली तेव्हा शहरात हिंडतात पान–विड्यापासून कुतुब–मिनारापर्यंत अनेक गोष्टींवर तिची मते ऐकायला मिळाली पानवाल्याचे दिवसाचे उत्पन्न काय ? तो सरकारी जागेवर बसला आहे काय ? मुलांना विडा खायला उत्तेजन का देत नाहीत ? जर विडा लज्जतीखातर खात असतील तर ' स्टेनलेस ' विडा का शोधून काढीत नाहीत ?


जुम्मा मशीद : " मला जुम्मा मशीद आतून पाहण्याची विशेष उत्सुकता नाही. उलट त्या मशिदीच्या बाहेरच्या पायरीवर जे लोक बसलेले असतात त्यांच्याबाबत माहिती करून घेणे मला अधिक आवडेल."

कुतुब मिनार : ' पिक्‌निक स्पॉट ' म्हणून उपयोग होण्याची शक्यता सोडली तर हा एक ' अनावश्यक ' मनोरा आहे.

## □ ब्राझिलमध्ये भारतप्रेम

भारताच्या हल्लीच्या कठीण परिस्थितीमुळे भारताबद्दल बऱ्याच देशांत अव-हेलनेची भावना आहे. याची बेचक जाणीव प्रत्येक देशप्रेमी भारतीयाला आहे, परंतु ब्राझिलसारख्या एका दूरच्या देशात भारताबद्दल प्रेम असून ते वाढत आहे. अशी सुखद माहिती एक ब्राझिलमन भारत–प्रेमी प्रा. अल्वारो मेडिरोस यांनी नुक-तीच भारत–भेटीत दिली. गांधीजींच्या लिखाणामुळे मेडिरोस ' प्राच्यविद्या–तज्ज्ञ ' झाले. " वयाच्या सोळाव्या वर्षापासून गांधींच्या शिकवणीचा माझ्या मनावर फार मोठा परिणाम झाला. ते प्रत्येक माणसाला आदर्शभूत होते."

ब्राझिलमधील जनतेला भारतीय गूढवादाचे फार आकर्षण वाटते, आणि या आकर्षणामुळेच सर्व देशभर योग–संस्था स्थापन झाल्या आहेत. उच्च स्तराच्या ब्राझिलियन मंडळींत तर भारतीय संस्कृतीचे अनुकरण करण्याची फॅशन पडली आहे.



# पुस्तके

ा. चंद्रशेखर बर्वे

वाङ्मयीन अपेक्षापूर्तीचा आनंददेखील बहुधा दुर्लभच असतो. पण भाग्याची गोष्ट अशी की 'मृत्युंजय' ही कादंबरी हा आनंद भरभरून देणारी आहे. या कादंबरीतला काही भाग आधीच प्रसिद्ध झालेला होता; आणि त्यायोगे कादंबरीच्या संपूर्ण स्वरूपाविषयीच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. आता पूर्ण कादंबरीचं प्रकाशन झालं आहे; आणि सुदैवानं अपेक्षा पूर्ण करण्याचं उदंड सामर्थ्य तिच्यात आहे. कादंबरीतल्या काही खटकणाऱ्या

## साकार झालेले सूर्यस्वप्न

गोष्टी, काही खुपणारी वैगुण्यं मान्य करूनसुद्धा गौरवोज्ज्वल भाषेतच बोलावं लागावं, एवढं सौंदर्य या कादंबरीला लाभलं आहे. अतिशयोक्तीचा दोष पत्करूनही असंच म्हणावंसं वाटतं की, कर्णाच्या जीवनावरच्या या कादंबरीच्या रूपानं झळाळणारं सूर्यस्वप्नच प्रभावी रीतीनं साकार झालं आहे

मराठीमध्ये ऐतिहासिक कादंबऱ्या जेवढ्या आहेत, तेवढ्या पौराणिक कादंबऱ्या नाहीत. ऐतिहासिक व्यक्ती,

## 'मृत्युंजय'

त्यांच्याविषयीच्या अपुऱ्या माहितीमुळे धूसर होतात; पण पौराणिक व्यक्ती त्यांच्या विराटपणामुळे व गूढतेमुळे सारख्या पसरतच जाणाऱ्या असतात. त्यामुळे चित्रणासाठी त्यांना डोळा भरून पाहणं महत्प्रयासाचं ठरत असावं ! आकाशाच्या कडा पकडू पाहणाऱ्या दृष्टीनं शेवटी कुठंतरी थटून आपलीच बिदुली शतश: गोळा करीत परत फिरावं, तसं कादंबरीकारांच्या दृष्टीला परत फिरणं भाग पडत असावं ! आणि म्हणूनच ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या तुलनेनं पौराणिक कादंबऱ्यांचं लेखन कमी होत असावं ! त्यामुळेच, ' ययाती 'सारख्या अपेशी ठरलेल्या (अर्थात हे अपयश देखील असामान्यच) मराठी कादंबऱ्यांची गणती करायची ठरवली तरी तीही फार करता येऊ नये, इतकं मराठीत पौराणिक कादंबऱ्यांचं दुर्भिक्ष्य आहे. या पार्श्वभूमीवर ' मृत्युंजय ' ही कादंबरी उठून दिसते.

कर्णाच्या जीवनावर, मराठी साहित्याच्या प्रांतात, तसं आजपर्यंत वेगवेगळ्या रूपान लिहिलं गेलं आहे. ' व्यासपर्व 'मध्ये दुर्गाबाई भागवत यांनी कर्णाच्या जीवनाचा अन्वयार्थ लावला आहे. ' कर्णायन 'मध्ये कर्णाच्या चरित्राचं दर्शन, शक्यतो महाभारताचंच अनुसंधान राखून गो. नी. दांडेकर यांनी घडवलं आहे. ' पहिला पांडव ' हे शिवरामपंत परांजपे यांचं नाटक, ' महारथी कर्ण ' हे औन्धकरांचं नाटक, ' कौन्तेय ' हे कुसुमाग्रजांचं नाटक—ही नाटकं कर्णाच्या उत्तरायुष्यातलं नाट्य व्यक्त करण्यासाठी अवतरलेली आहेत. ' कर्ण ' ही मर्ढेकरांची संगीतिका कर्णाचं दैवग्रस्त पौरुष दाखवण्यासाठीच स्फुरलेली आहे. ज्यांची सहज आठवण झाली अशा ललित वाङमयकृतींचा उल्लेख इथं केला आहे. पण कर्णाच्या जीवनावर हे जे लिहिलं गेलं



रथचक्र उद्धरूं दे...

आहे ते असं–म्हणजे एवढं अल्प–आहे; आणि त्यापेक्षाही कर्णाचं जीवनच मनाचा असा वेध घेणारं आहे की कुणीही प्रतिभावंताला पुन्हा एकदा कर्णाच्या जीवनावर लिहिण्याचा अनिवार मोह व्हावा. रणजित देसाई यांची 'राधेय' ही कादंबरी 'आगामी' म्हणून यापूर्वीच जाहीर झालेली आहे....आणि शिवाजीराव सावंत यांची 'मृत्युंजय' ही सातशे पृष्ठांची प्रदीर्घ कादंबरी नुकतीच पुढे आलेली आहे.

सावंत हे अगदी तरुण! अवघ्या विशीतच कर्णाच्या जीवनाभोवती मंडलांवर मंडलं घेऊ लागले. "अनिवार्य नियतीचं गरगर फिरणं, जिवानं हिमालयाएवढ्या संयमानं सहन करीत जगायचं असतं" हा कर्णाच्या जीवनचक्राचा केंद्रबिंदू त्यांना सापडला तो या मंडलांतूनच! जो कोणी जीवनात कुठंना कुठं एकदा तरी पिचला असेल, त्यालाच कर्णाच्या जीवनाचं हे मर्म प्रकर्षानं जाणवेल; इतकंच काय पण जो कोणी जीवनात कधीही पिचला नसेल त्यालाही पिचण्यात काय जीवन असतं हे कर्णाकडे पाहिल्यानंतरच कळेल", असं त्यांना वाटतं. हे सगळं कादंबरीच्या सुरुवातीला त्यांनी सांगितलं आहे–'अर्घ्यदान' करताना!....कर्णाच्या जीवनाचं एवढं आकर्षण या तरुणाला का? प्रतिभेच्या पलित्यानिशी कर्णाच्या मनःकुहरात खोलवर शिरून धांडोळा घेण्याचं हे पिसं कुठलं? आणि झपाटलेल्या अवस्थेतही स्थिरचित्त राहून कर्णाच्या जीवनावर वेगवेगळ्या बाजूंनी भेदक प्रकाश-झोत सारखे फेकणं साधलं तरी कसं? एवढं यश कोणत्या तपश्चर्येपोटी ?.... असे प्रश्न कादंबरी वाचून झाल्यावर जे मनात येतात, त्यांची उत्तरं या सुरुवातीच्या 'अर्घ्यदाना'तून मिळू शकतात.

## निःसंग प्रवास

असे प्रश्न मनात यावेत असंच खरोखर या कादंबरीचं श्रेय आहे. हे श्रय सावंत यांना लाभलं याचं एक कारण अगदी उघड आहे. वर्तमानकालीन समस्यांचा, संघर्षांचा स्पर्श आपल्या पुराणकथेला त्यांनी होऊ दिला नाही. प्रचलित सामाजिक जीवनातल्या अस्पृष्टांच्या–पददलितांच्या–जीवनमरणाचा आशय सूतपुत्र कर्णाच्या कथेच्या चौकटीमध्ये भरण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही. वर्तमान जीवनाकडून पुराण जीवनाकडे जाताना स्वकालीन गोष्टींची गाठोडी त्यांनी टाकून दिलेली दिसतात; आणि या दृष्टीनं निःसंग होऊन मुक्त मनानं प्रवास केलेला दिसतो. कर्णाच्या जीवनाचं–त्याच्या मनाच्या कुरुक्षेत्रावर सतत चाललेल्या प्रकाशतिमिरातल्या तुंबळ संग्रामाचं–शुद्ध कुतूहल त्यांना होतं, म्हणूनच केवळ कर्णाच्या जीवनाचं चित्रण त्यांनी केलं. हे चित्रण करताना वर्तमानाचं विस्मरण त्यांनी होऊं दिलं आहे; पण पुराणाचं भान मात्र सारखं जागतं ठेवलं आहे. त्यांना जे श्रेय लाभलं त्याचं हे एक कारण!

ही कारणमीमांसा एवढ्यावरच संपत नाही. तिच्यावर आलेल्या अकरणात्मक (निगेटिव्ह) बाजूपेक्षा तिची करणात्मक (पॉझिटिव्ह) बाजू अर्थातच अधिक लक्ष्य-

णीय होय. वर्तमानाचा वाचकांनाही विसर पडावा असं पौराणिक वातावरण निर्माण करणं सावंत यांना फार चांगलं साधलं आहे. या कामी भाषेचा उपयोग त्यांनी खुबीनं करून घेतला आहे. प्रचलित मराठी शब्दांत अप्रचलित संस्कृत शब्दांची अशी काही मिसळण त्यांनी करून टाकली आहे, की त्यामुळे वर्तमान व वाचक यांत नकळत दूरता उत्पन्न व्हावी, संमिश्र शब्दप्रवाहाबरोबर वाचक आपोआपच पौराणिक वातावरणात जावा. या वातावरणाची नेमकी व उत्कट प्रतीती येते ती, पौराणिकाला बहुधा मुळातच असणारं भव्यतेचं, प्रचंडपणाचं परिमाण सावंत यांनी कादंबरीत जे प्राप्त करून दिलं आहे त्यामुळे ! यज्ञ, स्वयंवरं, राजसभा, वीरस्पर्धा, रणसंगर अशा प्रसंगांचं, या प्रसंगीच्या तप्त भावभावनांचं, मुद्रेवर होणाऱ्या त्यांच्या आत्यंतिक परिणामांचं, त्यापोटी होणाऱ्या आक्रमक हालचालींचं डोळे विस्फारित करायला लावणारं वर्णन सावंत यांनी केलं आहे. हे वर्णन अशा वकुवाचं आहे की पौराणिकतेच्या भव्यतेचा, प्रचंडपणाचा अफाट प्रत्यय सहजासहजी यावा. अशा वर्णनामुळ वाचक त्याच्या चिमुकल्या वर्तुळातून अलगद उचलला गेला आणि ताडामाडाएवढचा उंच, वडापिंपळासारख्या घेरेदार पौराणिक व्यक्तींच्या अतिविस्तृत परीघ असलेल्या जगाकडे मन फाकून पाहू लागला, तर त्यात नवल नाही. सावंत यांना जे श्रेय लाभलं आहे त्याचं हे अधिक महत्त्वाचं कारण !

केवळ वातावरणनिर्मिती हेच एखाद्या कादंबरीचं उद्दिष्ट होऊ शकेलही ! पण जाणत्या वाचकाचं तेवढ्यावरच समाधान होईल असं वाटत नाही. प्रत्यक्षात जे दिसतं, त्याच्या मागे जे असतं, त्याचा अंतर्वेध घेणारी कादंबरी प्रौढ वाचकाला आनंददायक वाटली तर ते स्वाभाविकच होय. मुळात अर्थशून्य असलेल्या आपल्या अस्तित्वाला अर्थ देण्याचा प्रयत्न माणूस वेगवेगळ्या पातळ्यांवर करीत असतो आणि कुणी अनाकलनीय शक्ती (नियती ?) कोणत्या ना कोणत्या रूपानं आघात करून ते प्रयत्न विफल करून टाकत असते. या सतत चालणाऱ्या द्वंद्वाचं निरनिराळ्या बाजूंनी चित्र काढणारी कादंबरी जीवनजिज्ञासू वाचकाला अधिक प्रिय वाटली तर त्यात नवल नाही. 'मृत्युंजय'मध्ये कर्णाच्या ( व त्यासाठी इतर संबंधितांच्या ) जीवनाचा अंतर्वेध घेण्यात आलेला आहे; मानव व नियती यांच्यांतल्या द्वंद्वाचं चित्र काढण्यात आलेलं आहे. मग ती कुणाला आनंददायक वाटली नाही, प्रिय झाली नाही तरच आश्चर्य ! खरं म्हणजे अंतर्वेध घेऊन मानव-नियती-द्वंद्वाचं चित्र काढता काढता, प्रत्यक्षात लांबी-रुंदी ही दोनच 'डायमेन्शन्स्' असणाऱ्या दृश्य जीवनाला त्या चित्रात खोली हे तिसरं मनोगम्य 'डायमेन्शन' प्राप्त करून देणं हे मुळातच कठीण आणि महाभारतासारख्या एखाद्या महाकाव्यातल्या मुळातच तिसरं 'डायमेन्शन' लाभलेल्या जीवनचित्राला पुन्हा एकदा तेच जास्त सघन स्वरूपात प्राप्त करून देऊ पाहणं हे आणखीच महाकठीण ! पण सावंत यांनी हे महाकठीण करून

[पृष्ठ ५६ वर]

महादेव मोरे

# लोडना

सांचं मळयास्नं घराकडं आलो. भाईरल्या सोप्यावर आज जरा न्यारंच कायतरी चित्र दिसत हुतं. जररोजींगत म्हातारा एकलाच चिलीम वडत बसाय न्हवता; तर त्येच्या मोत्यामोर भावकीतला मायंदाळा गोतावळा जमला व्हता. धाकला काका व्हता. मदला व्हता. त्येंच्या दोगी वायकाबी हुत्या. आनी गिजवन्यास्नं आल्याला थोरला मामाबी हुता. समद्यांचं आपापसांत कायतरी ख्यासफ्यास चाललं हुतं. त्येंनी आज काय क्याट् काडलं हुतं, कुनाला दक्कल; पर मी जोता चढून जवा वर गेलो, तवा मिटभर सारी क्याचब्याच् थांबली; नि पान पालटल्यावानी मदला म्हनला,

"काय नामा – आता आलास ?"

आता हे त्येलाबी दिसत हुतच की ! खरं उगंच आपलं तोंडदेखलं इचारनं झालं... ह्यो काका सदा आपला घुम्मन घुस्यावानी असतोय. त्येचा तालामाला गावणं कठीण. मी का ह्येला वळकत न्हाई ? भावकीतल्या समद्यास्नी, तसंच पै-पाव्ह-ण्यास्नीबी मी तसा वळखून हाय ! तरीबी आता ह्येनं इचारलंय, तवा बोलायलाच पाहिजे – आसं यवजून म्हणालो,

"व्हय, आता आलो गा..."

तसा म्हातारा बोलला, "जा, घासभर खावून घे जा कोर-तुकडा. ईळभर मळयात तंगाय् लागतंय्. फेसलटून जातंय मानूस; त्येनं लै भुका लागत्यात."

## दाल्ल्याचा एकदा अदाज लागला, त्यचा पाचपोच कळला, त्येची उडी कुटवर हाय ह्येचा एकदा अदमास आला की बाईल चढलीच डोसक्यावर!

※

"आगा, ह्ये वयच त्येचं उमतीचं. ह्या वयात लागायच्याच लै भुका!" मामा म्हणाला.

तशी काकीबी म्हणाली, "जेवून साटक्यान् ये बघू हिकडंच; तुजच काम हाय हितं बाबा!"

यावर काका उनातला, "तू गप्प बस गऽ, ये जा बाबा; निर्मळवानी खावून ये जा. काय हितं अजून लगीनघाई उसळली न्हाई का काय न्हाई!"

मी आत गेलो. न्हाणीत जावून घसासा हातपाय' धुतलं खळाळा चूळ भरली, नि डुईचा पटका काढून त्येनंच तोंड पुसत चुलीजवळ गेलो. पाटावर बसकन् मारीत आयेला म्हणालो "वाड मला!"

तशी तिनं पितळी फुडं वडली, नि तीत मुगुण्यातला 'भात उपशीत म्हणाली, "घासभर खा तू निवांतवानी; नि -भाईर जावून काय म्हंतील त्याला 'हूं' म्हन. आपलाच गोतावळा हाय सारा. उगंच कुनाचा पानउतारा नको... नस्ता हूंमदांड गावा करू नकोस, काय म्हंतो?"

"आज समद्यास्नी चळ भरलीया का काय! अशी का हुमान घाटल्यावानी बोलाय लागलाईसा सारी? कसल हेटाक् तरी कसलं काढलंय आज?"

ऐकू यीत नसल्यागतीनं आये वागत हुती. तिनं भाकरीचं कडाप् पितळीत टाकलं, डाळीच्या आमटीची झाकणी म्होरं

सारली. वाळवून ठेवल्याल्या हारबुऱ्याची भाजी आज केली व्हती, भाजीत आसक्या आसक्या लवंगी मिरच्या टाकल्या हुत्या... तोंडाला पानीच सुटलं. आज ईळभर वाकून वाकून पेंडकी फोडून उसाला पानी पाजविल्यामुळं कमरंची माकनहाडं दुकाय लागली व्हती. मी पार मेंडाळून गेलो होतो. सपाटून भुका लागल्या व्हत्या मला. पितळी पुढ्यात येताच मी तुटून पडलो. हातांची तोंडाची झटापट् करताना भाम् गेल्यागत झालं... तीन–एक भाकरी मुरगाळून झाल्या. आतमाराम गार झाला तवा आयेला काय इचारलं ते मला आटीवलं! मी मान वर उचलून आयेकडं नदर टाकली. तिनं आपल्या गुडघ्यावर हाताचा कोपरा टेकिवला व्हता; नि हाताच्या मुटक्यावर हनुवटी. तिनं मघापास्नं माझ्याकडच टक लावली व्हती जनू.

"म्या काय इचारतोय ?" मी इचारलं, "तुज कान हैत का भिताड हैत !" लहर फिरल तवा अशी खॅस माराय् शिकलो हुतो मी. ह्या अलीकडं अलीकडंच ही सवं मला लागली व्हती... आईच्याबी हे सारं आंगवळणी पडलं हुतं..

"जेव की गप्पवानी. तुला कशाला घोर पडलाय त्येचा ? काळजी करणार माप हैत मान्स आपली. तुला आंगुपती कारभार कशाला ?" आई म्हनली.

यावर मीबी जास्त वाडाचार लावला न्हाई... 'खरखर मुंड्या 'गत खाल मान घालून जेवाय लागलो. मला कायच समजंना उमजंना...उरल्यालं जेवान कसं तरी वाच्वाच् करत आरगलं नि हातावर पानी पडताच भाईर आलो.

म्हाताऱ्याफुडं सारी घुपळा कसून बसली व्हती. लै लांब न्हवं, लै जवळ न्हवं आसा मी बसलो – मागच्या भित्तीला टेकून. मग खिशातनं चंची काढली नि अडकित्त्यानं सुपारी करारा कातरत इचारलं,

"का गा – सगळी गप्पशी ? 'आळीमिळी गुप्पचिळी' घातलीया का ?"

"तसं न्हवं, पर तुजंच तर काम हाय. उद्या पोर्गी पगायला जायचं हाय लिप्पाणीला..." मामा म्हणाला.

"पोर्गी आनी कुणाला ?" न उमजून म्या इचारलं, "कुनाचं लगीन करायचं घाटलंय ?"

"आनी कुनाचं परक्याचं ? काय व्हैक म्हनायचं बाई एकेक ! आरं लेकरा – तुजच की लगीन, आनी कुनाचं करणार हाव् आमी ?"

"पर काकी, मला कशाला घोटाळ्यात पडतासा आताच ? ह्या एकल्यापनी निर्मळ हाय की ! मला नाय बा आताच लगीन करायचं, वाळ्ळा लोडना गळ्यात !"

"म्या म्हनतो ते ह्येच !" म्हातारा ठिसाकला, "ह्यो गव्रु माजं मानायचा न्हाई, आसा तसा बढायचा न्हाई, म्हणून तर तुम्हा समद्यास्नी गोळा घाटलंय ! आता सांगा ह्येला !"

तसा मदला म्हणाला, "व्हय गा नामज्या, लगीन करून घेणार न्हाईस तर काय

आसाच स्वट्टभैरी न्हाणार हैस ?"

" का जोगता हून जोगवा मागत हिंडणार ?" म्हातारा तिड्यानं बोलला, " व्हय बा, सांग तुज्या मनात काय हाय ते ! मान्सानं कसं साळढाळ असावं..."

" खरं आताच काय इक्ती गडबड हाय ? माजं का वयं झाली ? का वारगिच्या दुसऱ्या पोरावानी वागाय लागलो–वळूगत !"

" तसं आमी म्हनलाव का ? उगंच आपला येडाला खोड लावत न्हावू नको ! हे बघ – जरा इचार कर, तुज्या आईनं असं किती दिवस बड्याडायचं, राबायचं ? चार म्हनी हुत्या त्या लगनं झाल्यावर चार दिसंला उडाल्या. न्हाता न्हायला तू. आता उमतीत आलास, मोठा झालास. तवा एखादी बायकु आणून आईची चुलीपास्नं सुटका करशील, म्हातारपनी तिला चार घास सुखानं खाऊ देशील का आपलं 'मी लगीनच करत न्हाई 'चं तुणतुणं वाजवत न्हाशील ? तूच असा सोगा पाडल्यावर म्हातारा–म्हातारीनं कुणाच्या तोंडाकडं बघून काळ काढायचा, सांग बघू ?"

आसं बरंच कायबाय बोलून साऱ्यांनी माजा घामटा काडला. बुक्कीनं बकाका बुकलावं, तसं केलं... समद्यांनी असं यरगटून घेटल्यावर मी रंजीस आलो. मला कायबी सुद्रंना झालं... तरीबी शेवटची धडपड केलीच, " पोर्गीचं चलनवलन कसं काय हाय; आपला–त्येंचा धागादोरा जमतोय का न्हाई, हे समदं साजीलवार बघशीला..."

" नामज्या, तुज्या परास घा पावसाळं तरी चढ काढल्यात आमी; तू आमाला कश ाला शिकीवतोस ? समदा हूम काढलाय्. पोर्गीला एक डाव बघूनबी आलाव पोर्गी म्हंशील तर माणीकमोती हाय नुस्ती. आता बघशीलच तू !"

यावर बोलण्यासारखं कायच न्हायलं न्हाई... नंदीबैलागत मुंडी हालवून, 'कायबी करा, तुमच्या म्होरं मी न्हाई,' असा म्हनालो नि वस्तीला मळ्याकडं निघालो – जररोजींगत... मळ्यात आलो. हांतरूनावर आंग टाकलं. पर झॉप काय येत न्हवती... मनात काय काय भिरंबिटत हुतं ! कुस ह्या आंगाला, त्या आंगाला– आसं सारखं चालू व्हतं.... मग पाटचं कवातरी डोळ्याला डोळा लागला.

आनि सकाळचं जागा झालो ते धाकल्याच्या आवाजानं. त्यो सारखा हाळ्या घालत होता– " नामज्या...नामज्या... " त्यो असा कोकलतच माज्याजवळ आला. त्येनं लडाडा मला हालवून उटीवलं.

" आरं उठ मर्दाऽ; तुला काय काळजी हाय का न्हाई ? आज जायाचं न्हाई व्हय् लिप्पाणीला–पोर्गी बघाय् ? "

" मग मी कुटं न्हाई म्हंतोय. जौया की ! "

" आरं व्हय्. पर हचो आट्टाला आटपायचा कवा तुजा ? "

" मला काय लगनातल्यावानी वाजत गाजत न्हेणार हैसा काय ? "

" पर न्हा–धू; तयारीत तरी न्हा की ! आजून गाडीवर सवारी घालायची

हाय, ती घाल; नि गावांत चिऊन ये. काय म्हंतो ? "

"बरं..."

"मग मी आता चलू ?"

"चल. ह्यो मी लगुलग आलोच मागुमाग !"

गाडी न्हिवून जवा मी दारात उभा केली तवा समदी तयारीतच हुती. खरं माजी अजून न्हारी व्हायची हुती; म्हणून बैलं सोडली. तितच जॉला बांदली. बावकाडावर चाबुक व्हलपटला नि आत जावून न्ह्यारी केली. शिळ्या भाकरी हुत्याच. त्येच्यावर बचाकभर घै वतून घेटलं; त्यात चिमूटभर चटणी टाकली, आनी त्ये समदं कालवून दोन भाकरी मुरगाळल्या. मगच भाहीर आलो...घडुचीवरच्या पोत्यावर आईनं माजी कापडं काढून ठेवली हुती, पांढरं धोट धोतार. भोकाभोकाचं गंजिप्रास, मखमाली पैरण नि आर घालून रंगिवल्याला हिर्वा पटका... आंगावरची कापडं काढून ती समदी घाटली. पटक्याचा शेमला चांगला दोन हात काडला. भित्तीत आरश्याचा तुकडा चिणला व्हता, त्यात नोकझोक बघिटला. मिश्यांचं कंगाल वर केलं. दाभणागतीनं त्येनला टॉच आनली नि मगच भाईर आलो.

"झाली का तयारी ?" मी मामाला इचारलं, "निगायचं ?"

"हां, निघूया की...बैल जुप्प तंवर ..."

तसा मी गाडीजवळ आलो. जॉची बैलं सोडली, जू त्येंच्या खांद्यावर ठेवलं, सापत्या बांधल्या; नि बळीबंकागत पांढराघोट असल्याल्या 'सरदाऱ्या'च्या पाठीवरनं हात फिरवीत, भाहिरल्या सोप्यातच कॅल्ब्याल् करत ऱ्हायल्याल्या मान्सास्नी म्हंटलं, "हं. बसा बघू सारी चटाटा गाडीत...शिळोप हाय तंवरका पोचूंया; माग्नं उनाचं आनी बैलं फेसलटून जायाला नगत."

म्हातारा–म्हातारी, दोगं काका, त्येंच्या बायका, त्येंची पोरं, गिजवन्याचा मामा.. समदी गाडीत बसली. गाडी भरून गेली. लगनाच्या वऱ्हाडागत. यवढ्या समद्यांचं काय काम हुतं कुनाला दक्कल–वाळ्ळ्या रानी बैलास्नी कार म्हनायचा !

...लिप्पाणीची शीव दिसाय् लागली, तवा दिस चांगलाच वर आला हुता. चन्नाना ऊन बडवाय् लागलं हुतं...गावाभाईरला जकातनाका वलांडून फुडं जाताच म्या इचारलं, "कुटं घ्यायची गाडी ? कुनीकडं हाय ते घर ?"

गाडीवर सवारी चढविल्यानं आत सावली झाली हुती. त्या सावलीत सारी निवान्तवानी पेंगत हुती...माजं बोलणं कानावर आदळताच म्हाताऱ्यानं डोळं उघडलं जनुं. कारन, त्येनच पयल्याझूट इचारलं, "काय म्हनालास ?"

"कुनीकडं हाय ते घर ?" पुन्यांन्डाव म्या इचारलं.

"दबीव गाडी अशीच–साकरवाडीवर. तितच घर हाय ते."

"आमी हायच रस्ता दावाय्–दबीव् बैलं तू !" मागनं आनी एक आवाज आला–ह्यो मामाचा हुता.



**सांग बये ऽ आता का पळून आलीस ?**

...त्या घराजवळ गाडी उभी -हायली, गाडीच्या चाकांचा, कडाण्याचा नि बैलांच्या गळ्यातल्या घुंगरांचा आवाज ऐकून त्या घरातनं एक बापय् गडी भाहीर आला. आमाकडं बगून मग त्यो मटचा आगतीनं गाडीजवळ आला. आत नदार फिरवून त्यो घटकाभर यडवडून गेला. मग म्हणाला, "आं... ? तुम्ही व्हय्... या...या..."

सारी गाडीतनं उतरल्यावर मी बैलं सोडून जॉला बांदली. येतावक्ती गाडीतल्या घोंगड्याखाली वाळ्ळ्या गवताच्या चार पेंड्या टाकल्या व्हत्या त्या काडल्या. बैलाम्होरं टाकल्या...यदुळका सारी आत गेली हुती, म्हणून मीबी गेलो.

त्या बापयानं पालपट्टी खाली हातरली हुती, नि हातपाय धॉय पानी दिलं हुतं...साऱ्यांनी पाय गार केलं. चुळा भरल्या नि आत येऊन बसली.

"काय सांगावा न्हाई, फिंगावा न्हाई; आवचीत आलासा ?" त्यो बापय्गडी म्हणाला,

"आसं कसं हुईल हो—त्या शिलीमन कासारानं सांगावा दिला न्हाई ?" म्हाताऱ्यानं इचारलं.

"न्हाई बा...सांगावा पोचता तर आमी सारी तयारीत -हात हुताव् का न्हाई, सांगा की ?"

" आर त्येच्या वायली ऽ, त्या कासारच्या ! असं त्यंगाड् झालं व्हय् सगळं; मग वाळ्ळी येडताकपट्टी झाली म्हणायची आमची... "

" तसं कसं हुईल...आता बलवाय् लावून देतो की पोरीच्या आईला नि पोर्गीला. "

" कुटं भाईर गेल्यात् व्हय् त्या ? "

" भाईर आनी कुनीकडं न्हाई खरं. गेल्यात तंबाखूच्या कामालाच, हाय हितं जवळच वखार. बलवाय् लावून देतो की कुनाला तरी... " आणि त्यो भाईर गेला...

तसा म्हातारा म्हनाला, " ह्योच पोरीचा बा म्हनायचा. "

यावर ' अस्सं, अस्सं ' म्हणत एक-दोघांनी मान डोलावली.

लगट त्यो भाईरनं आत आला. म्हणाला, " आता येतीलच एवढ्यात, तवर जरा इस्त्राटा घ्या... "

तसा मी काकाला म्हणालो, " काका, तोपतोर मी जरा बाजार करून यिऊ? "

" हे काय आनी तुजं मदीच हेटाक् निघालं ? एवढा कसला आर्जंट बाजार नडलाय् तुजा ? "

" बाईच कुळती नि पेंड घ्याची हुती गा. घरातली कालच सपली. बैलाफुडनी राच्चं कुळतीचा भरडा न्हाय् तर पेंडचा खडा नसला तर ती चवताळल्यागत करत्यात...वैरणीला त्वांडबी लावत न्हाईत म्हणून म्हणतो ! "

" बरं आन जा तर. खरं भिगिद्यान् ये. उगंच हिकडम्–तिकडम् करत बसू नको काय म्हंतो ? "

" न्हाय्, लगोलग जातो ते लगट परत येतोच ! " आनी मी भाईर पडलो.

मी बाजार करून आलो. कुळतीचं नि पेंडच्याच्या खडच्यांचं चुंबडं गाडीत टाकलं नि आत आलो. तवा पोर्गी यिऊन पाटावर बसली हुती...एकूण बघणं–देखणं चाललं हुतं तर ! दारात माजा साऊट पडताच तिनं मान वर उचलली नि बघिटलं... आता तिचं रूप माज्या नदरस पडलं. ती लै काय गोरी नव्हती का काळीढुस्सबी नव्हती. हुती आपली काळीसावळीच. पर तिचं रूपडं देखणं हुतं. नांगराच्या फाळा-गतीनं टोकदार नाक हुत. नाकात चमकी हुती. तिच्यातला पांढराधोट खडा चमामा चमकत हुता. मळीच्या जमिनीगत काळभोर डोळं हुतं तिचं; नि गाल गोबरं हुतं... किती ल्हानखुरी वाटत हुती ती ! का पाटावर ती मुसून बसली हुती, कुनाला दक्कल ! आपुनला इक्ती बारकुळी बायकु ..? मनात मिरंबटू लागलं–ही शोभल आपुनला...?

सगळी आवराआवर झाली. आग्रेव झाला म्हणून कोरतुकडा खाल्लाबी...मग. येतावख्ती म्हाताऱ्यानं इचारलं,

" हं, काय नामा ऽ तुजं काय मत ? ऱ्हावू दे न्हवं–बायकु ? "

" माज काय आसायचं...? खरं ती लै बारकुळी दिसती...लै ल्हान्... "

"ह्या पोराचं आनी एक काय तरीच बघा! " काका म्हणाला नि त्यावर गाडीतली सारी हसाय् लागली...

"अहो, ही लै वारकुळी हाय; कुठं तरी तीन–चार पोराची बाई मिळाली तर बघा; म्हंजे ती तरी हचेच्या मनात भरंल ! " मामानं बोलून घेतलं. तशी आई माज्या मदतीला धावली,

"समदी असं फाडून खाता व्हय् त्येला ! प्वार अजून भावरथी हाय, त्येला वाटायचंच आसं. बायकाच्या जातीतलं काय कळतंय त्येला ! "

"लक्ष्मी, तू आजून त्येला थानचं लेकरूच समजतीस व्हय् ? " मामा बोलला. मग माज्याकडं वळून म्हणाला, "नामज्या, तू काय असलं मनात आणू नकोस... मर्दा, पोरीच्या जातीला वाढ लै असती. अगदी हुडागत वाढल्यात हां हां म्हणूस्तंवरका ! हाळदीचं पानी पडल्यावर बगशीलच तू तिला, वळखूनबी येणार न्हाई तुला ती ! "

समद्यांनी मत्तुन घेतल्यागत बोलणं चालू केलं व्हतं, म्हणून इचार केला–सगळ्यांच्या मनातच हाय तर जावू दे काय व्हायचं तें; आनी मी गुमान बसून गाडी दवडू लागलो...

पर गाडीत बोलणं चालूच व्हतं, " पोर्गी तर नक्षत्रावानी हाय. कुटं नाव ठेवाय्लाबी जागा न्हाई. आनी ते घराणंबी गरीब हाय. आपल्या आरातलं हाय...आपल्यासारख्या कुरवड्यास्नी आशीच गरिबाघरची पोर्गी पायजे–शेताभातात कामं करायची–सवरायची असत्यात; तवा उगंच बड्या घरचा घास घिऊन काय उपेग ? वाळ्ला डेबाजा भोगला तर त्यो कडंवर जात न्हाई...कड गाठलं आसं वागावं मान्सानं. गोष्ट खरी का वावगी ! "

ह्या समद्यांनी माजं लगीन करायचं यवजलंय, पर पैशाचं कसं काय ? लगीन म्हंजे काय वाळ्ळ्या तोंडाची गोष्ट हाय ? त्येला खर्च्या काय कमी येतोय् ? आमचं तर सगळं आसं फाटल्यालं...चारीकडं चार दशा...त्यो काका येगळा, ह्यो येगळा, आमी येगळं...बामणाचा मळा तिजाईनं केलाता त्यो मतोर समद्यांच्या समाकात व्हता, यवडच. न्हाईतर सगळी फाटक्या सोग्याची व्हती ! म्हणून मी इचारलं,

"ते सगळं व्हय् खरं, पैशाची काय जोडणी ?"

"आता बघाऽ, हे प्वार किती श्यानं हाय ते ! कुणी 'खुळं' म्हनलं तर 'ओ' देणार हे ! तुला रं कशाला ही उचापत ? आमचा बामण माप गबरगंड हाय की! काय लागलं सवरलं तर काडायचं त्येच्याकडनं. त्यो काय न्हाई म्हंतोय् ?"

आखीर व्हायचं तेच झालं...लगीन झालं नि येस्वदा घरात आली. म्हातारा–म्हातारी हारकून पानी झाली, त्येनला वाटलं, सून घरात आली, आपुनला सुखाचं दिवस आलं. निर्मळवानी बसून कोरतुकडा खायाला गावंल. जेवान्पानी, धुणं–सवरणं ह्यासारखी समदी उसाभर एकदा सुनंवर टाकली म्हंजे झालं ! मला दिकून

आसंच वाटलं. म्हातारं हुस्तोवर आयेनं ह्यो गाडा रेटला. आता तिच्या खांद्यावरचं वज्जं जरा हालकं हुईल, वाईच इस्वाटा घ्याय् मिळंल...आणिक मळचात राबायला घरचं हाक्काचं एक माणूसबी हुईल...कामाचं वडाप् भरारा उपसाय् बरं—अशा माज्या उडचा हुत्या.

लगीन झाल्यावर ' हाळद काडायला ' म्हणून पाच दिवस मला सासुरवाडीला न्हेलं...नव्या जावायाचा तेगारा तिथं मी भोगला. डेबाजामदी मिरीवलो; खरं पोलमीनं न्हायलो. कुनाला वावगं वाटाय् सारखं वागलो न्हाई; नि कुनाकडनं 'सर' म्हणून घेटलं न्हाई...ह्या पाच दिसामदी बायकुच्या घरचं एक एक समजायला लागलं...लगनाआदी तशी काय म्हायती मला तरी न्हवती. पर आता व्हाय् लागली...बायकुचा थोरला भाऊ मिलीट्रीत हुता. त्येच्या पाठच्या तीन म्हनी कवाच उजिवल्या हुत्या. आनी चौथी म्हंजे ही—येस्वदा. सगळचात ल्हान हीच. ही तर आताच माज्या गळचात बांदली हुती—लोडण्यागत. आनी तिचं आई—बा बीनघोरी झालं [हुतं. बा तंबाखूच्या खळचात, का दुकानात हमाली करायचा; आनी ही, हिची आई नि हिची वयनी तंबाखूच्या खळचात कामाला जायच्या. अशी सारीच राबणारी, म्हणून खाऊनपिऊन टुमटुमीत न्हायल्याली व्हती...

पाच दिस झाल्यावर मी सासुरवाडीस्नं परत आलो. संगट बायकुलाबी आंडलच. ती लटकुटक्यागत म्हायारलाच चिकटून न्हायाय् बगत हुती. तिचा बाबी म्हंतोय—कसा— " न्हावू दे हितं आनीक आठवडाभर, इत्की वर्सं हितं रुलल्यालं, यवढचा लौकर म्हायारची वड सुटत नाही..." सश्याला खळगा जामीन म्हंत्यात न्हवं—तशातली गत ! पर मी बदलो न्हाई. " बायकुला न्हेणारच मी " म्हणून बसलो ! तवा चट् सारी घयंगटीला आली, गुळूमुळू कराय् लागली... खरं, शेवटपतोर मी ताठच न्हायलो...मग करत्यात काय ?

निघतावख्ती आपल्या आईच्या गळचात पडून बायकु हमसून हमसून रडली, तिच्या आईनंबी गळा काडला. बाचं तर दोन्ही डोळं डबडबून आलं. त्यो भरल्या आवाजांत बोलला,

" जावाई पावनं, ही पोर घरात सगळचात बारकी, लाडायेडांत वाढल्याली; चुकभूक हुईल संवरल, तिला सांभाळून घ्या. जाचणूक करू नका ! "

यावर मलाबी वाईट वाटलं...त्येच्या बोलण्यावर ' हां हूं ' करत मान डोलावली, नि भाईर पडलो.

बायकु घरात आली, खरं नाव् नाव् न्यारच गुण दावायला लागली...तिला जेवानपाण्याचं काई सुद्रत न्हवतं. कवा आमटी कर म्हनलं तर झुणक्यागत करायची, नि झुणका आमटीगत. कवा कोरड्याश्यात वाईच मायंदाळी चटणी टाक म्हनलं तर हूंऽ म्हणून टाकून तिखाट डोम करून ठेवायची, तर कवा बामणाघरचं वरान् खावावं तसं सपक्सार करून टाकायची. भाकरी कवा करपून घुळ्ळा करा-

यच्या, तर कवा कच्च्याच काढायच्या...आनी शेतातल्या कामाच्या नावानंतर सारा शिमगाच. तिला शेतातलं एकबी काम निमत न्हवतं !

सारीच चितागतीत पडली...आई तर उठताबसता म्हनाय् लागली– "काय म्हणून माज्या लेकराच्या गळात ह्यो लोडना बांधला आसंल म्हंतो ! आता माज्या पोराचं कसं व्हणार...?"

कवा तरी मग मला सांगणं व्हायचं– "तू तरी एका शब्दानं सांगून बग बाबा... आमी तर हात टेकलाव् तिच्या म्होरं ! "

यावर कवा मी तर गप्पच बसायचा नि कवा म्हणूनबी दावायचा,

"तुम्हीच करून आनलंय् न्हवं तिला. आता तुमचं तुम्हीच बघा की ! मी 'न्हाई न्हाई' म्हणून पाय मागं वडत हुतो. खरं तुम्हीच बळंनं घोड्यावर बशिवलंसा मला आता त्येला मी काय करणार ? निस्तरा तुमचं तुमीच ! मी ह्राय, माजा मळा ह्राय, उगंच मला ह्या खोड्यात कशाला आडकतासा ?"

चुकी त्येंचीच हुती, म्हणून सारी मुकाट बसायची...खरं, मी आसं बोललो तरी मलाबी हे वंगाळ दिसायचं...

एका दिशी राच्चं मळ्याकडनं घरात आलो...जेवाय् बसलो. तर एक मरडा खावावा, तसं जेवान्. ना चव, ना रव. दिळसारी मळ्यांत राबराब राबायचं नि शिवो ऽ म्हणून घासभर खायाला यावं, तर ही तऱ्हा ! डोस्कं भिरंबाटून गेलं. उठलो. वडली दारा ऽ रा बायकुला. पेकाटात चार लाथा घाटल्या, बकाका बुकललं...नि मळ्याकडं निघून आलो...!

सकाळचं न्हारीला घराकडं आलो, तर घरातली सारी डोस्क्याला हात लावून बसल्याली ! येस्वदा उपाटली ! ती कुटंतरी ! का हिरी आडात पडली ? राच्चं मारलं ते चुकलच जनू !

आयी म्हणाली, "आता काय करायचं लेकरा ! आपलं नशिबच दळींदर, म्हणून आसली पोर्गी पदरात पडली आपल्या...आता कुटं उपाटली आसंल बग ! का हिर–आड जवळ केला तिनं ? ह्या आलीकल्या पोरींचं काय सांगता येतंय् ? नुकतंच लगीन झाल्यालं, असं काई बरं वाईट झालं तर आपल्या घराण्याला बट्टा लागायची पाळी का न्हाई !"

"हिरी–आडात पडली तर पडली," मी बी चक्रावून गेलो, "आपुन तिच्या नावानं आंगुळ करून मोकळं हुया ! ही गेली, दुसरी आणाय् ईल; ठेचला एक पोर्गी गावती या; पोरीस्नी काय तोटा !"

"खरं, हे आसं झाल्यालं ऐकून कोण आपली पोर्गी द्याय् धजल व्हय ह्या घरात ! ते न्हावू दे आता, तू लगुलग जा बघू लिप्पाणीला. बाच्या घरात तर उंडगी न्हाटलीया का काय बघ जा, तितं गावली तर गत्‌काळीच्या झिपऱ्या धरून टरारा ऽ वडून आण जा !"

मग मी उठलोच. तरारा निघालो. सासुरवाडीला आलो. येस्वदा आपल्या बाकडंच आली हुती...मी घरात शिरल्यालं बघून ती आत सरली. सासरा भाहीरच हुता. चवड्यावर बसून भकाका चिलीम वडत हुता. त्येच्याम्होरं मी उभा ऱ्हायलो, नि बिरूबाच्या जत्रंत डोलकाठी नाचिवत्यात तसा हात नाचवीत म्हणलो, "ह्येचा काय मतलब ? आँ ? मी काय म्हंतो—ह्येचा काय मतलब ?" रागानं मला दुसरं काई बोलणंच सुदरना !

"आलायासा तसं हात पाय तरी ध्वाँ, वाईच टेका तरी; उगंच आग लागल्या-वानी वरडलं की लै श्यानं म्हंत्यात व्हय् ?" सासऱ्यानं उलट मलाच चापलं नि तोंडातनं भाक्दिशी धुराचा एक ढग सोडला !

बाचं बोलणं ऐकून येस्वदानं पाण्याचं तप्यालं आणून उंबऱ्यावर आदळलं हुतं... आच्चुती ठेवलं न्हवतं, आदळलं हुतं...! ह्येचा मतलब न समजण्याइत्का मी काई बैलोबा न्हवतो...म्हंजे, आजून मामला गरम गरम हुता तर ! ह्येचावी वजावट्टा कवातरी काढीन बरं बये !

मी तप्याल् उचललं. भाहीर यिवून हातपाय धुतलं, चूळ भरली, नि धोतराच्या सोग्यानं त्वांड पुसत सासऱ्याजवळ यिऊन बसलो. तसं त्येनं इचारलं,

"हं, काय म्हंतासा ? खुलम् खुल्लं सांगा बघू सगळं !"

"सांगायचं आनी काय मामासाब ? इचार ऱ्हाई, पाचार ऱ्हाइ आसं आवचीत निघून याचं म्हंजे काय्; त्येला काय रीतभात हाय का ऱ्हाई ?"

"आता रीतभातीचं काडलासा म्हणून बोलतो, जावईबापू—उठसुटचा कुट् करायचं म्हंजे काय रीत झाली ? पोरीची जात हाय, ल्हान हाय, आजून रुळा-यची हाय; सैपाकमैपाकाचं शिकायची हाय, तिला आसं जर माराय लागला तर ते काय जनावर हाय व्हय हो ?"

"म्हंजे तुमाला खेकटं काडायचं हाय तरं ! " म्या इचारलं.

तसा सासरा यडबाडला! एकदम त्येचा आवाज खाली आला. म्हणाला,

"छॅ: छॅ:, आमी खेकटं करणारी मान्सं न्हवं बा !"

"मग उगंच वाडाचार कशाला; आतां फुडं काय ते सांगा ! मी तिला ऱ्हायला आलोय् !" वट्टात मी सांगितलं.

"मग न्ह्या की...आमी काय दावं बांघून दावनीला बांधलंय् व्हय् तिला ? बायकु तुमचीच हाय. तुमचाच तिच्यावर हाक्क हाय. आमचा सपला लग्नादिशीच ! पर आम्चं म्हन्नं काय तर तिच्याबरोबर वाईच गोडीगुलाबीनं वागा...आहो, सर्क-सीत हात्ती, सिन्व्हांसारखी जनावरं माणसाळून त्येनला काय काय शिकीवत्यात, आनी हे तर मान्सासारखं माणूस..."

"ते सारं खरं मामासाब, पर सर्कसीत जनावरास्नी शिकवाय् रिंगमास्तर आसतोय् आनी त्येचा चाबूकबी बघिटला आसशीला तुमी....? म्हंजे तसं हिला

शिकवाय् पायजे म्हंतासा ?"

"आत्ता बघा बाऽ आमी मतयापनानं सांगाय् गेलं की तुमी टांगाय् जातासा !" आसं म्हणून सासरा मुकाट बसला. त्येचा चेरा आसा फुगला की, सासऱ्याच्या घरात जावाई रुसलाय् आसं वाटावं ! पर मी त्येचा सासरा न्हवतो; म्हणून हे सारं उलटंच गाडं वाटत हुतं ! न्या 'च कंत्राट हुतं सारं !

येतावख्ती रस्त्यात येस्वदा मुकाट हुती. म्हणून मी बी तसाच...उगंच 'यांय् यांय्' करीत गोंडा घोळाय् मी काय बाईल्या न्हवतो, तिच्या आरी गेल्याला न्हवतो...! मी ताठच हुतो. नि तसाच वागत हुतो ! दाल्ल्याचा एकदा अंदाज लागला, त्येचा पाचपोच कळला, त्येची उडी कुटंवर हाय ह्येचा एकदा अदमास लागला की बाईल चढलीच डोस्क्यावर...! म्हणून आसं काई मी हूंऽ दिलं न्हवतं... तोंडाला मुस्कं घाटल्यावानी दोगंबी तसंच गुमान गावापतोर आलाव्...

आल्यावर तीन-चार दिवस हून गेलं...आयी तिच्याकडनं मंगळून कामं करून घेत हुती...एकंदरीत सारं बरं चाललं हुतं...वाटलं, आता गाडं लागलं रुळाला. कसंतरी कुचंबत का हुईना, खरं चालाय् लागलं...

मनात मी आसलं इमलं उठवत हुतो; पर कसचं काय नि फाटक्यात पाय ! एक दिवस ती गेली की उपटून परत ! हिची माय् व्हले ऽ, आता काय करावं ह्या बायलीला ? काय जाचणूक न्हाई, फिसणूक न्हाई, आंजारून गोंजारून वागिवलं तरी पळून जायाचं म्हंजे काय ? आँ ? बायकु पळून जाती म्हंजे गावात केवडी नापत ! केवडी नामुस्की ! बायलीऽ हिला काय करावं आता ? ही आशी पळून जाय् लागली तर रातघ्याड् हिच्यावर खडापारा ठेवला पायजे म्हनायचा ? का हिच्या गळयात दावं बांधून ते हातात धरून बसाय् पायजे ! एक एक व्हैकच म्हनायचं !

आतल्या आत आसं घोटून घिऊनबी काय उपेग ? हातबी आपलंच, व्हटबी आपलंच. मारलं तर दुकतंय नि चावलं तर रगात येतंय ! तवा झक मारत परत गेलो– सासुरवाडीला. सांगतोय कुनाला ? घरातल्यांनी लगनाचं ग्याट काडलं म्हणून ते न्याट् लागलं म्हनायचं ! ते आता निस्तराय् पायजे !

सासरा घरातच हुता. गब्रुचं दोपारचं जेवान् आटपलं हुतं वाटतं, म्हणून जेवून तलंगा लावला हुता त्येनं. मला लांबलचक पासलला हुता गडी, नि घोरतबी हुता..

"मामासावऽ!" म्हणून मी जोरानं हाळी घाटली, तसं गडयानं डोळं उघडलं नि मला बघताच सटपटला माहूर नि उठून बसला. जांभ्या देत म्हनाला, "या जावाईबापू ! लै उनाचं येनं केलंसा ?"

मनात आलं– आता काय करावं ह्या लाजमुंड्याला ! भरल्याघरातनं वाळ्‌ळ्या-रानी पोर्गी पळून येती, ह्येची हेला काय लाजबिज हाय का न्हाई ? का ती कोळून प्याला ह्यो नि निरसंग बनला ? ह्या हुबाल्या बेन्याचं काय करावं, समजंना

मला ! मी माट्दिशी खाली बसलो. गावापास्नं केल्याल्या पायपिटीनं तोंडाला फेसच यायला बाकी उरला हुता...! म्हणालो,

"हे बघा मामासाब, त्यो पाव्हणंपना दावायचा ऱ्हावू दे, तुमच्या लेकीला पैलं बलवा माहीर ! आखीरडाव तिला इचारतो...सळ्ळंपनी नांदायचं हाय का आसंच पळून याचं हाय ते !"

"आँ ? पळून आली ती ?"

"मग काय सांगून आली ? तसं आसतं तर संगट सोबतीला म्हणून मुराळी-बिराळी धाडला असता का ऱ्हाई ?" आणि म्हनलो "मामाऽ, उगंच येड पांघरून पडपासरी पडगावाला जायाचं काम ऱ्हाई; आतमदी कुटं दडून बसली आसंल तर जरा बलवा माहीर तिला...मी काय दांडगावा कराय् आलो ऱ्हाई, संजाईतमदीच इचारनार हाय तिला; तिच्या मनात नांदायचं नसलं तर सोडचिट्टी द्यायचीबी तयारी हाय माजी ! हंऽ, बलवा माहीर, उगंच आनमान नको !"

तसं सासऱ्याला कैचीत धरल्यागत झालं...पायतानानं मारल्यागत त्येचं तोंड उतरलं. कोरडया व्हटावरनं जोम फिरवत त्येनं पोर्गीला हाळी मारली, तशी ती दाराच्या चौकटीला आली. आर्धी आड, आर्धी माहीर आशी दिसाय लागली.... घरात दुसरं कुणी बाईमाणूस ऱ्हवतं. तिची वयनी नि आई तंबाखूच्या कामाला ढासळल्या असतील...ही एकली माज्या तडाक्यात गावली हुती...आडवी उभी तासलून काढाय बरं हुतं ! हिचा ह्यो खेडमा म्हातारा हुता, त्यो काय करणार हुता व्हळीकणीचा !

"हंऽ, सांग बयेऽ, आता का पळून आलीस ?" ती चौकटीला यिऊन उभी ऱ्हायल्या पेट्टाला मी इचारलं, "हंऽ, बोल घडाघडा ! आशी तोंड शिवल्यागत उभा ऱ्हावू नकोस ? काय तुला मारलं सवरलं, का तुजी जाचणूक केली, का येळंला आन्न दिलं ऱ्हाई, उपाशीतापाशी ठेवलं; का नेसायसंवराय धडुतो दिली ऱ्हाईत ? सांग, काय झालं सांग ?"

यवडं इचारलं खरं, ती गप्पच. काय बोलंना, सवरना ! चुकी तिची हुती. मिंदी झाली हुती, म्हणून बोलतीया कसं ? तोंड नको बोलाय ? तसं परत मीच बोललो,

"खळयात तिवडा रवल्यात तशी उभा ऱ्हावू नकोस ! काय ते 'व्हय-ऱ्हवं' सांग; का पेकाटात लात बसाय पायजे एक ?"

यावर ती लटपटली. तिला वाचा आली. म्हणाली,

"मला...मला गमंना झालंतं तितं...आई-बास्नी बघावं सारखं वाटलंतं...."

'न गमाव काय आटंग्या वनांत ऱ्हीवून टाकलं हुतं तुला ? आनी आईवाला बघाय त्येनला भेटून दोन तीन म्हैने तर झालंतं का ? भरल्या घरातनं उठतीस नि पळून येती...काय लाजबिज हाय का ऱ्हाई तुला ? आताचं आसं, तर फुडंला काय दिवं लावणार तू. कसला परपंच्या करणार ?"

" आसं आडीच कांड्यावर इवूं नका जावाईबापू...पोर, ल्हानाची थोर हितं झाल्याली. तवा इतक्या लौकर हिकडली वड कशी कमी हुईल...? चार दिवस हिकडं, चार दिवस तिकडं...आसं– चालायचंच..."

" तुमी आसं म्हंतासा, खरं. आसा पोरख्योळ खेळायला आमाला काय दुसरी कामं न्हाईत व्हय ? एक दिस खाडा झाला तर मळ्यात गाडीभर काम तुंबतय... तुमाला सांगून पटायचं न्हाई ते...ही आसं वागाय जर लागली तर आमचं निभायचं कसं? बरं, हिनं यायचं तर सांगूनसवरून याचं का न्हाई ? आमची आई एक हारणकाळजीचं माणूस...जर येळंला त्या बापडीला काय काय वाटत आसंल... आता तुमीच इचार करा मामासाब, आसं जर व्हाय लागलं तर हिचं कठीण– दिसतंया नांदणं !"

" आता तुमीच आसं हातपाय गाळल्यावर कसं जमणार ? बायकु नांदत न्हाई, ही तुमालाच नामुष्की आणणारी गोष्ट हून बसंल ! आता ती हिकडं पळून येती, ह्यात आमची काय चुकी हाय ? का आमची तिला फूस हाय, का 'तू बाई पळून ये' म्हणून आमी तिला सांगावा धाडताव ? व्हय् बाऽ ते तर सांगा ! आता तिला न्हचा जावा. ती कसं नांदत न्हाई ते तुमचं तुमी ठरवा ! तिला तुमच्या घरात दिली तवाच तिची सारी जिम्मेदारी तुमच्यावर सोपिवली...तिचं कायबी करा जावा. 'का बा' म्हणून आमी इचाराय आलाव तर पाच पायतानं मारा आमाला, मग तर झालं ?"

सासऱ्यानं आसा उलटा मलाच खोडा घाटला ! मी चमकून गेलो. घरातली तशी, ही माहीरली अशी...आनी बायकु तर इचाराय नको...काय म्हणून माज्या गळ्यात ह्यो लोडना बांधला आसंल ! कुनाचं मी वाईट चिंतलतं का केलंतं ? मग काय म्हणून आशी वाळ्ळचारानी उराला वाळू लावून घ्याची पाळी आणली देवानं माज्यावर ?

बायकुला गावाकडं आणली. खरं ह्या एकाच इचाराचा खोंबारा मनाला सारखं ढुसनी द्याय् लागला...ह्या लोडन्याचं काय करायचं...? ह्यो लोडना...ह्यो लोडना...

दुसऱ्या दिशी मळ्यात पानाचा खुडा हुता. खाऊची ती पानं तोडता तोडता वास्कराच्या येस्वंतानं इचारलं,

" नामज्या नाव, नाव ठकतच चाललाईस; एवढा कसला घोर लागलाय बाऽ तुला ? "

" घोर आनी कसला येस्वंता; हे लगीन करून गळ्यांत बायकुचा ह्यो लोडना बांवलाय् न्हवं...! तवापास्नं काई दिकून सुद्रना झालंय् मला बघ..."

" का, काय झालंय् असं ? "

मग मी त्येला सगळं सांजिलवार सांगिटलं...मन हालकं झाल्यागत वाटलं.

डोस्क्यातली जिद्द उतरल्यावानी झाली...

माजं सांगून झाल्यावर त्येनं इचारलं, " बरं, आता मला हे सांग नामज्या, लगीन झाल्यापास्नं आजून तू कोराच हैस का न्हाईस ? "

" म्हंजे ? "

" म्हंजे असं–तू अजून मळचात झोपतोस का घरात ? "

" मळचात...पर का बा ऽ ? "

" इत्का भावरैथी कसा तू ? " खदाखदा हासत येस्वंता म्हणाला, " आजून स्वट्टमैरीच हैस बग ! मर्दा, लगीन झाल्यावर घरात झोपायचं असतंय्–बायकु-जवळ... ! "

" आँ ? "

" आसं येडप्यागत बघतोस काय; आजपास्नं घरात झोपत जा, म्हंजे बग बायकु कशी वळणावर येत न्हाई ते ! मग तुलाबी ती गळचातला लोडना न वाटता ताईत वाटाय् लागंल... "

मारी ऽ मी, हे असं खेकटं हाय व्हय् सगळं ! माज्या मनात आलं. हे आसंवी असतंय् तर !

राच्चं मळचाच्या राखुळीला धाकल्या काकाला घाडलं, नि मी बायकुजवळ झोपलो...काळीज माटमुट्ट कराय् लागलं...धमनी धाड्धाड् उडाय् लागली. कान-शिलं गरम झाली. डोळं राक्राक् कराय् लागलं...आणि मी भुलल्यागत बायकुला येंगंत घेटली...ती घुसमाटून गेली, मला एक ढुशी दिवून बाजूला हुईत म्हनाली,

" आता बायकुची आठवण झाली व्हय् ! "

आंस द्वार्णी बोलाय् बायकांचा हात कोण धरणार न्हाई ! इचार केला–उगंच बोलण्याला बोलणं वाढवून इनारथी वाडाचार कशाला लावायचा ? म्हणून चिप्प न्हायलो ! आनी जरासा तिच्याजवळ सरलो...तसं तिनं दटावलं,

" हां ऽ, तितंच झोपा; लै आगाव्पना करू नका ! "

" कुणा दुसऱ्याच्या घरात घुसून त्येच्या बायकुबरोबर आगावपना करत न्हाई न्हवं ! आपलीच बायकु हाय कुनाच्या बापाचं भ्या हाय मला ! " आता माजा तोल सुटला...सुटत चालला.

ती म्हणाली " येगळं न्हायल्याबिगर माज्या आंगाला हात लावू नका ! "

" पुन्यांनंडाव बोल, मुस्काड फोडून दिन् ! तुज्या आयला तुज्या ऽ, येगळं न्हायला तुला का हितं जाचणूक केलीया ? "

" ह्या भरल्या घरात मोकळंपनी मला न्हाय् गावत न्हाई. काय करायचं–सवरायचं, खाय–जेवायचं, नेसाय–पासाचं झालं तरी सासुबाईला इचारावं लाग-तंय्...कसली सत्ता म्हणून हाय मला हितं ? राबणुकीला फुकापासरी सत्तंचा गडी आसावा, म्हणून, लगीन केलंसा व्हय् माज्या बरोबर ? "

" सारी मान्सं ह्यो इचार करूनच लगीन करत्यात वाटतं ? यवडी घोडीगत वाडलीयास, तुला आक्कल कवा यायची ? "

" ते काय सांगू नगंसा मला...येगळं ऱ्हावूंया. लिप्पाणीला जावूया. तितं बिऱ्हाड करू या नि दोगं तंबाखूच्या कामाला जावून काय मिळंल ती भाजी-भाकरी खावू या...वाळ्‌ळं कुनाच्या अध्यामध्यांत नको ! "

आता मला समजलं–पाण्याची वड कुठल्या आंगाला हाय...पाणी कुठल्या बाजूला ऱ्हायला लागलंय् ! आयला ही बायकु हाय का हैवान् हाय ! चांगलं चालल्यालं घर मोडाय् बगती, हक्काची भाकरी सोडून पळत्याच्या पाठी लागायच्या भरीला घालती...! एखांदा दुदखुळा असला म्हंजे हिच्या नादानं मान्सातनं उठायचा ! हिच्या नादानं येगळं ऱ्हावा नि म्हातारा-म्हातारीला वाऱ्यावर सोडून द्याकी !

संतापानं माज्या आंगाची आग झाली...! चाबकानं झमा ऽ मा झोडपावं नि हिसका दावावा आंस वाटाय् लागलं...कैकडाव आसं वाटलं; खरं मोंड ढोराची औलाद ही, तवा ही आशी ऐकायची न्हाई...तिचा चांगलाच नांगा ढिला करूया ...न्हाईती खॉट उसाभार कशाला; न्हायतरी आनी लैंच चांडी हून बसंल ही भोरडी ! जलमाची आद्दल घडंल, आसं काय तरी कराय पायजे हिला, त्या बिगार बवायची न्हाई ही...थंड डोक्यानं इचार करून काय त्यो जालीम उपाय् हुडकाय पायजे...आसा इचार केला... संतापाला दाबून टाकलं...नि हांतरूनावर तसाच पडून ऱ्हायलो...

दुसऱ्या दिशी येस्वंतानं विचारलं, " काय नामज्या ऽ, गाडं कुठवर आलं ? "

" कसलं कुटवर मर्दा, वांड म्हशीगत सारं काम हाय ! अंगावर हातबी थरमू देत न्हाई; आनी येगळं ऱ्हावू या म्हनून टुमणं लावलंय् ! "

" हे कत्रांट निमणं क़ठीण हाय गड्या मग तुला ! मग फुडं काय करायचं यवजलैंस आता ? "

" मला तर गड्या काय सुचंना, सुद्रंना...जीव रंजीस इवून गेलाय् पार ऽ घयं-गटून गेलोय् मी ! बायकु गावली तीबी असल्या तऱ्हंची ! ह्यो लोडना कायमचाच गळचात पडला का न्हाई ? ती बैदाहून बसली नि काय ! "

यावर येस्वंता तरी काय बोलणार नि मी तरी काय बोलणार ? दोगं मुकाटवानी मळ्यात आलो. हिरीवर पैलं म्वॉट चालायची. पर गेलं सालीपासून इंजान बसिवलं हुतं. म्वॉट बंद केली तरी हिरीवरली घाव आजून मोडाय न्हवती. मोटवानवी तस हुतं. डोणबी तशीच हुती. एखांद्या वख्ती इंजनाचं टाळकं फिरलं नि ते बंद पडलं की मोट सुरू केली जात व्हती. इंजनापास्नं आतमाली पाण्याची पाईप डोणीत सोडली व्हती, डोणीतलं पाणी पोगरांत, पोगरांतलं पाटांत नि पाटांतलं उसात–अशी सारी शिस्टीम केली व्हती...

येस्वंता उसात घुसला, नि मी हिकडं इंजान चालू करायसाठनं हिरीत उतरलो.

...इंजान चालू केलं. पाईपमदनं मळाळा पाणी डोणीत पडाय् लागलं...इंजनाचा 'पॉक् पॉक्' आवाज ऐकत, त्यावर देखरेख ठेवत मी हिरीवर यिऊन बसलो... तिकडं येस्वंता ऊसाला पाणी पाजवाय् लागला...

दिवस कासराभर वर चढला. नि गावाकडनं आल्याल्या पांदीतनं बायकु येत्याली दिसली. जररोजींगत ती ह्या वख्ताला धुणं ध्वॉय् येत हुती. पोगरातलं पाणी पाटात पडत हुतं, तितं एक बक्कळ रुंदसा दगोड हुता. त्यावर ती धुणं ध्वायची.

रानची रानी आसल्यावानी ती मटचा तेगारात येत हुती. तिला येत्याली बघून मला एक टिक्स् सुचली...तिची मी वाट बघत न्हायलो...ती दगडाजवळ आली. डोस्कीवरलं धुण्याचं घमेलं तिनं खाली ठेवलं. कापडं पाण्यात भिजिवली नि खाली वाकून ती ध्वॉय् लागलो...

मला बगून बी तिनं न बधिटल्यागत केलं. जनू मी तितं न्हवतोच. दाल्ल्याबद्दल ही माया !!

खाली वाकून ती धुण्यात दंग हुती...मी पाय् बीनवाजवता हळूच तिच्या मागच्या बाजूला गेलो नि एकदम् तिला कवळा घाटला आन् गवताच्या भाऱ्यावानी वर उचलली. ह्या माज्या आवस्ती वागण्यानं तिनं आपल्या तोंडावर हात मारून ठों ऽ ठों बोंब मारली ! पर मी बचलो नाही. ती हातपाय झाडत हुती, बोंबलत हुती, तरीबी तशीच तिला हिरीकडं आणली...ह्या कालव्यानं उसात असल्याला येस्वंता 'अरे ऽ अरे ऽ थांब थांब !' करत पळत येत हुता. त्यो जवळ यिऊन मला आडवायच्या आत मी हिरीच्या काठावर पोचलो नि तितनंच धाडदिशी तिला हिरीत टाकली !

यदुळका येस्वंता जवळ आला हुता. "आरं ऽ, हे काय केलंस खुळचा !" म्हणत त्यो हिरीत उडी घालायच्या तयारीत हुता. खरं मी त्येला तसंच मागं वडलं नि त्येला जाम धरून ठेवीत म्हटलं,

"तू उडी मारून तिला काडू नगस ! गप्प बस्स !! "

"आरं पर ऽ, तिला बुडवून आशी ठार मारणार का काय तू ? " आणि येस्वंतानं माझ्या हाताला हिसडा मारला.

खरं, मी त्येला तसंच घट्ट धरून ठेवलं नि म्हणालो,

"तिला बरी ठार मारीन मी; आजून बामणाचं लगनासाठनं काढल्यालं कर्ज फिटायचं हाय ! जरा पाण्यात गटांगळ्या खावू दे, म्हंजे म्या धरून सरळ वागायला लागंल ! आनी मग काढू या तिला वर... " आनी मी बधिटलं तर...

तर ती पाण्यात गटांगळ्या खात न्हवती तर...तर पाण्यातनं वर आली हुती, नि पाण्यात सराईतावानी हात मारत चक्क पवत पायरीकडं येत हुती !

ते बघून मी माटक्यान् खालीच बसलो ! आनी गुडघामिठी घालून सूर काडला,

"येस्वंता, आता माजं कसं व्हायचं रं ? ह्यो लोडना आता माज्या गळ्यातनं कसा निघायचा ? कधी निघायचा रं ऽ ? " ○




# मनमाडची कबड्डी स्पर्धा

मनमाडचे कार्यकर्ते जिद्दीचे खरे ! या अविकसित शहरात गेली तीन वर्षे कबड्डीच्या महत्त्वपूर्ण स्पर्धा ते भरवीत आहेत. डिसेंबरच्या २३, २४ व २५ या तारखांना राज्यपातळीवरील खुली कबड्डी स्पर्धा त्यांनी डिसोझा मैदानावर भरविली आणि मोठ्या हिरीरीने ती यशस्वी करून दाखविली. पुण्या-मुंबईचे चोखंदळ क्रीडा-निरीक्षकसुद्धा चकित झाले.

खुद्द मनमाड, मुंबई, पुणे, औरंगाबाद, लोणावळा, मुर्शतपूर इत्यादी ठिकाणांहून पुरुषांचे वीस व महिलांचे पांच संघ आले होते. एकूण ५६ सामने पार पडले. पुरुष विभागात बँक ऑफ महाराष्ट्र हा मुंबईचा संघ कै. विष्णू विनायक माणके ट्रॉफी जिंकून गेला तर पुण्याच्या साधना क्रीडा मंडळाने महिला विभागाचे प्रावीण्यपद पटकाविले. दोन्ही विजयी संघांना वैयक्तिक पेले बहाल करण्यात आले. भव्य बक्षिसे, जाण्या-येण्याचा एकेरी खर्च, इतर सर्व बडदास्त यांत तीनही दिवस मनमाडचे नवजवान क्रीडा मंडळ गुंतून आणि गुंगून गेले होते. कामाचा इतका व्याप आणि झपाटा, कार्य यशस्वी करण्याची धडपड आणि धावपळ केवळ कौतुकास्पद होती. दशरथ राऊत, दौलतराव शिंदे यांचा तर प्रामुख्यानेच उल्लेख करायला हवा. मनमाड-

**मनोहर रेगे**

मधील सांस्कृतिक मंडळाचे पुरस्कर्ते राजाभाऊ पारळकर यांनी तर तीनही दिवस अनाउन्सरचे काम चोख बजावले. नियमितपणा नीटनेटकेपणा तर त्यांच्यात होताच पण माईकवरून बोलताना त्यांनी अगदी सौम्य शब्दात सामन्यांचे निर्णय आणि इतर माहिती आस्थेवाईकपणे दिली.

पाच-सात हजारांच्या घरात तरी मनमाडच्या कबड्डी स्पर्धेचा खर्च पोहोचला असेल. पण या स्पर्धेच्या संयोजनाने काय मिळविले ? हा एक मोठाच प्रश्न माझ्या-पुढे उभा आहे. सामने प्रथम साखळी पद्धतीने झाले. त्यामुळे निरनिराळ्या संघांना कौशल्य आणि कर्तृत्वाची पुष्कळ देवघेव करता आली. काही जुने-नवे महाराष्ट्र कबड्डीपटू तेथे जमले होते. त्यांचा खेळही नव्या खेळाडूंना पाहावयास मिळाला असेल. काही नवोदित खेळाडूही दर्जाच्या बाबतीत थोडे पुढे सरकले असतील. मनमाडमधील चार पंचांना अनुभवाची थोडी शिदोरीही लाभली असेल. अंतिम फेरीच्या वेळी तर सुमारे तीन हजार प्रेक्षक आपली हजेरी लावून गेले. स्पर्धेचे उत्साही चालक, क्रीडांगणाची चोख व्यवस्था, महाराष्ट्रातील उत्तमोत्तम संघांची आणि खेळाडूंची उपस्थिती, राज्यसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांची हजेरी, छानदार बक्षीस-समारंभ, प्रचंड गर्दी. मग आणखी काय हवे होते तुम्हांला, असेच कुणी विचारून जाईल. पण एक गोष्ट मला खटकली.

कोणत्याही खेळाचे नेहमी दोन भाग पडतात. एक खेळाचे कार्य करणारी संस्था आणि दुसरे खेळाडूंचा दर्जा वाढविण्याचे प्रयत्न करणारे तज्ज्ञ शिक्षक. एकूण ५६ सामने झाले. महाराष्ट्राचे आजी-माजी खेळाडू तेथे किती आले, त्यांनी काय पाहिले, अनुभवले ? त्यावरचा त्यांनी एकदा अहवाल तयार केला का ? याला उत्तर नकारार्थीच मिळेल.

सुमारे अडीचशे कबड्डी खेळाडू या स्पर्धेत खेळले. प्रत्येक संघाचा दर्जा काय होता ? त्यांच्यामधल्या किती खेळाडूंवर तज्ज्ञांनी ‘नजर’ ठेवली ? नव्या खेळाडूंची नोंद करून घेतली काय ? याचे उत्तर काही नाही असेच मिळेल.

राज्यपातळीवरच्या अशा स्पर्धांना तज्ज्ञ महाराष्ट्र खेळाडूंची फौज आली पाहिजे. त्यांनी तीन पद्धतीचे खेळाडू निवडावेत. एक : अगदी नवीन पण खेळाला आवश्यक असणारी चुणूक दाखविणारे. दोन : मध्यम खेळाडू की जे आज ना उद्या महाराष्ट्रात आपले नाव गाजवतील आणि तिसरे : महाराष्ट्र संघातील किंवा आस-पासचे दर्जेदार खेळाडू. या तीन प्रकारच्या खेळाडूंना पुढच्या वर्षीच्या स्पर्धेत एकत्र आणून त्यांचे निवडक असे काही संघ बनवावेत व तत्पूर्वी काही दिवसांचे एक

---

डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात येल विद्यापीठाच्या डॉन स्कॉलँडर यांनी ५०० यार्डांचे अंतर ४ मिनिटे ४६·१ सेकंदात पोहून नवा जागतिक विक्रम केला. स्कॉलँडर २५ वर्षांचे आहेत.

---

शिक्षण शिबीर भरवून ज्यांना कबड्डीचे प्रत्यक्ष तंत्र समजावून द्यावे. त्यातच खेळाडूंचे आणि महाराष्ट्राचे हित आहे. त्याकरिता कबड्डीपटूंची एक स्वतंत्र संस्थाच अस्तित्वात असणे आवश्यक वाटते. की जी महाराष्ट्र राज्य कबड्डी संस्थेच्या सहकार्याने महाराष्ट्रीय खेळाडूंचे कर्तृत्व सतत वाढवू शकेल. नाहीतर काही वर्षांनी आपल्या कार्याचे सिंहावलोकन करताना बिचाऱ्या कार्यकर्त्यांच्या पदरी निराशाच पडावयाची.

## क्रांती आणि वासंती

महिलांच्या अंतिम सामन्यात प्रकर्षाने चमकल्या त्या क्रांती नावर (नवयुग क्रीडा मंडळ) आणि वासंती सातव (साधना क्रीडा मंडळ) या दोन महिला खेळाडू. तयारी आणि तत्परता म्हणजे क्रांती नाबर. चढाई आणि पकडीत दोन्हीत त्या पारंगत आहेत. कारण साहस आणि सोस हे त्यांचे खास वैशिष्टय. हल्ला आक्रमकतेने चढविताना प्रतिस्पर्ध्यांच्या प्रांगणात त्या चौफेर चाल करून जातील. उजव्या कोपऱ्यातला गडी मारताना तर त्या एक-दोनदा अंतिम रेषेपासून दोन फूटच आत होत्या. पकडी करतानादेखील आपणहून डाव टाकण्याचे त्यांचे हर प्रयत्न सामन्यात एक निराळा रोमांच निर्माण करीत. वासंती सातव यांची खेळण्याची तऱ्हा काही निराळीच. शरीराचा समतोलपणा राखून लांबसडक पायांची फेर झाडणे आणि अनपेक्षित वेगाने पल्लेदार झेपा टाकून दोन-चार गडी टिपणे ही सातव यांची काही वेगळीच लकब आहे. एरव्ही त्यांचे अस्तित्वही जाणवत नाही.

## खोखोतील 'ब्रॅडमन' भोईर

मुंबईच्या जिल्हा स्पर्धेत खटाव मिल्सच्या तुकाराम भोईर यांनी श्री स्पोर्टस क्लबविरुद्ध सात–सात मिनिटे पळून काढून सबंध डावात प्रतिस्पर्ध्यांची दमछाक केली. हा एक चमत्कारच म्हटला पाहिजे. कारण ९ खेळाडू तुमच्यावर एकाग्रचित्त ठेवून सतत सात मिनिटे तुमचा निरनिराळ्या पद्धतीने आणि क्लृप्तीने पाठलाग करीत असतात. म्हणूनच तुकाराम भोईर यांनी केलेला विक्रम अचाटच म्हटला पाहिजे.

तुकाराम भोईर यांनी पुढच्याच सामन्यात युवक संघाला पावणेपाच मिनिटे रडविले. एकाच डावातील जास्तीत जास्त वेळ 'खाऊन' संघाची बाजू भरभक्कम करणाऱ्या भोईरांची ब्रॅडमनशीच तुलना करावयास हवी. दुर्दैवाने आपल्या भारतातच भारतीय खेळांचे महत्त्व मानले जात नाही. पाश्चात्त्य खळांपुढे त्यांचा दर्जा कमी लेखला जातो. सामर्थ्य, वेग आणि चलाखी हे भारतीय खेळांचे खास वैशिष्टच आहे. भोईर यांच्यासारखे युवक जेव्हा असा काही अफाट पराक्रम गाजवितात तेव्हाच तिकडे लोकांचे लक्ष लागावे ही गोष्ट तितकीशी समाधानाची नाही.

पेट्रोगाडच्या पाठोपाठ मॉस्कोत ी उठाव झाला.

बोल्शेव्हिकांच्या मॉस्कोतील उठावाचे नेतृत्व बुखारिनकडे होते. त्याने पेट्रोग्राडमधील मुख्य लष्करी क्रांतिकारक समितीला मदत करण्यासाठी अगोदरच स्थानिक समिती स्थापन केली होती. पेट्रोग्राड येथील उठावाची बातमी कळताच बुखारिनने स्थानिक समितीची बैठक बोलावून केरेन्स्की राजवटीविरुद्ध बंडाचा झेंडा उभारण्याचा आदेश दिला. मॉस्कोचा महापौर रूडनेव्ह हा सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाचा असल्यामुळे तो बोल्शेव्हिकांविरुद्ध उभा ठाकला. रूडनेव्हने नगरपालिकेच्या वतीने सार्वजनिक सुरक्षितता समिती स्थापन करून तिच्याद्वारा बुखारिनच्या बंडाचा बीमोड करण्याचे ठरविले.


क्रेमलिन या जुन्या प्रासादातच बुखारिनने आपली कचेरी थाटली होती. सार्वजनिक सुरक्षितता समितीच्या वतीने मॉस्कोचा सेनाधिकारी रिआबत्झेव ९ नोव्हेंबरच्या सकाळी बुखारिनला भेटण्यासाठी क्रेमलिनमध्ये गेला. तो बुखारिनला म्हणाला, 'लष्करी क्रांतिकारक समितीचे ताबडतोब विसर्जन झाले पाहिजे. आणि तुम्ही सर्वांनी क्रेमलिनमधून बाहेर पडले पाहिजे, असा माझा हुकूम आहे.'

# उत्तरार्ध : लेखांक पहिला

'पेट्रोग्राडमध्ये काय घडत आहे हे तुला माहीत आहे ना ?' बुखारिनने त्याला विचारले.

रिआबत्झेव संतापून बाहेर पडला आणि चोवीस तासांच्या आतच एक क्रेमलिन सोडले, तर बाकीचे सारे मॉस्को शहर आपल्या ताब्यात घेतले. मॉस्कोतले बहुतेक सारे सैनिक रिआबत्झेवपुढे शरण आले होते. या काळात रूडनेव्हही स्वस्थ बसलेला नव्हता. त्याने रिआबत्झेवच्या मदतीने टपाल-तार कचेरी आणि रेल्वे स्टेशन सार्वजनिक सुरक्षितता समितीच्या नियंत्रणाखाली असल्याचे जाहीर केले. बुखारिनने पेट्रोग्राडहून मदत मागवू नये यासाठी रूडनेव्हची धडपड सुरू होती. रिआबत्झेवचा जोर पाहिल्यानंतर बोल्शेव्हिक सेनेचा प्रमुख बेर्झिन हाही शरण आला आणि त्यामुळे मॉस्कोतल्या बोल्शेव्हिक नेत्यांना पकडण्यास रूडनेव्हला वेळ लागला नाही. मॉस्कोत तात्पुरती शांतता प्रस्थापित झाली.

पेट्रोग्राड ताब्यात घण्याचा केरेन्स्कीचा शेवटचा प्रयत्नही फसला आहे, ही बातमी १३ नोव्हेंबरच्या सकाळी मॉस्कोत येऊन पोचली. पेट्रोग्राडमध्ये लेनिनची सत्ता स्थापन झाल्याचे कळताच मॉस्कोतल्या बोल्शेव्हिकांना जोर चढला आणि त्यांनी रूडनेव्ह-रिआबत्झेव यांच्या युतीविरुद्ध मुकाबला करण्याचे ठरविले. मॉस्कोत काय घडत आहे, याकडे लेनिनचे लक्ष होतेच. त्यामुळे त्याने बुखारिनच्या मदतीसाठी आपली काही सेनापथके मॉस्कोला रवाना केली. ही मदत आल्यानंतर रिआबत्झे-




वची भीती बाळगण्याचे बुखारिनला काहीच कारण उरले नव्हते. मॉस्कोहून आलेल्या सैनिकांच्या बळावर बुखारिनने रूडनेव्ह–रिआबत्झेव यांचा अवघ्या दोन दिवसांत पराभव केला.

१५ नोव्हेंबरला मॉस्को शहरही बोल्शेव्हिकांच्या ताब्यात आले. रशियात त्या वेळी पेट्रोग्राड आणि मॉस्को हीच दोन प्रमुख शहरे होती. ही दोन्ही शहरे ताब्यात आल्यानंतर क्रांतीचे पहिले पर्व संपले होते. त्यामुळे संपूर्ण देश आपल्या राजवटीच्या नियंत्रणाखाली आणण्याच्या दृष्टीने लेनिनचे प्रयत्न सुरू झाले.

लोक युद्धाला कंटाळले आहेत. युद्धामुळेच आपल्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे, असा ते त्रागा करीत आहेत, हे लेनिनला ठाऊक होते. अशा वेळी देशांतर्गत सत्ता स्थिर करताना युद्धाची कटकट नको म्हणून त्याने जर्मनीशी तह करण्याचे ठरविले. सरसेनानी डुखोनिन याच्याशी टेलिफोनवरून बोलणे करून लेनिनने त्याला युद्ध थांबविण्याचा हुकूम दिला. डुखोनिन म्हणाला, 'अद्याप आपल्या लष्कराच्या मनगटात जोर आहे आणि म्हणून तुमचा हा सल्ला मला मानता येणार नाही.'

डुखोनिनचे हे उत्तर ऐकताच लेनिन भडकला. तो ताबडतोब नभोवाणी केंद्रावर गेला आणि आघाडीवर लढणाऱ्या सैनिकांना उद्देशून म्हणाला, 'बोल्शेव्हिक सरकारने डुखोनिन याला बडतर्फ केले आहे. आपल्या सैनिकांनी शस्त्रे खाली ठेवावीत आणि जर्मन व ऑस्ट्रियन सैनिकांशी दोस्ती करावी, अशी माझी अपेक्षा आहे. शांतता प्रस्थापित करण्यासाठी डुखोनिनसारख्या सेनानीचा उपयोग होणार नसल्यामुळे हे महान कार्य आता सैनिकांनीच पार पाडायचे आहे.'

डुखोनिनच्या जागी सरसेनानी म्हणून कोणाची तरी नियुक्ती करणे आवश्यक होते. लेनिनने क्रायलेन्कोची निवड केली. लागलीच क्रायलेन्को सैन्य घेऊन मोघिलेव्ह्‌कडे निघाला. क्रायलेन्कोने डुखोनिन याची भेट घेऊन त्याला लेनिनचे आदेश पाळले गेलेच पाहिजेत असे सांगितले. परंतु क्रायलेन्कोचे सरसेनानीपद मानण्यास डुखोनिन तयार नव्हता. त्यामुळे क्रायलेन्कोने त्याला अटक करून पेट्रोग्राडकडे धाडले.

नंतर क्रायलेन्कोने आपल्या दोघा प्रतिनिधींवर जर्मन सेनानींशी शांततेबाबत चर्चा करण्याची कामगिरी सोपविली. क्रायलेन्कोच्या प्रतिनिधींची सूचना ऐकल्यावर मोघिलेव्ह्‌ आघाडीवरचा जर्मन सेनानी लुडेनडॉर्फ याने पूर्व आघाडीचा सेनाप्रमुख जनरल मॅक्स हॉफमान याला फोन केला– ' क्रायलेन्कोच्या प्रतिनिधींना मी काय सांगू ?'

' मी सरसेनानीला विचारून कळवितो–' हॉफमानने उत्तर दिले.

सोव्हिएट सरकारशी आपण ब्रेस्ट–लिटोव्हस्क येथे वाटाघाटी करण्यास तयार आहोत असे २७ नोव्हेंबर रोजी जर्मन सरसेनानीने क्रायलेन्कोच्या याला कळविले. जर्मनी आपल्याशी वाटाघाटी करण्यास तयार आहे हे कळताच ट्रॉटस्की उद्‌गारला ' जर्मन सम्राटाने क्रायलेन्कोच्या प्रतिनिधींशी शांततेसंबंधी बोलणी करण्याची तयारी दर्शविली आहे यावरून युरोपमधील सत्ताधाऱ्यांनी बोल्शेव्हिक क्रांतीचा केवढा धसका घेतला आहे हे दिसून येते.'

जर्मन सेनानी सांगतील त्या अटी मान्य करा, असे ब्रेस्ट–लिटोव्हस्क येथे वाटाघाटींसाठी निघालेल्या आपल्या प्रतिनिधींना लेनिनने कानमंत्र दिला होता. ब्रेस्ट-लिटोव्हस्कला धाडलेल्या शिष्टमंडळात लष्करी तज्ज्ञांसमवेत कामगार, खलाशी, शेतकरी व महिला प्रतिनिधींचाही समावेश करण्यात आला होता. सोव्हिएट सरकार हे खरेखुरे जनता सरकार आहे, असे जर्मन– प्रतिनिधींना भासविण्यासाठी मुद्दामच ही युक्ती योजण्यात आली होती.

सोव्हिएटच्या केंद्रीय कार्यकारणीपुढे बोलताना ट्रॉटस्की म्हणाला, ' जर्मन सम्राटाशी आपले प्रतिनिधी बरोबरीच्या नात्याने बोलणार आहेत या गोष्टीला विशेष महत्त्व आहे. या वाटाघाटींच्या वेळी जे काही उभयपक्षी बोलणे होईल ते त्यातील शब्दन शब्द आम्ही प्रसिद्ध करू. आम्हांला जर्मन जनतेबरोबर शांततेने नांदावयाचे आहे. पण जर का ब्रेस्ट–लिटोव्हस्क येथील वाटाघाटींत जर्मनांकडून आमच्या उद्दिष्टांशी विसंगत अशा अटी घालण्यात आल्या तशा मात्र आम्ही लोकांना विचारल्याशिवाय निर्णय करणार नाही. आम्ही त्या सर्व अटी घटना समितीपुढे ठेवू आणि लोकप्रतिनिधींना सांगू– ' तुम्ही काय ते ठरवा.' जर लोकप्रतिनिधींनी त्या अटी मान्य केल्या तर आम्ही घटना समितीतून बाहेर पडू. त्या अटी ज्या पक्षाला मान्य असतील त्यांच्या हाती घटना समितीने सत्ता सोपवावी. घटना समितीतून बाहेर पडल्यानंतर आम्ही सर्व लोकांना एकत्र करून युरोपीय साम्राज्याविरुद्ध लढत देऊ.'

बोल्शेव्हिक सेना आणि केरेन्स्कीची सेना यांच्यांत अद्यापही किरकोळ चकमकी झडत होत्या. त्या वेळी समाजवादी मंत्रिमंडळ प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने बोल्शेव्हिकांनी डावे मेन्शेव्हिक आणि सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी यांच्याशी बोलणी सुरू केली. या वाटाघाटींत बोल्शेव्हिकांच्या बाजूने कामेनेव्ह आणि रिकोव्ह यांचाच पुढाकार होता. लेनिनला डाव्या पक्षांचे सहकार्य अभिप्रेत होते ते फक्त केरेन्स्कीचा पराभव करण्यापुरतेच. हंगामी सरकारविरुद्धचा उठाव हा केवळ बोल्शेव्हिकांच्या सत्तासंपादनाचा डाव आहे, असे सर्वसामान्य नागरिकांना वाटू नये एवढ्यासाठीच लेनिन इतर डाव्या पक्षांशी सहकार्याचे नाटक करण्यास तयार झाला होता.

केरेन्स्कीचा पाडाव करण्यात बोल्शेव्हिकांना यश लाभले याचे मुख्य कारण असे होते की पेट्रोग्राडमधील आणि उत्तर आघाडीवरील सेनाधिकाऱ्यांपैकी जे झारनिष्ठ अधिकारी होते ते बोल्शेव्हिकांच्या उठावाच्या वेळी तटस्थ राहिले. त्यांना असे वाटत होते की बोल्शेव्हिकांकरवी झारशाही नष्ट करणाऱ्या केरेन्स्कीचा पाडाव झाल्यानंतर बोल्शेव्हिकांचा पराभव करणे आपणांस सहज शक्य होईल. अर्थात त्यांचा हा कयास पार चुकला ही गोष्ट अलाहिदा !

बोल्शेव्हिक क्रांतीच्या यशाला झारनिष्ठ सेनाधिकाऱ्यांची नकळत कशी मदत झाली याची कबुली देताना ट्रॉट्स्की लिहितो— ' बोल्शेव्हिक क्रांतीच्या प्रारंभीच्या काळात सेनाधिकाऱ्यांकडून आम्हांला मोलाची मदत झाली ही गोष्ट मान्य केलीच पाहिजे. त्या वेळी लेनिनने आणि मी पेट्रोग्राडमधील सेनाधिकाऱ्यांची खास बैठक घेऊन त्यांनी केरेन्स्की राजवटीविरुद्धच्या आमच्या लढाईत आमच्या बाजूने उभे राहिले पाहिजे असे त्यांना आवाहन केले. ते सर्वजण पूर्वी झारच्या सैन्यात निरनिराळ्या अधिकारपदांवर होते. त्यांनी आम्हांला पाठिंबा देण्याचे तत्काळ मान्य केले. केरेन्स्की पराभूत व्हावा हाच त्यांचा त्या मागचा हेतू होता. पेट्रोग्राडजवळच्या पुलोकोव्ह टेकडीवर कर्नल वाल्डनच्या नेतृत्वाखाली आम्ही आमचे सैन्य जमविले होते. त्यात या सेनाधिकाऱ्यांचाही भरणा होता. या सैन्याने जनरल क्रासनोव्हच्या लष्कराला वेढा घालून त्याचा पाडाव केला. वाल्डनच्या पराक्रमामुळेच पेट्रोग्राडवर चालून येण्याचा केरेन्स्कीचा प्रयत्न फसला. स्वत: वाल्डन हाही पक्का झारनिष्ठ होता. तो आपणहोऊन आमच्या बाजूने लढण्यासाठी का तयार झाला हे मला शेवटपर्यंत कळू शकले नाही. तो काही तरुण नव्हता. त्यामुळे वैयक्तिक महत्त्वाकांक्षेने तो प्रेरित झाला होता असेही म्हणता येणार नाही. आम्ही कशासाठी केरेन्स्कीशी झुंज घेत आहोत हे समजण्याचीही त्याची बौद्धिक कुवत नव्हती. त्यामुळे आमचे तत्त्वज्ञान पटले म्हणून तो आमच्या बाजूने उभा राहिला असे म्हणता येणार नाही. शेवटी हाच निष्कर्ष काढावा लागतो की, झारला पदभ्रष्ट करणाऱ्या केरेन्स्कीवर त्याचा राग असल्यामुळे आणि आम्ही केरेन्स्कीच्याविरुद्ध लढत असल्यामुळे तो आमच्या पक्षाला येऊन मिळाला.

रशियातील झारशाही बोल्शेव्हिकांनी (सत्ता हस्तगत केल्यानंतर ते स्वतःला कम्यु-निस्ट म्हणवून घेऊ लागले) नष्ट केली असा जो दावा करण्यात येतो तो किती लटका आहे, याचीच ट्रॉटस्कीने वरील उताऱ्यात नकळत कबुली दिली आहे.

केरेन्स्की आपल्या आत्मवृत्तात लिहितो– 'झारची जुलूमशाही कम्यु-निस्टांनी नष्ट केली हे या शतकातले सर्वांत मोठे असत्य आहे. त्यांनी तसे काहीही केलेले नाही. बलप्रयोग आणि विश्वासघात यांच्या साहाय्याने कम्युनिस्टांनी नष्ट केली ती रशियातील नवजात लोकशाही. झारशाही नव्हे ! कारण झारशाहीविरुद्धचा लढा १२ मार्च रोजीच सुरू झाला होता आणि त्या लढ्यात कोणाही बोल्शेव्हिक नेत्याने भाग घेतला नव्हता. त्या वेळी लेनिन परदेशात होता, ट्रॉटस्की तुरुंगात होता आणि स्टॅलिन निर्वासित म्हणून वावरत होता. झारशाही नष्ट झाल्याची बातमी कळल्यानंतर त्यांना आश्चर्यच वाटले. काही दिवस तर त्यांचा या घटनेवर विश्वासच बसेना. आपल्या हयातीत तरी रशियात क्रांती होण्याची शक्यता नाही, असे लेनिनने याच काळात आपल्या मित्राला लिहिलेल्या पत्रात म्हटले होते. झारशाहीविरुद्धचा आमचा उठाव सुरू होण्याच्या काही तास अगोदरच लेनिनचे पेट्रोग्राडमधील मित्र मला म्हणाले होते, 'रशियात क्रांती होण्याची मुळीच शक्यता नाही. आपल्याला आणखी कितीतरी काळ झारशाहीचा जुलूम सहन करावा लागणार आहे. आम्ही झारशाही उलथून पाडली आणि रशियात प्रथमच लोकशाही राजवटीची मुहूर्तमेढ केली. विजनवासात भटकत असलेल्या कार्य-कर्त्यांवरील निर्बंध मी दूर केले आणि त्यानंतर देशोदेशी हिंडत असलेले बोल्शेव्हिक कार्यकर्ते पेट्रोग्राडमध्ये गोळा होऊ लागले. झारशाही नष्ट झाल्यानंतर महिनाभराने लेनिन, झिनोवेव्ह आणि इतर काहीजण जर्मन सम्राटाच्या बंदीतूनशाळे पेट्रोग्राडला आले.'

केरेन्स्की पुढे लिहितो–'स्वित्झर्लंडहून परतल्यानंतर नव्या लोकशाही राज-वटीतील रशिया आपल्याला कसा दिसला यासंबंधीचे लेनिनचे त्या वेळचे उद्‌गार लक्षात ठेवण्याजोगे आहेत. लेनिन म्हणाला होता की, 'रशिया आता युरोपमधील सर्वांत अधिक स्वतंत्र राष्ट्र झाले असून, रशियन जनता दडपशाहीतून मुक्त झाली आहे.' नोव्हेंबरची बोल्शेव्हिक क्रांती होण्यापूर्वी लेनिनने माझ्या लोकशाही राजवटीबद्दल हे उद्‌गार काढले होते आणि नंतर त्याने आठ महिन्यांपूर्वीच जन्माला आलेल्या या लोकशाहीच्या नरडीला नख लावले. रशियातील लोकशाही राजवट आपण नष्ट केली ही वस्तुस्थिती दडविण्यासाठीच आपण झारशाहीची पाळेमुळे खणून काढली असा लेनिनचे अनुयायी प्रचार करू लागले. लोकशाही आणि स्वातंत्र्य यांच्या घोषणा करूनच ही दोन मूल्ये पायदळी तुडविण्याची कम्युनिस्टांची रीत आहे याचा

**जगाने नंतर खूप अनुभव घेतला. परंतु त्या काळी रशियन जनतेचा आधुनिक हुकूमशहांच्या तंत्राशी परिचय झालेला नव्हता आणि त्यामुळेच ही जनता बोल्शेव्हिकांच्या गोंडस घोषणांना बळी पडली.**

बोल्शेव्हिक क्रांतीच्या वेळी प्लेखानोव्ह सार्ककोवेसेली येथे रुग्णशय्येवर पडून होता. क्रांतीनंतर तीनच दिवसांनी त्याने पेट्रोग्राडमधील कामगारांना उद्देशून एक अनावृत पत्र लिहून तुम्ही जर लेनिनच्या कच्छपी लागलात तर तुमच्या नशीबी काय येईल याचा शांतपणे विचार करा, असे त्याने कामगारांना आवाहन केले.

प्लेखानोव्ह लिहितो, 'गेल्या काही दिवसांतील घटनांनी माझ्या मनाला खूप क्लेश झाले आहेत. मला कामगारांचे भले पाहवत नाही असा कृपया कोणी गैर-समज करून घेऊ नये. उलट, माझ्या रक्तातील कणन् कण कामगारवर्गाचा विजय पाहण्यासाठी आसुसलेला आहे. परंतु दलितवर्गाची हुकूमशाही निर्माण करण्यापूर्वी कामगारवर्गाची जी तयारी व्हावी लागते ती झाली आहे काय, असा प्रश्न प्रत्येक सुजाण कामगाराने स्वतःला विचारून पाहावा. पददलितांची सत्ता निर्माण होण्यापूर्वी देशात काही विशिष्ट आर्थिक व सामाजिक परिस्थिती निर्माण व्हावी लागते. तशी परिस्थिती अद्याप रशियात निर्माण झालेली नाही असेच प्रत्येकास कबूल करावे लागेल. आपल्या वर्गाचे आणि त्याबरोबरच साऱ्या देशाचे हित साधण्यासाठी सत्ता राबविण्याइतका आपला कामगार वर्ग तयार झालेला नाही, अशा परिस्थितीत कामगारवर्गावर तशी सत्ता लादणे ही एक ऐतिहासिक घोडचूक ठरणार असून या चुकीचे परिणाम साऱ्या रशियाला भोगावे लागतील.'

'रशियन कामगारवर्गाने हाती घेतलेले क्रांतिकार्य जर्मन कामगार पुरे करतील असे जे आज सांगण्यात येत आहे तेही साफ खोटे आहे. आर्थिकदृष्टचा जर्मनी रशियापेक्षा पुढारलेला आहे ही गोष्ट खरी आहे. तरीदेखील जर्मन कामगार अद्याप क्रांतीचा विचार करू लागलेला नाही ही गोष्टही तितकीच खरी आहे. युद्धानंतर तर जर्मनीत क्रांती होण्याची किंचितही शक्यता उरलेली नाही. याचाच अर्थ असा, की रशियन कामगाराने सुरू केलेले क्रांतिकार्य केवळ जर्मन कामगारच काय पण फ्रेंच, ब्रिटिश वा अमेरिकन कामगारही पूर्ण करू शकणार नाही. अशा परिस्थितीत आज जर रशियन कामगारवर्गाने सत्ता हाती घेतली तरी त्याला अभिप्रेत असलेली सामाजिक क्रांती तो घडवून आणू शकणार नाही. उलट त्यामुळे देशात यादवी युद्धाचा भडका उडून गेल्या फेब्रुवारी-मार्चमध्ये आपण जे काही साध्य केले आहे तेही गमावून बसू.'

प्लेखानोव्हचे हे पत्र प्रसिद्ध होताच बोल्शेव्हिक सत्ताधारी चिडून गेले असल्यास नवल नाही. ज्या दिवशी हे पत्र प्रसिद्ध झाले त्याच दिवशी काही लाल रक्षक प्लेखानोव्हच्या घरी गेले. 'आपले यजमान' आजारी असल्यामुळे आपण त्यांना त्रास देऊ नका असे मादाम प्लेखानोव्ह हिने त्या रक्षकांना विनविले. परंतु तिच्या

बोलण्याकडे लाल रक्षकांचे लक्ष नव्हते. ते खेकसले, 'आम्ही शस्त्रास्त्रांचे साठे शोधत आहोत. या घराचा मालक कुठं आहे?'

लाल रक्षकांच्या या उद्दाम वर्तनाची तऱ्हा पाहताच मादाम प्लेखानोव्हला त्या दिवशी सकाळीच आपल्या नवऱ्याने उच्चारलेल्या वाक्यांची आठवण झाली. अनावृत पत्राबद्दल त्या दोघांत चर्चा सुरू असताना मादाम प्लेखानोव्ह म्हणाली होती, 'या पत्रामुळें बोल्शेव्हिक तुम्हांला त्रास देतील असं मला वाटत नाही.'

प्लेखानोव्हने उत्तर दिले होते– 'तू या लोकांना मुळीच ओळखत नाहीस. माझ्यावर मारेकरी घालण्यासही ते कमी करणार नाहीत आणि मी ठार झाल्यानंतर लोकांना फसविण्यासाठी चार खोटे अश्रूही ढाळतील.'

हा संवाद आठवल्यानंतर मादाम प्लेखानोव्ह चपापली. तिच्याकडे पाहताच लाल रक्षक प्लेखानोव्हच्या खोलीत शिरले. एवढ्यात पुन्हा दार खरखरले आणि हातात पिस्तूल खेळवीत एक खलाशी आत आला. प्लेखानोव्हच्या डोक्यापाशी पिस्तूल नेत तो गरजला, 'या घरातली सारी शस्त्रास्त्रे बऱ्या बोलाने आमच्या ताब्यात दे. नाही तर मी तुला इथल्या इथे ठार करीन.'

प्लेखानोव्ह शांतपणाने म्हणाला, 'कोणाचाही खून करणं सोपं असतं हे मला माहीत आहे. तरीदेखील मी तुला सांगतो की माझ्याजवळ कोणतीही शस्त्रं नाहीत.'

मृत्यू समोर दिसत असतानाही प्लेखानोव्ह शांत असल्याचे पाहून खलाशी चरकला. तो आला तसाच तरातरा बाहेर गेला. नंतर लाल रक्षकांची तपासणी सुरू झाली. त्यांनी विचारले, 'तुमचा व्यवसाय सांगा.'

'मी लेखक आहे.'

'तुम्ही कोणत्या विषयावर लिहिता?'

'क्रांती आणि समाजवाद यांसंबंधी.'

'कोणती क्रांती? कारण केरेन्स्कीही स्वतःला क्रांतिकारकच समजत होता. तू त्याच्या मंत्रिमंडळात होतास काय?'

'नाही.'

'तू ड्युमाचा सदस्य तरी आहेस काय?'

'नाही.'

'अरे, मग आपल्याला हवाय तो हा माणूस नव्हे' असे पुटपुटत ते लाल रक्षक बाहेर पडले.

परंतु हे प्रकरण एवढ्यावरच संपणारे नव्हते. दुसऱ्या दिवशी पुन्हा लाल रक्षकांनी प्लेखानोव्हच्या घरावर छापा घातला. प्लेखानोव्हच्या मित्रांना या प्रकाराची कल्पना असल्यामुळे त्यांनी आदल्या रात्रीच प्लेखानोव्हला पेट्रोग्राडमधल्या एका फ्रेंच रुग्णालयात हलविले होते. लाल रक्षकांनी प्लेखानोव्हचा अपमान केल्याची बातमी शहरात पसरताच नागरिक प्रक्षुब्ध झाले. लोकांना शांत करण्यासाठी, 'प्लेखानोव्हच्या

जीवितवित्ताचे रक्षण करण्यासाठी आपण त्याच्या घरावर पहारा ठेवीत आहोत,' असे लेनिनने जाहीर केले.

लेनिनच्या दडपशाहीबद्दल केवळ एकटा प्लेखानोव्हच निषेधाचे शब्द उच्चारीत होता असे नव्हे. बोगॅडोनोव्ह, क्रासिन, बझारोव्ह, अॅलेक्सिन्स्की रोझनोव्ह, गॉर्की यांसारखे लेनिनचे निकटवर्ती मित्रही बोल्शेव्हिकांच्या सत्तासंपादनाला ' वेडे साहस ', ' वेडाच्या झपाटयात केलेले कृत्य ', ' लेनिनच्या बेजबाबदार वर्तनाचा परिणाम ' अशी विशेषणे लावत होते.

बोल्शेव्हिक राजवटीमध्ये इतर समाजवादी पक्षांना सहभागी करून घेण्याबाबत लेनिन कालहरण करीत आहे हे दिसून आल्यानंतर १७ नोव्हेंबर रोजी रिकोव्ह प्रभृति मंत्र्यांनी आपले राजीनामे सादर करून लेनिनला रामराम ठोकला कामेनेव्ह यानेही 'ऑल रशियन सेंट्रल एक्झिक्युटिव्ह कमिटी ऑफ दी सोविएटस' या संघटनेचा राजीनामा दिला. आपण लेनिनच्या मंत्रिमंडळातून का बाहेर पडलो यासंबंधीचा खुलासा करण्यासाठी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात रिकोव्ह म्हणतो, ' नव्या राजवटीत सर्व समाजवादी पक्षांना स्थान असले पाहिजे असे आम्हांस वाटते. कारण तसे घडून आले नाही तर बोल्शेव्हिक पक्ष सत्ता आपल्या हाती राखण्यासाठी दहशतवादाचा अवलंब करील अशी भीती वाटू लागली आहे; नव्हे, बोल्शेव्हिक दहशतवादाला प्रारंभ झालेलाच आहे. बोल्शेव्हिक राजवटीचा हा मार्ग आम्हांला बिलकुल पसंत नाही. कारण या दहशतवादामुळे देशाच्या राजकीय जीवनातील कामगार वर्गाचे नेतृत्व नष्ट होऊन त्या जागी लोकमताची पर्वा न करणारा गट सर्वसत्ताधारी होईल. आणि मग क्रांतीचा मूळ हेतूच नाहीसा होईल.'

कामेनेव्हच्या राजीनाम्यानंतर सोविएटच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी लेनिनने स्वेर्डलोव्हची नेमणूक करण्याचे ठरविले. त्याने स्वेर्डलोव्हला बोलावून घेऊन सांगितले, 'कामेनेव्हच्या जागी मी तुझी नेमणूक करण्याचं ठरविलं आहे. तुझं काय मत आहे ?'

स्वेर्डलोव्ह ही जबाबदारी स्वीकारण्यास तयार नव्हता. परंतु लेनिनच्या आग्रहापुढे त्याला नमते घ्यावे लागले. नंतर लेनिन त्याला म्हणाला, ' प्रथम देशात शांतता निर्माण करण्याचे कार्य हाती घेणे अगत्याचे आहे. म्हणून तू अगोदर केंद्रीय कार्यकारिणीतील बोल्शेव्हिक सदस्यांना बोलावून घेऊन त्यांना अपक्षीय, शेतकरी आणि कामगार प्रतिनिधींना आपल्या बाजूला खेचण्याचे प्रयत्न करायला सांग. आपले काही कार्यकर्ते शेतकरी–कामगार सदस्यांत वारंवार मिसळले पाहिजेत. नंतर मी कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी तुझं नाव सुचवीन. तुझ्या नावाला कोणीच विरोध करणार नाही याची आपण आगाऊ तरतूद केली पाहिजे.'

या सुमारास क्रासिनने आपल्या बायकोला लिहिलेल्या पत्रात पेट्रोग्राडमधील तत्कालिन परिस्थितीचे वर्णन केले आहे. क्रासिन लिहितो– ' केरेन्स्कीचा

पाडाव झाल्यानंतर इतर पक्षांना सत्तेपासून कटाक्षाने दूर ठेवण्याचा बोल्शेव्हिकांचा प्रयत्न सुरू झालेला आहे. दररोज ते स्वतःच्या मनाला येईल तसे हुकूम काढीत आहेत. यामुळे येथे सगळाच गोंधळ झाला आहे. उत्पादन आणि वाहतूक विस्कळीत झाली आहे. आघाडीवरचे सैन्य अन्नाअभावी तडफडत आहे. इतर डाव्या पक्षांचे सहकार्य घेऊन सर्वपक्षीय सरकार स्थापन करावे, ही गोष्ट कामेनेव्ह, झिनोव्हेव, रिकोव्ह प्रभृतींना पटली आहे. लेनिन आणि ट्रॉटस्की यांचा मात्र हाती आलेल्या सत्तेत इतर इतर कोणालाही भागीदारी देण्यास सक्त विरोध आहे. पेट्रोग्राडमधील जीवन अर्धांगवायू झालेल्या माणसाच्या शरीरासारखे लुळे पडले असून त्यातून अराजक माजेल अशी मला भीती वाटते.

सोलोमोन हा बरीच वर्षे स्वीडनमध्ये राहिलेला बोल्शेव्हिक कार्यकर्ता पेट्रोग्राडला परतला होता. त्याच्याशी बोलताना क्रासिन म्हणाला, 'देशात चुटकीसरशी समाजवाद निर्माण करण्याच्या कल्पनेने लेनिन आणि ट्रॉटस्की इतके भारून गेले आहेत की, मला तर त्यांचं सध्याचं वर्तन वेड्यासारखंच वाटतंय. खरं सांगायचं तर लेनिनसह सगळ्यांचीच डोकी फिरली आहेत. सोशल डेमोक्रॅटिक पक्ष प्रारंभापासून जे काही सांगत आला ते सारे बोल्शेव्हिक विसरून गेले आहेत. लेनिनला विरोध करण्याची कोणाच्याच अंगात हिंमत नाही आणि त्यामुळे आपण पुन्हा जुन्या एकतंत्री राजवटीचा अनुभव घेऊ लागलो आहोत.'

रशियाचा स्वीडनमधील राजदूत म्हणून काम करीत असलेला व्होरोव्हस्कीही याच मताचा होता. तो सोलोमनला म्हणाला, 'विध्वंसक कार्य करण्यात लेनिन जितका कुशल आहे, तितकाच विधायक कार्यात तो अडाणी आहे. नवनिर्मितीचं कोणतंच काम त्याला जमणार नाही.'

क्रासिन आणि व्होरोव्हस्की यांची ही मते ऐकल्यानंतर सोलोमोन यांनी लेनिनची भेट घेऊन त्याला विचारले, 'व्लादिमिर, एक जुना मित्र म्हणून तुला विचारतो की, हे सारं काय चाललं आहे ? समाजवादाच्या स्वप्नरंजनात दंग होऊन तू कसला जुगार खेळत आहेत ? मला तुझं सध्याचं वर्तन समजत नाही.'

लेनिन उत्तर दिले– 'मित्रा, हे स्वप्नरंजन नव्हे ! समाजवादी राजवट उभारण्याचा हा एकमेव मार्ग आहे. रशिया हा जगातला पहिला समाजवादी देश व्हावा यासाठी माझी सारी धडपड आहे. माझं हे बोलणं तुला पटण्यासारखं नाही हे मला माहीत आहे. परंतु मी तुला आणखी एक गोष्ट सांगतो. माझ्या दृष्टीने हा केवळ रशियाचा प्रश्न नाही. मी रशियावर थुंकतो. जागतिक क्रांती घडवून आणण्याचं साधन, एवढ्याच दृष्टीनं मी रशियाकडे पाहतो.'

सोलोमोन हसला.

लेनिन म्हणाला, 'तू हसतो आहेस. तुला हे सारं स्वप्नरंजन वाटतंय, होय ना ? तू काय म्हणणार आहेस ते मला माहीत आहे. मार्क्सवादाचा काथ्याकूट करणारे

तुझ्यासारखे अनक मित्र माझ्यासंबंधी काय बोलतात तेही मला माहीत आहे. तू माझी समजूत घालण्याचा मुळीच प्रयत्न करू नकोस. तू आणि तुझा तो क्रासिन माझी मतं बदलू शकणार नाहीत. आम्ही आता अधिकाधिक डाव्या प्रवृत्तीकडे झुकत चाललो आहोत.'

सोलोमोनला हे सारे बोलणे अनपेक्षित होते. त्याच्या गोंधळलेल्या चेहऱ्यावर दृष्टी रोखीत लेनिन स्वत:संबंधी जे बोलला ते फार महत्त्वाचे आहे.

**लेनिन म्हणाला, 'आज जे जे म्हणून काही उभे आहे त्या सर्वांचा आम्ही संपूर्ण विध्वंस करणार असून त्यांच्या कोसळलेल्या अवशेषांवर आम्ही आमचं नवं मंदिर बांधणार आहोत. त्या मंदिरात पददलित जनतेला खचित सौख्य मिळेल. परंतु त्यासाठी आम्ही संपूर्ण 'बूर्ज्वा' समाजाला जात्यात घालून त्याचे पीठ करणार आहोत. माझे हे शब्द नीट लक्षात ठेव. आम्ही कोणतेही औपचारिक संबंध मानत नाही. तू ओळखत असलेला दहा वर्षांपूर्वीचा लेनिन केव्हाच मेला आहे. त्या जुन्या लेनिनचं आता काहीही उरलेलं नाही.'**

'असं कसं होईल ?' सोलोमोनने शंका विचारली.

ताडकन लेनिन उत्तरला, 'जे कोणी क्रांतीच्या विरुद्ध आहेत त्यांची मी मुळीच गय करणार नाही. त्यांच्याबाबत मी पराकाष्ठेचा निष्ठुर होणार आहे. क्रांतीच्या विरोधकांना समूळ नष्ट करून टाकण्याचा मी माझ्या गुप्त पोलिसदलाला हुकूम दिलेला आहे. मग त्यात कोण भरडले जातात याचा मी विचार करणार नाही तूदेखील सावध रहा बरं का !'

एकीकडे विरोधकांचा बंदोबस्त करण्यात लेनिन गुंतला असताना त्याचे क्रांतीनंतर निर्माण झालेला गोंधळ नाहीसा करण्याकडेही लक्ष होते. या कामासाठी पैशाची चणचण भासत होती म्हणून त्याने बँका ताब्यात घेण्याचे ठरविले. हे काम पार पाडण्यासाठी त्याने मेन्झिस्कीची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. लेनिन त्यास म्हणाला, 'हे बघ तुला अर्थ खात्यातलं फार कळतं म्हणून मी तुझी या जागी नेमणूक केली असं तू समजू नकोस. सोपविलेलं काम तू नीट पार पाडशील असा मला विश्वास आहे म्हणून मी तुला अर्थमंत्री केलेलं आहे.'

मेन्झिस्कीने लेनिनची अपेक्षा पुरी केली. २७ डिसेंबरपर्यंत त्याने अठ्ठावीस बँका सरकारी नियंत्रणाखाली आणल्या होत्या. बँकांचे राष्ट्रीयीकरण केल्याने आपण समाजवादाच्या रोखाने एक पाऊल पुढे टाकू असे लेनिनला प्रारंभापासून वाटत होते. क्रांतीच्या आदल्या दिवशी बोल्शेव्हिक पक्षाच्या मध्यवर्ती समितीला धाडलेल्या पत्रात त्याने म्हटले होते, 'सत्ता हाती येताच आपण प्रथम बँकांचे राष्ट्रीयीकरण करून समाजवादाच्या मार्गावरचं पहिलं पाऊल टाकू या. एकदा हे कार्य पुरं झालं, की मग पुढे काय करायचं ते पाहून अखेरीला अनुभव हाच आपला मार्गदर्शक ठरणार आहे.

जमीनदारी मोडून टाकली आणि बँका सरकारी मालकीच्या केल्या की समाजवादाची पार्श्वभूमी तयार झाली, अशी लेनिनची श्रद्धा असल्यामुळे त्याने क्रांती होऊन सत्ता हाती येताच पहिला हुकूम काढला तो जमीनदारी नष्ट करण्यासंबंधीचा. या हुकमाने त्याने जमीनदारांकडील जमिनी काढून घेऊन त्यांची व्यवस्था स्थानिक शेती समित्यांकडे सोपविली. या जमिनीचे पुढे काय करावयाचे हे घटना समिती ठरवील असे त्याने त्या वेळी जाहीर केले. या हुकमाच्या पाठोपाठ त्याने आणखी एक हुकूम काढून बँकांचे राष्ट्रीयीकरण आरंभिले. मात्र या दोन्ही हुकूमांमुळे लोकक्षोभ होणार नाही एवढी काळजी तो घेत होता; त्याने लहान शेतकऱ्यांजवळील जमिनी शेती समित्यांकडे देण्याची जशी घाई केली नाही, तसाच प्रारंभीच्या काळात खाजगी मालमत्तेलाही हात लावला नाही. नागरिकांना आपल्या खात्यातून दरमहा पंधराशे रुबलसपर्यंतची रक्कम काढण्याची मुभा ठेवली होती. उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करण करण्याच्या बाबतीत लेनिनचा निश्चय होत नव्हता. कारखाने चालविण्याचे कामगारांना पुरेसे ज्ञान होईपर्यंत कारखाने ताब्यात घेणे इष्ट होणार नाही याचे त्याला भान होते. आपल्या धोरणात समाजवादाच्या तात्त्विक भूमिकेतून पाहता अनेक विसंगती आहेत याची त्याला जाणीव होती.

सर्व सत्ता आपल्या हाती राहिली पाहिजे या एका गोष्टीबाबत मात्र लेनिन पहिल्यापासून सावध होता. या आग्रहामागे त्याची स्वतःची कारण मीमांसा होती. तो म्हणायचा, ‘मी काही स्वप्नरंजनात दंग होणारा माणूस नव्हे. समाजवाद निर्माण करावयाचा हा माझा हट्ट असला तरीदेखील मला मूलभूत मानवी स्वभावाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आपल्या अंतःप्रेरणेच्या बळावर माणूस काम करीत राहील ही गोष्ट शक्य नाही. बाह्य शक्तीच्या दडपणापुढे नमणे हा मानवी स्वभाव आहे. बाह्य दडपणाशिवाय काम करण्याची प्रेरणा मानवी मनात निर्माण करणारी सामाजिक परिस्थिती उत्पन्न होईपर्यंत लोकजीवनावर लष्करी सत्तेचा पहारा ठेवलाच पाहिजे. कामगारवर्गाच्या शत्रूंचा नायनाट करण्यासाठी समाजवादी सरकार हुकूमशाही असलेच पाहिजे. कामगारांची हुकूमशाही म्हणतात ती हीच. काय वाटेल ती किंमत द्यावी लागली तरी चालेल पण मला ही हुकूमशाही प्रस्थापित करायची आहे.’

हे धोरण एकदा निश्चित झाल्यानंतर लेनिन त्या दृष्टीने पावले टाकू लागला. सत्ता हाती आल्यानंतर एक आठवडा होतो आहे न आहे तोच त्याने एक हुकूम काढून वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यावर घाला घातला. ‘बोल्शेव्हिक राजवट स्थिर होईपर्यंत हे निर्बंध जारी करणे आवश्यक आहे. त्यानंतर आम्ही पुन्हा वृत्तपत्रांना त्यांचे

स्वातंत्र्य बहाल करू असे त्याने त्या वेळी म्हटले होते. परंतु त्या आश्वासनात काहीही अर्थ नाही हे सगळ्यांनाच कळून चुकले होते. हा हुकूम काढल्यानंतर त्याच्या मदतीने हे ना ते कारण सांगून लेनिनने विरोधी पक्षांची सर्व वृत्तपत्रे एका मागाहून एक बंद पाडली. रशियाच्या राजकीय जीवनातून सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी आणि मेन्शेव्हिक यांना कायमचे हद्दपार करण्याची त्याची जुनी महत्त्वाकांक्षा सत्ता मिळाल्यानंतर अधिक जोराने उफाळून आली आणि 'या बदमाषांचा बंदोबस्त केलाच पाहिजे,' असे म्हणत त्याने या दोन्ही पक्षांची सर्व वृत्तपत्रे बंद केली. ज्या संपादकांनी या जुलूमशाहीला विरोध केला त्यांची तुरुंगात रवानगी करण्यात आली.

आपल्या प्रत्येक कृतीला तत्त्वज्ञानाचा मुलामा देण्यात लेनिन तरबेज होता. १७ नोव्हेंबर रोजी सोव्हिएटच्या केंद्रीय कार्यकारिणीपुढे बोलताना तो म्हणाला, 'ही वृत्तपत्रे चालू ठवणे समाजवादाला घातक ठरणार आहे. पूर्वीची राजवट एका विशिष्ट वर्गाच्या फायद्यासाठी आपली जरब बसवीत असे. आम्हीही तेच करणार आहोत. पण आमचं उद्दिष्ट मात्र वेगळं आहे. आम्हांला लोकांचं हित सांभाळायचं असल्यामुळे आम्ही लोकशत्रूंना नष्ट करण्याचा चंग बांधला आहे.'

१ डिसेंबर रोजी लेनिनने आणखी एक पाऊल पुढे टाकले. त्या दिवशी त्याने कॅडेट पक्षावर बंदी घालून उदारमतवादी गटाचा आवाज बंद पाडला. या काळात त्याची एकच गर्जना होती—'समाजवादाच्या प्रतिष्ठापनेसाठी मला हे सारं करावं लागत आहे. समाजवादाच्या शत्रूंचा चेंदामेंदा करण्यासाठी बोल्शेव्हिक राजवटीनं आपल्या हातात पोलादी घण घेतलेला आहे.'

लेनिनच्या दडपशाहीतून मॅक्झिम गॉर्कीचे 'नोव्हाया झिस्न' हे पत्रही वाचू शकले नाही. कालांतराने गॉर्कीने लेनिनशी सख्य केले. तरीदेखील लेनिनने त्याला आपले वृत्तपत्र सुरू करण्याची परवानगी दिली नाही.

सत्ता हाती आल्यानंतर महिन्याभराच्या आतच लेनिनने लष्करी बळाच्या आधारावर विरोधकांचे मुद्रण—भाषण स्वातंत्र्य हिरावून घेतले. झारशाहीतील मर्यादित स्वातंत्र्याचाही आता मागमूस उरलेला नव्हता. आपल्याला भाषण-मुद्रण स्वातंत्र्य मिळाले पाहिजे यासाठी रशियन जनता गेली कित्येक वर्षे झारशाहीशी निधडी झुंज घेत होती. लोकप्रक्षोभामध्ये झारशाहीचा बळी पडला. त्यानंतर आलेली केरेन्स्कीची दुबळी राजवटही कोसळली गेली आणि आम जनतेचे भले करण्याची प्रतिज्ञा वारंवार उच्चारणारा लेनिन आता रशियाचा सर्वसत्ताधारी झाला होता.

लोकहिताच्या नावाखाली लेनिनने लोकांचा आवाज बंद पाडला. केरेन्स्कीने म्हटल्याप्रमाणे रशियन जनतेला हा खरोखरच नवा अनुभव होता.

(क्रमशः)

[ पृष्ठ २३ वरून ]

दाखवलं आहे. आणि हीच त्यांची शहामत व तीच त्यांच्या कादंबरीची मातब्बरी !

याचं एक अगदी प्राथमिक व ढोबळ गमक म्हणजे सावंत यांनी घडवलेलं कर्णाच्या मोठेपणाचं नेमकं दर्शन ! हे दर्शन घडवताना त्यांनी काही गोष्टी मनाशी कदाचित नकळत– पक्क्या केलेल्या असल्या पाहिजेत. कर्णाचं मोठेपण निर्मळ व सर्वप्रसंगी निरपवादपणे सिद्ध होणारं नाही, अनेकदा क्षुद्रता त्याला छेद देते ही पहिली गोष्ट. भाग जाऊनही शेवटी मोठेपण बाकी उरतंच ही दुसरी गोष्ट. उरणारं हे मोठेपण पराक्रम-औदार्य इत्यादी सुप्रसिद्ध गुणांवर अवलंबून नाही, तर दुर्दम्य आत्मश्रद्धा, तेजाची अनिवार ओढ, प्रकाशपूजनाची उत्कट प्रवृत्ती यांसारख्या विशेषांवर ते तोललं गेलं आहे ही तिसरी गोष्ट आहे. हे मोठेपण कर्णाच्या आयुष्याच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंत सारखं विकास पावत गेलं आहे ही चौथी गोष्ट. आपल्या मोठेपणाची अभिमानयुक्त जाणीव त्याला आहे, पण तिच्या कोशात तो सापडलेला नाही. एवढेच नव्हे तर उत्तरोत्तर त्याविषयी तो उदासीन नसला तरी निर्विकार होत गेला आहे ही पाचवी गोष्ट. अशा गोष्टी मनाशी पक्क्या करून आणि दर्शनी मोठेपण, अंतर्यामीचं मोठेपण, बाहेरून मिळणारा छेद, आतून होणारा विकास या साऱ्या गोष्टी एकमेकांपासून विलग, सुट्या नाहीत याचं भान ठेवून सावंत यांनी कर्णाच्या मोठेपणाचं दर्शन घडवलं आहे. त्यामुळेच ते नेमकं घडतं. एकमेकांत मिसळणाऱ्या साऱ्या सूक्ष्म छटांनिशी घडतं.

परंतु कर्णाचं मोठेपण हे या कादंबरीचं केंद्र नाही; किंवा मोठेपणाचं भडक दर्शन घडवणं हे सावंत यांचं उद्दिष्ट नाही. अलीकडच्या काही ऐतिहासिक कादंबऱ्यांतून वीर पुरुषांची पूजा बांधण्याची प्रवृत्ती दिसते. पण या कादंबरीत कर्णाच्या महाप्रतापाला आरती ओवाळण्याची मनीषा दिसत नाही. कर्णाचा भाऊ शोण, कर्णाची पत्नी वृषाली यांच्यासारख्या जिवलगांच्या उद्गारांतून ध्वनित होणारा गौरवभाव हे खुद्द सावंत यांच्या प्रेमादराचं प्रक्षेपण-प्रतिरूप (प्रोजेक्शन) वाटत नाही. चित्रण करताना सावंत यांनी ते आवेगानं केलं असलं तरी त्यांची अलिप्तता सुटली आहे, त्यांचा तोल ढळला आहे, असं सहसा कुठे दिसून येत नाही. कर्णाच्या मोठेपणापेक्षा काही वेगळं सावंत यांना वेधक वाटलं हेच या अलिप्ततेचं, या तोलाचं कारण होय.

सूर्यपुत्राला सूतपुत्र म्हणून जवळजवळ जन्मभर जगावं लागावं– आणि तेही अनेकवार अवहेलना सहन करीत– यात मोठा अंतर्विरोध आहे. कर्णासारख्या श्रेष्ठ वीराला कनिष्ठांकडूनही मान्यता मिळू नये; उलट द्रौपदीसारख्या, नुसत्या सुंदर नव्हे तर बुद्धिमान स्त्रीकडून हेटाळणीचं हसू ऐकावं लागावं, यात दारुण दैवदुर्विलास आहे, अशा अंतर्विरोधाच्या, दुर्विलासाच्या कात्रीत कर्णासारख्या

मनस्वी पुरुषाच्या जीवनाचं महावस्त्र सापडावं हा नियतीचा निर्दय खेळ आहे. वस्त्र कर्णाच्या जीवनाचं होतं म्हणून, नाहीतर त्याची लक्तरं झाली असती, त्याची वाऱ्यावर वरात निघाली असती! पण कर्ण झाला तरी त्यालाही अंत:करण होतं— अंत:करणालाही काही कवच लाभलेलं नव्हतं! कर्णाचं अंत:करण कळत नकळत कातरलं जायचं थोडंच राहणार! एवढंच की कर्ण हे कातरणं, त्यातल्या वेदना सोसतो! सारं सोसून वृषाली, सुप्रिया, शोण, अश्वत्थामा, दुर्योधन अशा अनेकांच्या मेळाव्यात वावरतो; पण त्याच्या वेदना कधीच पार विसरून जात नाहीत! त्या कुंतीमातेच्या वात्सल्याच्या धारांतही विलय पावत नाहीत! विलय पावणार तरी कशा! विलय पावाव्या अशा त्या नाहीतच!! या वेदनांतच सावंत यांना कादंबरीची लय सापडली. आणि म्हणूनच आपल्या कादंबरीची त्यांनी गौरवगाथा होऊ दिली नाही; आपल्या कादंबरीला येणारं, थोर अंत:करणाच्या खोल वेदनांच्या कथेचं रूप त्यांनी बिघडू दिलं नाही.

कादंबरीची गौरवगाथा होऊ न देणं हे जेवढं अवघड होतं. त्यापेक्षा वेदनांची कथा उथळ, सवंग होऊ न देणं हे अधिक अवघड होतं. पण सावंत यांना ते साधलं आहे. एखाद्या सामान्य माणसाची नियतीच्या दौडीबरोबर होणारी दैना आणि कर्णासारख्या सागरोपम व्यक्तित्वाची करुणास्पद अवस्था यांच्यांतलं अंतर त्यांनी लक्षात घेतलं आहे. कर्णाची अवस्था करुणास्पद असली तरी ती दयनीय, केविलवाणी नाही याची जाण त्यांना आहे. दुबळ्या माणसाची विफल धडपड पाहून त्या माणसाविषयी वाटणारी भावुक हळहळ वेगळी! आणि पुन्हा पुन्हा उसळी घेणाऱ्या कर्णातल्या तेजाला बसणारे पराभव रूपी काळोखाचे तडाखे पाहून जीवनाच्या गूढतेविषयी होणारी गंभीर खळबळ वेगळी! हा समज त्यांना आहे. त्यामुळेच कर्णाच्या वेदनांचं चित्रण करताना ते स्वत: गदगदत नाहीत किंवा वाचकांनाही आसवांनी चिंब करू पाहत नाहीत. आणि तरीही त्यांच्या चित्रणाचा प्रभाव कुठेही उणावलेला नाही. किंबहुना म्हणूनच कर्णाच्या वेदनांची कथा अधिक परिणामकारक झाली आहे.

खरं म्हणजे ही कथा निव्वळ वेदनांची नाही; आणि एकट्या कर्णाच्या भावनांचीही नाही. एकमेकांवर आघात-प्रत्याघात करणाऱ्या अनेक वादळी घटनांची व धारा-महाधारांतून फुगत जाणाऱ्या महापुरासारख्या भावनाप्रवाहाची ती कथा आहे. कथेचं हे व्यापक व व्यामिश्र रूप ध्यानात घेऊनच बहुधा, ते जास्तीत जास्त प्रभावीपणे प्रकट करण्यासाठी सावंत यांनी अनेकमुखी कथानकाचा उपयोग केला आहे. त्यांना स्वत:ला सारं सांगता आलं नसतं असं नाही; पण त्यांनी कर्ण व त्याच्या बरोबरीनं कुंती, दुर्योधन, वृषाली, शोण, श्रीकृष्ण यांना निवेदन करायला लावलं आहे. या निवेदकांत अश्वत्थाम्याला स्थान का नाही? प्रत्येक निवेदकाच्या पृथगात्मतेनुसार निवेदनात वेगळेपण आलं आहे का? हे निवेदन सर्वत्र स्वाभा-

विक वाटतं का ? त्याची पकड अधूनमधून सैल पडलेली नाही का ! अशा काही प्रश्नांवर वाचकावाचकांत मतभेद होईल ! पण एका गोष्टीबद्दल तरी दुमत होणार नाही– निदान होऊ नये– या गोष्टीबद्दल की अनेकमुखी निवेदनामुळे कर्णकथा एकपेडी न राहता बहुपेडी झाली आहे आणि तिच्यातले सारे पीळ, सारे ताण पुरते स्पष्ट झाले आहेत. अनेक गोल-चौकोन-त्रिकोण एकमेकांत अडकून तयार व्हावी अशी आकृती या कादंबरीची जो दिसते, तिचं मूळ या पेडांत व ताणांतच सापडेल.

अशी आकृती कादंबरीची झाली याचं कारण सावंत यांनी फक्त कर्णाच्या स्थूल चरित्रावर आपलं लक्ष केंद्रित केलं नाही; तर त्या चरित्राच्या व्यापक जीवनसंदर्भाचंही भान त्यांनी ठेवलं. अमक्या आशाआकांक्षा, अमके सूडसंघर्ष, अमके हर्षामर्ष आणि शेवटी भयंकर दुःख किंवा काहीच नाही...हे सारं असं का ? असंच का ? यांसारख्या प्रश्नांची कर्ण–अश्वत्थामा किंवा कर्ण–कृष्ण यांच्या सलापा–आलापातून आलेली उत्तरं हे त्या भानाचंच द्योतक म्हणता येईल. ही उत्तरं, कोशातून पाखरू बाहेर पडावं तशी कथेच्या मूळ कवचातून परिस्फुटित झालेली सर्वत्र वाटतात की नाही हा प्रश्न अलाहिदा ! एक निश्चित की जीवनाचा थोडा तरी आलोक असल्याशिवाय असली उत्तरंच काय,पण मूळचे प्रश्नही सुचणं शक्य नाही! नव्या, भेदक उपमान-प्रतिमानांच्या किंवा भरघोस, अणीदार भाषेच्या साह्यानं सावंत भावचित्रं वा प्रसंगचित्रं साक्षात करू शकतात हे खरं ! पण एवढंच म्हणण्यापेक्षा जीवनाचा आलोक घेऊन कर्णाच्या जीवनावर प्रश्नोद्‌भावी भाष्य करण्याची कुवत कादंबरीत ठिकठिकाणी ते दाखवतात असं म्हणणं हेच केव्हाही युक्त ! !

महाभारतातल्या महाभाष्याची सर या भाष्याला आहे का ? किंवा त्याचंच प्रतिबिंब कादंबरीत दिसतं का ? तसं असेल तर मग सावंत यांचं मोठेपण ते काय राहिलं? असे फार मोठ प्रश्न एका प्रकांड पंडितानं मला विचारले. त्यावर नम्रपणानं जे उत्तर मी दिलं तेच इथं उद्‌धृत करावंसं वाटतं– "वेरुळ–अजिंठ्यासारख्या लेण्यांची कॉपी करणंदेखील काही आसान नाही ! तेवढं जरी सावंत यांना साधलं आहे असं वाटलं तरी तेही त्यांचं यशच म्हणावं लागेल ! ... प्रत्यक्षात असं दिसून येईल की सावंत कर्णाच्या जीवन-नदाच्या खळवळाटात वाचकाला असा सोडतात की आपोआपच महाभारतासारख्या महाभाष्याच्या महासागरात त्याचा प्रवेश व्हावा ! आणि हे यश निखालसपणे फार मोठं आहे ! !

इथं 'मृत्युंजय'चा रसग्रहणात्मक परिचयही करून दिलेला नाही की कादंबरीच्या चित्राकृतीचं सूक्ष्म विश्लेषणही केलेलं नाही. 'मृत्युंजय' वाचल्यावर ज्या प्रतिक्रिया झाल्या त्यांची विचाररूप नोंद इथं केली आहे. ही नोंद बरोबर आहे की नाही एवढं पाहण्यासाठी जरी सातशे पानांची ही प्रदीर्घ कादंबरी वाचायला कुणी प्रवृत्त झाला तरी या लेखाचं काम झालं असंच मी म्हणेन ! ○

**[ मृत्युंजय : कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे : मूल्य रुपये पंधरा ]**

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

**श्री. गो. जोशी, सायनाचार्य**

## दि. ६ ते १२ जानेवारी १९६८

**मेष** : सूर्य–मंगळाची सहानुभूती कधी नव्हती एवढी सध्या आपणांस लाभत आहे; आणि म्हणूनच या आठवड्यापासून तुमच्या जीवनात एक उत्क्रांतिपर्व सुरू होत आहे. नवे जीवन, नवे वातावरण, नव्या कल्पना, कर्तृत्व दाही दिशांनी चौफेर उधळू लागेल.

या कालाचा अधिकाधिक लाभ उठवण्याचा प्रयत्न करा. ग्रह गतिमान आहेत. त्यांची सहानुभूती दीर्घकाल अशीच लाभेल याची शाश्वती काय? संधी फक्त एकदाच दार ठोठावते, त्या वेळी तिची दखल घेतली नाहीत तर ती पुन्हा तुम्हांला तोंड दाखवणार नाही.

कला-क्षेत्रात आवाज उठवाल, क्रिकेटसारख्या क्षेत्रात विक्रमी यश संपादन कराल. पैसा जरी माफक मिळाला तरी कीर्ती अमाप लाभेल.

दि. ९ ते ११ अपेक्षासाफल्याचा काल.

**वृषभ** : सूर्य म्हणजे जीवनाचे सारसर्वस्व. तोच मुळी आडवा. त्याच्या सहानुभूतीविना अपेक्षित यशाची आशा कशी करता येईल?

काही काल झगडत–धडपडत वाटचाल करावी लागणार आहे. सूर्य भाग्यस्थानी येताच तुमची सारी विवंचना मिटेल. प्रसन्न व उत्साही वातावरण सर्वत्र दिसायला लागेल.

मंगळ दशमात आला आहे तो अगदीच काही साहाय्य करणार नाही, असं घडणार नाही. कर्तव्याला प्रयत्नांनी गुणले की अपेक्षित यश पदरी पडलेच. हा साधासुधा हिशेब आहे.

या आठवड्यात फार मोठ्या जबाबदाऱ्या उचलू नका आणि आटोक्याबाहेरच्या खर्चाच्या योजना हाताळू नका. धनिकांचे सहकार्य कोणत्याही क्षणी लाभू शकेल, अशी सोयिस्कर समजूत करून घेऊ नका.

दि. ७–८–११ या काली अल्पसे यश लाभावे.

**मिथुन :** भाग्यस्थानी मंगळाचे आगमन. मंगळाची कृपा म्हणजे सर्व काही असे आजच्या जमान्याचे समीकरणच आहे.

या आठवड्यापासून तुमचे सारे पेचप्रसंग सुटायला लागतील, स्थगित कामे गती घेऊ लागतील, चित्तवृत्ती प्रसन्न बनू लागतील.

बदली–बढतीला अधिकाधिक अनुकूल असे वातावरण या आठवड्यापासूनच दिसू लागेल. आता नोकरी–चाकरीत खटकणार नाही, की कौटुंबिक वातावरण चिघळणार नाही.

यांत्रिक–वैद्यकीय व्यवसायाशी संबंध असणाऱ्या व्यक्तींना तर हा एक विशेषच उत्क्रांतीचा काल जाणवेल.

इष्टमित्रांची ऐनवेळी मदत मिळेल, नव्या व्यवसायाच्या कल्पना आकार घेऊ लागतील, प्रगतीचे गणित झटपट सुटू लागेल.

दि. ८ ते ११ अनेक अपेक्षा या काळी सफल व्हाव्यात.

**कर्क :** आठवा मंगळ आला म्हटले की धाबे दणाणते, चित्तवृत्ती बधीर होतात, प्रज्ञा बोथट होते, प्रतिष्ठा डागळते, कृती मंदावते. गुरू अनुकूल आहे म्हणून ठीक आहे, नाही तर काय झाले असते–अनिष्ट गोष्टी चघळण्यात काय अर्थ आहे ?

लवकरच राहू मोनेत? नवमात–येणार आहे. (दि. १२) त्याची मधूनमधून सहानुभूती मिळत राहील. वेळ निभावून जाईल.

व्यावहारिक अपयशाची मुळीच धास्ती बाळगू नका. पैसा फारसा मिळाला नाही तरी अगदीच नडेल असं कधी घडणार नाही. 'अशुभस्य कालहरणम्' हाच या परिस्थितीवर तोडगा आहे.

प्रकृतीची विशेष काळजी घ्या. जुने विकार डोकं वर काढतील.

दि. १० ते १२ या काली थोडेफार यश लाभावे.

**सिंह :** सिंहराशी व्यक्तींना सध्या कोणत्याही गोष्टीची फिकीर नाही की, कोणत्याही अवघड कार्यात अपयशाची भीती नाही. हवामान अनुकूल आहे व सतत प्रयत्नशील राहण्याची प्रवृत्ती आहे. यशस्वी व्हायला यापेक्षा आणखी काय हवे ?

साहित्य–शासन–अर्थशास्त्र यांत काहीतरी अनन्यसाधारण असे कार्य करून दाखवाल. सामाजिक क्षेत्रात तर सर्वत्र तुमचाच आवाज उठू लागेल. स्थावर, वाहन, नोकरचाकर यांचीही विवंचना याच वेळी मिटावी. वृत्तपत्रीय प्रसिद्धीचा झोत तुमच्यावरच केंद्रित झाल्यामुळे तुमचा कीर्तिसुगंध सर्वत्र दरवळू लागेल.

मंगळ सातवा असला तरी त्याच्याबद्दल निष्कारण गैरसमज करून घेऊ नका. वादविवादाच्या प्रसंगापासून चार हात दूर राहा म्हणजे झाले.

दि. ९ ते १२ या कालात अनेक कामे झटपट उरकावी लागतील.

**कन्या :** सध्याचे ग्रहमान काहीसे तणातणीचेच दिसते. तसं काही प्रतिष्ठेला धक्का लागेल असं घडणार नाही; पण या वेळी आपणांस प्रत्येक पाऊल विचारानेच टाकावे लागेल. उद्योगधंदा विशेष लाभाचा ठरणार नाही; अंगावर पडलेल्या जबाबदाऱ्या सहज सुलभपणे पार पडणार नाहीत. अधिकाऱ्यांची तुमच्यावर कृपादृष्टी वळेलच याची खात्री नाही.

मंगळ षष्ठात आहे—तोच एक या वेळी तुम्हांला आधार. सहसा आव्हान द्यायच्या फंदात कोणीच पडणार नाही.

या वेळी नैतिक मूल्यांची प्राणपणाने जपणूक करा. भावनेला बळी पडून काही अविचार हातून घडू नये याबद्दल सतत दक्ष राहा.

दि. १० ते १२ थोडाफार अनुकूल काळ एवढाच.

**तूळ :** चौथ्या मंगळाची जुलमी कारकीर्द संपल्यापासून परिस्थिती पालटल्याचा प्रत्यय सतत येत असेल.

या आठवड्यापासून तर साऱ्याच ग्रहांनी तुमच्या क्रांतीला उत्थान द्यायचे निश्चित ठरविलेले दिसते.

बदल, प्रगतीकडे वेगाने वाटचाल, हेच या वेळचे मुख्य कार्य. साऱ्या गोष्टी अपेक्षेप्रमाणे आणि झटपट व्हायला लागतील. दि. २८ डिसेंबरच्या सूर्य-गुरू त्रिकोणापासूनच अपेक्षासाफल्याचा प्रत्यय आपणांस येत असेल. आगामी ८–१५ दिवसांतच जे काही करायचे असेल, साधून घ्यायचे असेल ते साधा. असे चांगले दिवस वरचेवर लाभत नसतात.

दि. ७ ते १० या काली अनेक अनुकूल व लाभप्रद घटना घडून याव्यात.

**वृश्चिक :** चौथा मंगळ सुरू झाला. आता तुमच्या चौफेर प्रगतीला थोडाफार तरी पायबंद बसेलच. मंगळाचे कार्यच हे. हाती घेतलेल्या कामांची गती मंदावेल, वाढत्या खर्चाला आळा घालणे जड़च जाईल. इष्टमित्र, शेजारीपाजारी चालत्या गाड्याला खीळ कशी घालावी याचाच विचार करू लागतील. त्यांच्या प्रयत्नांना यश येईलच असे नाही. पण तशी भीती क्षणोक्षणी वाटू लागेल.

वरून दिसण्याला सारे ठाकठीक दिसत असूनही आंतरिक व्यथा-विवंचना वाढू लागतील.

मुख्यत: कौटुंबिक व वैयक्तिक अनारोग्य, राहत्या जागेसंबंधी कटकटी, नोकरीधंद्यांत मतभेद इत्यादी प्रकार तीव्रतेने जाणवतील.

दि. १० ते १२ हे दिवस थोडाफार लाभ पदरी टाकणारे जाणवतील.

**धनू :** मंगळ पराक्रमात. अधिकाधिक अनुकूल. मंगळाची कृपा म्हणजे सर्व काही. अशा वेळी कोणत्याही अनिष्ट ग्रहाची आपणांस बाधा होऊ शकणार नाही. शिवाय

भाग्यस्थ गुरूचे कृपाछत्र कित्येक दिवस लाभणार आहे.

इतका यशस्वी आणि अनुकूल काल गेल्या सबंध वर्षात आपण अनुभवलेला नसेल.

नोकरीमध्ये अनेक टप्पे ओलांडून पुढे जाल. नव्या व्यवसायधंद्याला प्रारंभ कराल. स्थावराचा-वाहनाचा प्रश्न याच वेळी मिटू शकेल. रासायनिक खते, आयात-निर्यात व्यवहार या व्यवसायांत चांगलाच जम बसवाल.

दि. ९ ते १२ या काली अनेकांचे सहकार्य लाभावे.

**मकर :** सूर्य व्ययात–मंगळ द्वितीयात. दोन उग्रग्रहांच्या कात्रीत आपण सापडला आहात. अशा वेळी गुरूही तुमच्या हाकेला धावून येण्याची शक्यता नाही.

प्राप्ती माफक आणि खर्चाची तोंडे मात्र हजार. असे चमत्कारिक प्रसंग या वेळी आपणांस अनुभवावे लागतील.

पण त्यातूनही आपण चातुर्याने मार्ग काढू शकाल.

व्यवसायधंद्यात फारच सावधगिरी बाळगावी लागेल. कोणत्या वेळी कोण कसा फसवील याचा नेमच नाही–राजकीय क्षेत्रात आवाहन करण्याच्या फंदात पडू नका.

दि. १० ते १२ या काली थोडीफार अनुकूलता जाणवेल.

**कुंभ :** साडेसाती आता आहे नाही सारखीच. सूर्य एकादशात–गुरू सप्तमात–या विशाल तेजोगोलांची कृपा लाभलेल्यांनी बारीक सारीक अनिष्टतेची दखल घ्यायचीही गरज नाही.

वरिष्ठांची सहानुभूती मिळेल. प्रगतिपथावर एक पाऊल पुढे पडेल. अडून पडलेला पैसा हाती येईल. सहसा कुणाला न मिळणारी कामे विना परिश्रम लाभू लागतील.

मंगळ फारसा अनुकूल नसल्यामुळे, परिश्रम मात्र खूप करावे लागतील.

दैवी कृपा, ईश्वरी साक्षात्कार अशाही गोष्टी या काली घडाव्यात. पैसा आणि प्रतिष्ठा या बाबतींतही आता विवंचना राहणार नाही.

दि. ९–१०–१२ या वेळी आपले अनेक प्रश्न सुटावेत.

**मीन :** साडेसाती आणि त्यातून बारावा मंगळ. गेल्या काही दिवसांत जे सहजासहजी लाभले तसे आता घडणे कठीणच.

कोणत्याही गोष्टीसाठी जिवाचे रान करावे लागेल तरच थोडेफार यश पदरी पडण्याची शक्यता. सांपत्तिक ताण कमालीचा जाणवेल. इष्टमित्रांचे सहकार्य लाभेलच याची खात्री नाही. प्राप्ती बेताची आणि खर्च मात्र सहस्रमुखांनी. असे चमत्कारिक प्रसंग या वेळी सतत अनुभवावे लागतील.

निर्धाराने–निष्ठेने पाऊल टाकलेत तरच अनवस्था प्रसंग टळू शकेल.

दि. ८–१०–१२ या काली परिश्रम अगदीच वाया जाऊ नयेत.

O

 [पृष्ठ ८ वरून]

७ ट्रक्स भरले. मिलिटरी शिस्तीने कामाचा उठाव झाला. शेवटचा ट्रक भरताना तर जोरदार पर्जन्यवृष्टी चालू झाली. निसर्ग जणू परीक्षाच पाहत होता. उघड्यावर पडलेले साहित्य आच्छादण्यासाठी धावपळ सुरू झाली. पडक्या इमारतींचे पत्रे, सतरंज्या, मोकळी पोती, तंबूची कनात. मिळेल ते साहाय्य घेऊन सर्व साहित्य कसे-बसे झाकले. सर्वांचे कपडे भिजले. सर्वजण नखशिखान्त भिजून चिंब झाले. ओलेत्यानेच शेवटचा ट्रक भरला.

सामान उतरवून घेण्याची व्यवस्था करण्यासाठी प्राचार्य सकाळी ट्रकबरोबर सातारला गेले होते, ते संध्याकाळी परत आले. सर्वांना पावसाने झोडपलेले त्यांनी पाहिले. त्यांनी जातीने सर्वांना दोन-दोन अॅस्प्रोच्या गोळ्या दिल्या. गरम गरम चहाचीही व्यवस्था केलेली होतीच.

रात्रीचे जेवण झाले. सर्वांच्या झोपण्याची व्यवस्था झाली आहे की नाही हे श्री. गोंदकर यांनी पाहिले. कोरडी वस्त्रे पांघरण्यासाठी सर्वांना पुरविली. काहींची झोपण्याची व्यवस्था मिलिटरी ट्रकमध्ये, तर काहींची तात्पुरत्या उभारलेल्या फर्निचरच्या आडोशाला व एक-दोघांची महाराजा कॅंटीनमध्ये झोपण्याची व्यवस्था झालेली होती. या सर्व ठिकाणी जाऊन श्री. गोंदकरांनी सर्वांची विचारपूस केली व नोंद घेतली. कारण दुसऱ्या दिवशी पहाटेच कामाला लागावयाचे होते. रात्री १ वाजता श्री. गोंदकर एका बाकावर झोपले.

शुक्रवारचा दिवस अनेक दृष्टींनी लक्षात राहणारा ठरला. एक तर त्या दिवशी कामाचा उच्चांक गाठला होता. त्याच दिवशी प्राचार्यांच्या पत्नी सौ. महाबळेश्वरवाला यांना ताप

भरला. १०२° फॅ. पर्यंत ताप होता. एका कर्मचाऱ्यास त्यांची काळजी घेण्यास सांगून, सौ. ला तशा अवस्थेत सोडून प्राचार्य सातारला अनिवार्य कार्यास्तव गेले. त्याच दिवशी तुफान पाऊस पडला व गेले चार दिवस "माझ्या जखमा मामुली आहेत त्या झपाट्याने बऱ्या होऊ लागलेल्या आहेत," असे म्हणणाऱ्या श्री. गोंदकर यांचा उजवा पाय गेल्या चार दिवसांच्या श्रमाने व त्या पायावर असलेली जखम पावसाने भिजल्यामुळे टरटरून फुगून आली. संध्याकाळी सुजेमुळे त्यांना चप्पल घालणे अशक्य झाले. याच दिवशी सर्वांना विश्वास वाटू लागला, की काम आटोक्यात आले आहे व शनिवार–रविवारपर्यंत सर्वजण कोयनापार होतील.

शनिवारी संध्याकाळपर्यंत सर्व शिक्षकांचे साहित्य ट्रक भरून गेले. रविवारी सकाळी श्री. गाजरे व श्री. गोंदकर यांच्या सामानाचा ट्रक हालला व रविवारी संध्याकाळी प्राचार्यांचे साहित्य भरलेला ट्रक व शाळेचे उरलेले पुण्याला दुरुस्तीला पाठविण्याच्या साहित्याचा ट्रक निघाला. मानवी सामर्थ्याचे प्रतीकभूत असलेल्या त्या अभंग धरणाचे दर्शन घेत घेत ट्रक मार्ग आक्रमू लागला. येथे संघर्षाचे तिसरे पर्व संपले.

आता संघर्षातील चौथ्या पर्वाची सुरुवात होत आहे. निसर्गाने घेतलेल्या सूडाची लवमात्र निशाणी उरू द्यावयाची नाही. सर्व साहित्य पूर्ववत दुरुस्त करावयाचे आहे. सर्व कपडे वर्गवार करून भट्टीला द्यावयाचे आहेत. नव्या ठिकाणी नव्या जोमाने जणू काही घडलेच नाही अशा तऱ्हेने पुन्हा नवे जीवन सुरू करावयाचे आहे. त्या कामासाठी सर्व शक्तिमान परमेश्वर त्यांना शक्ती देवो.

○

तसे पुनर्वसन करावे हा मार्ग आपण सोडला पाहिजे. केव्हा तरी आपल्या देशाला 'भिकाऱ्यांचे राष्ट्र' ही पदवी सोडून स्वावलंबी व स्वाभिमानी राष्ट्र म्हणून उभे राहिलेच पाहिजे. आपत्तीच्या प्रसंगीच असे उभे राहण्याची संधी असते. आपल्यावरील आपत्तीचे आपण सर्व मिळून निवारण करू शकतो, केले पाहिजे व त्यासाठी पडेल तो बोजा स्वीकारला पाहिजे, अशी प्रवृत्ती लोकांत वाढली पाहिजे.

कोयनेच्या परिसरातील भूकंपग्रस्तांसाठी वेगवेगळ्या संस्था, व्यक्ती, संघटना यांनी जे काम केले त्याचे महत्त्व मुळीच कमी नाही. परंतु भूतदयावादी दृष्टीने केलेल्या या मदतीचे स्वरूप केवळ तात्कालिक, प्रतिकात्मक, लाक्षणिक असते. त्याने सर्व प्रश्न सुटण्याजोगे सामर्थ्य निर्माण होत नाही. पुनर्वसनकर बसविला तर त्यात थोडी सक्ती भासते खरी, पण ही सक्ती ज्याची देण्याची ताकद आहे त्याच्यावरच होईल व सरकारला पुरेसा पैसा आपल्या यंत्रणेमार्फतच मिळू शकेल. लोक हा कर खुषीने देतील, विधानसभेचे मन वळवावे लागेल. पण मला वाटते केव्हा तरी आपण हे केले पाहिजे.'

**मुलाखत : महाराष्ट्र टाईम्स**
**२७ डिसेंबर १९६७**

[ केव्हातरीपेक्षा आत्ताच. तवा तापला आहे तोवरच या झोळीची होळी करण्याचे पुण्यकार्य उरकून घेता येईल. कारण केव्हा आपला पिढीजात कचखाऊपणा जागा होईल हे सांगता येत नाही. तेव्हा मोहितेसाहेब ! जल्दी करो. इतकं चांगलं बोललात. आता तितकंच चांगलं करून टाका. आमचा पूर्ण पाठिंबा.

–संपादक ]

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649

चवथी सचित्र आवृत्ती

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

राजहंस प्रकाशन
पुणे

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग.** **जगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ रायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**